म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. १२८३
१९२८०

REFBK-0003330
REFBK-0003330



३० - ६ - २८

श्रीमत् जगद्गुरु श्रीशंकराचार्य मठ करवीर ( डॉ. कूर्तकोटी )

यांना समर्पण केलेलें

# महर्षि श्रद्धानन्दजी

## यांचें चरित्र

३३३०

लेखक.

डॉ. रघुनाथ गणेश भोपे, ( आर्यकुमार ), मंत्री नगर हिंदुसभा.

'सैतानाचे खेळ,' 'जर्मन युद्धांतील गुप्तकृत्यें,' 'प्रेमाचें साम्राज्य'

' लोकमान्य कीं लोकनायक ' इत्यादि पुस्तकांचे कर्ते.

REFBK-0003330

श्री. दे. भ. नरसिंह ............... केसरी, पुणें.

प्रथम आवृत्ति. ] किंमत बारा आणे. [ २१ मे १९२७

मुद्रकः—रा. शंकर रामचंद्र दाते.
लोकसंग्रह प्रेस, २७ बुधवार पेठ पुणें.

( परभाषेंत भाषांतर किंवा रूपांतर करण्याचे सर्व हक्क
ग्रंथकर्त्यानें स्वतःकडे ठेविले आहेत.)

प्रकाशकः—डॉ. रघुनाथ गणेश भोपे.
भारत दवाखाना, अहमदनगर.

# प्रस्तावना.

कोणत्याहि प्रस्तावनेचा उद्देश एखादा विषय लोकांच्या नजरेला, प्रिय लागेल अशा रीतीनें, आणणें हा असतो. एकादा विषय नवा किंवा विचारसरणी नवी असली तर प्रस्तावना लिहिणारावर ती एक प्रकारची जबाबदारी असते. युरोपिअन समाजांत असा संकेत आहे कीं, एका मनुष्यानें दुसऱ्या मनुष्याची तिसऱ्या मनुष्याशीं प्रथम ओळख करून दिली, आणि तो दुसरा मनुष्य जर वाईट निघाला तर तिसऱ्या मनुष्याला पहिला मनुष्य जबाबदार राहतो. ओळख करून देणाराला ओळख करून दिलेला मनुष्य वाईट म्हणून माहित नसला तर त्याला व्यवहाराचें ज्ञान नाहीं म्हणून, आणि तसा तो माहित असतांहि ओळख करून दिली तर तो एक प्रकारचा वैय्यक्तिक गुन्हा त्याचे हातून घडला म्हणून, ओळख करून देणारा दोषी ठरतो. एखाद्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्याची गोष्टहि अशीच आहे. आंतील विषयाची मुळींच माहिती नसतांना कोणी सहसा प्रस्तावना लिहून वाचकांना त्याची ओळख करून देत नाहीं. आंतील विषय हटकून वाईट आहे असें त्याला माहित असलें तर ओळख करून देण्याच्या भानगडींत तो पडणारच नाहीं. आंतील विषय चांगला असला तर प्रस्तावना-लेखकाचें काम सहजच सुलभ होतें. राहतां राहिला एकच प्रकार; तो हा कीं, पुस्तकांतील विषय मतभेदग्रस्त किंवा विवादित असावा; आणि तसें असेल, तर मात्र प्रस्तावनाकाराचें काम खरें कौशल्याचें आणि चतुरतेचें असतें. प्रस्तुत ज्याला ही लहानशी प्रस्तावना मी लिहीत आहें तें हें पुस्तक तिसऱ्या प्रकाराखालीं येईल. म्हणजे त्यांतील विषय लोकांना आवडण्यासारखा आहे, इतकेंच नव्हे तर त्यांतील

माहिती समजून घेण्याची महाराष्ट्रीय वाचकांना एक प्रकारें उत्कंठाच होती असें म्हटलें तरी चालेल. कारण स्वामी श्रद्धानंद यांच्या खुनामुळें त्यांच्या चारित्राला एक प्रकारें विशेष महत्त्व आलें आहे. ज्या कार्याच्या यशस्वितेमुळें प्रतिपक्षाला राग येऊन त्यांचा खून करण्यांत आला, तें कार्य आणि तें कार्य करणारा मनुष्य हीं दोन्ही लोकोत्तर असलीं पाहिजेत असें अनुमान लोक सहजच काढतात. आणि स्वामी श्रद्धानंद यांच्यासंबंधीं तें अनुमान सर्वस्वीं खरेंहि आहे ही गोष्ट या चारित्रांतील हकीकत वाचली असतां कळून येईल. हें श्रद्धानंदचरित्रामृत २८ अंजलींच्या रूपानें ग्रंथकारानें वाचकांना समर्पण केलें आहे. आणि ती प्रत्येक अंजलि, भाषा व आंतील उद्बोधक माहिती यामुळें, स्पृहणीय अशीच झाली आहे. कोणाहि लोकोत्तर पुरुषाचें चरित्र साधारणपणें लोकांना माहित असतें,परंतु तें कांहीं थोड्याशा ठळक गोष्टींमुळें किंवा प्रसंगांमुळें असतें. परंतु लोकोत्तर मनुष्याची लोकोत्तरता केवळ अशा थोडयाशा गोष्टींनीं किंवा प्रसंगांनीं समजण्यासारखी नसते. त्याच्या अखंड चरित्रांत एक प्रकारची लोकोत्तरताच असते. ही गोष्ट स्वामी श्रद्धानंदजींचें चरित्र वाचणारास पटल्याशिवाय राहणार नाहीं. ग्रंथांतील माहिती जशी उद्बोधक, मार्गदर्शक आणि परिणामकारक आहे तशी ती मनोरंजकहि आहे. लोकोत्तर पुरुषांच्या चरित्रांतहि मनोरंजक व सामान्य लोकांचें मनोरंजन करतील अशा खाजगी गोष्टी घडाव्या यांत कांहीं विशेष आश्चर्य नाहीं. कारण सामान्य मनुष्याचें चरित्र पाहिलें तरी, त्याच्याबद्दल स्वतः त्याला किंवा इतरांना मनोरंजक वाटण्यासारखे अनुभव व प्रसंग येतच असतात. मग ज्याच्या चरित्रांत सामान्य लोकांत नसलेले गुणहि विकासित झालेले असतात त्याचे अनुभव मनोरंजक अशा विशेष रीतीनें प्रकट होणें स्वाभाविकच आहे. प्रस्तुत पुस्तक प्रायः एकाद्या हिंदी चरित्रावरून लिहिलें असावें असें प्रथम वाटतें; पण तें तसें नाहीं. तथापि चरित्र स्वतंत्रपणें व स्वयंस्फूर्तीनें लिहिलेलें असो किंवा कांहीं अन्य साधनांवरून लिहिलेलें

असो, त्यांतील प्रत्येक खंड हकिगतीच्या दृष्टीनें चांगलाच आहे, विवेचनाच्या आणि भाषेच्या दृष्टीनेंहि तो चांगला आहे. तारिख २३ दिसेंबर १९२६ रोजीं स्वामी श्रद्धानंद यांचा खून झाला आणि आज मे महिन्याच्या प्रारंभीं हें १२५ पानांचें पुस्तक लिहून छापून प्रसिद्ध होत आहे, यावरून रा. भोपे यांनीं याविषयीं किती परिश्रम केले असतील हें उघड दिसतें. स्वामीजींचा खून होऊन अवघे तीन महिनेहि न झाल्यामुळें त्यांच्या चरित्रवाचनाविषयींची उत्कंठा समाजांत आणि विशेषतः महाराष्ट्रीय समाजांत फार असणार यांत शंकाच नाहीं. ती प्रस्तुत चरित्रानें फार चांगली भागविली जाईलच, परंतु स्वामीजींच्या खुनामुळें ज्या शुद्धीसंघटनेच्या चळवळीस उलट विशेष जोरच आला, ती चळवळ चालू ठेवून वाढविणारांना या पुस्तकाचा फारच उपयोग होणार आहे. तात्पर्य, प्रस्तुत पुस्तक संग्रहणीय व आदरणीय झालें आहे असें मला वाटतें. म्हणून महाराष्ट्रांतील वाचक वर्ग या चरित्रग्रन्थाचा परामर्ष योग्य रीतीनें घेतील अशी मला आशा आहे.

पुणें ता० ६–५–२७ न. चिं. केळकर

# श्रीशंकराचार्य डॉ. कूर्तकोटी यांचा हिंदूंना बोध.

स्वामी श्रद्धानन्दजी आपल्या निर्भय व त्यागमय जीवनामुळें भारत वर्षाला आदर्शभूत होऊन राहतील यांत शंका नाहीं. निर्भयपणें व करारीपणानें हिन्दुधर्माची सेवा केल्यामुळेंच त्यांच्यावर हा प्रसंग ओढवला. श्रद्धानन्दजींच्या खुनामुळें केवळ आर्यसमाजाचीच हानि झाली नसून सर्व हिन्दुसमाज व वैदिकधर्म एका अत्यंत थोर धर्मसेवकास मुकला आहे; व ही हानि इस्लामी संस्कृतींतील घातकी व रानटी तत्त्वांमुळेंच झाली आहे. आधींच दुर्बल बनलेल्या हिन्दुसमाजावर अनुचित शांतीच्या उपदेशाचा मारा करण्याची जरूर नाहीं. इस्लामी संस्कृतींत अत्यंत रानटी व अमानुष अशीं तत्त्वें आहेत, निदान त्यांचा अर्थ मौलवींकडून तसा सांगितला जातो, म्हणूनच श्रद्धानन्दजींसारख्या थोर विभूतीचा बळी घेऊन अबदुल रशीदनें स्वतःस सद्गतीला पोंचण्याचा सोपा मार्ग पत्करला. अन्यधर्मीयांच्या जीवितांवर, स्त्रियांवर व देवतांवर अत्याचार करण्याची वृत्ति ज्या शिकवणुकींत आहे, तीं इस्लामी तत्त्वें भारत वर्षांतून नाहींशीं करण्याची प्रतिज्ञा केल्यावांचून गत्यंतर नाहीं. अशा रानटी समाजास परमतसहिष्णु अशा आर्य संस्कृतीचे अनुयायी बनविण्यासाठीं अविश्रांत श्रम करणें व दुसऱ्यावर अवलंबून न राहतां हिंदूंनीं स्वतः स्वसंरक्षणक्षम बनणें म्हणजेच श्रद्धानन्दजींच्या ऋणांतून मुक्त होणें आहे.

# अर्पणपत्रिका.

श्रीमत् जगद्‌गुरु श्रीशंकराचार्य डॉ. कूर्तकोटी
यांच्या ठायीं असलेल्या विद्वत्ता, धीरता,
समयज्ञता, परोपकारीपणा, हिंदुधर्मावरील
अढळप्रेम व स्वदेशनिष्ठा इत्यादि आदर्श-
भूत गुणांवर लुब्ध होऊन, विशेषतः
स्वामी श्रद्धानन्दजींनीं सुरूं केलेलें
शुद्धिसंघटन व अस्पृश्योद्धाराचें
कार्य धडाडीनें पुढें चालव-
ण्याचा श्रींचा कृतनिश्चय
पाहून श्रींच्या परवा-
नगीनें हें श्रद्धानंद-
चरित्र श्रींना अत्यंत
नम्र भावानें सम-
र्पण केलें आहे.

# हृदयनिवेदन.

महर्षि श्रद्धानन्दजींच्या चरित्रवाचनाची उत्कंठा त्यांच्या अमानुष खुनामुळें प्रत्येक हिन्दवासीयाच्या अन्तःकरणांत उत्पन्न झाली. स्वामींचें संपूर्ण चरित्र अद्यापि कोणत्याच भाषेंत प्रसिद्ध झालें नाहीं हें पाहून निदान महाराष्ट्रीय वाचकांपुढें तरी चरित्र ठेवावें या उद्देशानें चरित्रलेखनास जानेवारी महिन्यांत सुरवात केली. चरित्राची सामुग्री जुळवण्याकरतां व अत्यंत विश्वसनीय आधारावर चरित्र लिहिण्याकरतां तीन महिन्यांचा कालावधि लागला. आज हें चरित्र स्वतंत्रपणें प्रसिद्ध होत आहे. स्वामी श्रद्धानन्दजीकृत ' कल्याण मार्गपथिक ' या आत्मचरित्राचा १८९२ पर्यंतचा इतिहास, व ' संघटन ' या पुस्तकाखेरीज दे. भ. लजपतरायकृत ' आर्यसमाज ' या पुस्तकांचा चरित्रलेखनास बराच उपयोग झाला. स्वामींची कौटुंबिक माहिती व अन्यत्र न मिळणारी चारित्रविषयक माहिती स्वामींचे चिरंजीव प्रो. इन्द्र व स्वामींचे मेव्हणे कन्यामहाविद्यालयाचे आचार्य लाला देवराज यांनीं मोठ्या आस्थेनें पुरविली याबद्दल त्यांचे आभार मानतों.

रुग्णशय्येवर आसन्नमरण स्थितींत पडलेल्या माझ्या सत्यभामा नामक पत्नीनें माझ्या अस्वस्थ मनास उत्तेजित केलें नसतें तर हें चरित्रलेखनाचें कार्य पुरें होतें ना ! परंतु हें चरित्र पुरें झालेलें पाहण्याचें मात्र तिच्या नशिबीं नव्हतें. कारण ३२ पृष्ठें छापून झालीं होतीं; तेव्हांच तिनें ता. ६।४।२७ रोजीं आपला देह ठेवला. असो.

आदर्श संन्याशाचें चरित्र आदर्श शंकराचार्यांस अर्पण करावें ही माझी मनीषा श्रीशंकराचार्य डॉ. कूर्तकोटी यांनीं चरित्र अवलोकन करून चरित्र अर्पण करण्यास परवानगी दिल्यामुळें पूर्ण होत आहे. श्रींच्या या अनुग्रहाबद्दल मी श्रींचा अत्यत ऋणी आहे. महाराष्ट्राचे अभिजात पुढारी व मराठी भाषेचे धुरंधर लेखक श्री. दे. भ. तात्यासाहेब केळकर यांनीं प्रस्तावनालेखनास सवड काढण्याची कृपा केली याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. शेवटीं ज्या जगदीशाच्या कृपेनें मी हें कार्य करण्यास प्रवृत्त झालों, त्या परमेश्वराची प्रार्थना करून हें हृद्गत संपवितों.

६।५।२७ अहमदनगर.

आपला नम्र.
र. ग. भोपे.

## महर्षि श्रद्धानन्द महाराज.



अंतिम इच्छा

मी भारत देशांत पुन्हां जन्म घेऊन शुद्धिसंघटनाचें कार्य करणार !

३३३०.

# उपोद्घात

अहह ! महतां निःसीमानश्चरित्रविभूतयः ।

जन्ममृत्यूचें महाभयानक चक्र प्राणिमात्राच्या मागें एकसारखें लागलेलें आहे. प्रतिदिनीं लक्षावधि जीव जन्मास येतात व लक्षावधि जीव मृत्यूच्या महाभयंकर उदरांत विनाश पावतात.

साधारण प्रतीचीं माणसें जन्मलीं केव्हां व मेलीं केव्हां याची विचारपूस जग करीत नाहीं. पण कांहीं तेजस्वी नररत्नांच्या जन्ममृत्यूचें माहात्म्य अतिशय मोठें असतें. अशा नरशार्दूलांच्या जन्मदिवशीं आनंद मानणाऱ्या माणसांपेक्षां त्यांच्या मृत्युदिनीं शोकसागरांत बुडणाऱ्या मनुष्यांची संख्या किती तरी अधिक असते.

**उपजणें मरणें न चुके नरा । परत ये फिरुनी भंव भोंवरा ॥**

मनुष्यमात्रांस जन्ममृत्यूच्या भवभोंवऱ्यांतून फिरलेंच पाहिजे. **पुनरपि जननं पुनरपि मरणम्** । या उक्तीप्रमाणें जन्मानंतर मृत्यु व मृत्यूमागून जन्म असें जन्ममृत्यूचें रहाटगाडगें एकसारखें चालू आहे.

**तरिच जन्मा यावें ! दास ईश्वराचें व्हावें ॥**

जन्मास येऊन आपल्या कुटुंबाची, समाजाची, धर्माची व परमेश्वराची कांहीं अल्पस्वल्प सेवा मनुष्याच्या हातून झाली तरच जन्मास आल्याचें सार्थक्य होय.

**नाहीं तर काय थोडीं । श्वान सूकरें बापुडीं ॥**

श्वानसूकराप्रमाणें, किड्यमुंगीप्रमाणें प्रत्यहीं जन्मास येणारीं व प्रत्यहीं मरणारीं माणसें कांहीं थोडीं नसतात ! ज्यांच्या जन्मानें किंवा मृत्यूनें जगाची लाभहानि मुळींच होत नाहीं. अशांचा जन्म झाला काय किंवा मृत्यु झाला काय जगाला त्यांची काय पर्वा ? आणि अशा भूभारत माणसांची जगानें तरी कां पर्वा करावी ?

पण जगाकरतां जगणाऱ्या व जगाकरतां मरणाऱ्या परोपकाररत नरपुंगवाच्या मृत्युमुळें सर्व दुनिया दुःखोदधींत बुडून जाते. अशा पुण्य पुरुषांच्या चरित्रवाचनाकरितां लक्षावधि लोक उत्कंठित झालेले असतात !

ज्यांनीं अखिल मानववंशाच्या उन्नतीकरितां आजन्म अविश्रांत खटपट केली, ज्यांनीं ब्रह्मचर्याश्रमाचा पुरस्कार करून गुरुकुल विश्वविद्यालयाची स्थापना केली, ज्यांनीं वैदिकधर्मप्रसारार्थ अहर्निश परिश्रम केले, हिन्दुधर्मास भ्रष्टीकरणाची ओहटी लागली असतां ज्यांनीं संघटनाचा बंधारा बांधून शुद्धीचा नवीन प्रवाह हिन्दुमहासागरास जोडून दिला, या भारतभूमध्यें ज्यांनीं शैक्षणिक, सामाजिक, आध्यात्मिक, धार्मिक व राजकीय अशा सर्वांगीण उन्नतीकरतां आजन्म श्रम केले, ज्यांनीं संन्यासी असून सुद्धां '**हें विश्वचि माझें घर**' अशी वसुधैव कौटुंबिक वृत्ति ठेवून जगाच्या कल्याणाकरितां अप्रतिहत श्रम केले, आपल्या आचरणानें, व कृतीनें जे जगास आदर्शभूत झाले त्या महर्षि श्रद्धानन्द महाराजांच्या चरित्रलेखनास पात्रापात्रतेचा विचार न करतां स्वामींचा एक अनन्य भक्त, नम्र अनुयायी म्हणूनच आपल्या गुरुचरणांवर आपल्या श्रद्धासुमनांची अंजलि समर्पण करावी या पवित्र हेतूनें मीं चरित्रकथनास लेखणी उचलली आहे.

**पवित्र होईन चरित्रउच्चारें ।**

या भगवद्भक्त तुकारामांच्या उक्तीप्रमाणें स्वामींचें चरित्र लिहून आत्मकल्याण साधण्याकरितां हा अल्पसा प्रयत्न आहे. माझ्या सारखे स्वामींचे शेंकडो भक्त व अनुयायी या हिंदुस्थानांत आहेत त्यांना या चरित्रवाचनानें लाभ होईल. या दृढ आशेनें माझ्यासारख्या स्वामींच्या भक्तास व अनुयायास स्वामी श्रद्धानन्दजींचें जीवनामृत माझ्या शब्दरूप मृण्मयपात्रांतून अर्पण करीत आहें. वाचक बंधुभगिनींनीं मृण्मयपात्राच्या दोषाकडे सदय अन्तःकरणानें बघून हंसक्षीर न्यायानें हें चरित्रामृत प्राशन करावें अशी सविनय विनंति आहे.

वर्षप्रतिपदा
१८४९ } र. ग. भोपे.

॥ ॐ ॥

# महर्षि श्रद्धानन्द महाराज

## यांचें जीवनचरित्र.

## श्रद्धाञ्जलि १ ली.

### जन्म व कुलवृत्त.

परिवर्तिनि संसारे मृतः को वा न जायते ।
स जातो येन जातेन याति वंशस्समुन्नतिम् ॥ भर्तृहरि ।
मापर पूत पितापर घोडा । बहुत नहि तो थोडा थोडा ।

शिवनेरीवर हिंदवी स्वराज्याचें तोरण लावणाऱ्या शिवछत्रपति शिवाजी महाराजांची शिवशाही नष्ट झालेली होती. पेशवाईची प्राण-प्रतिष्ठा करणाऱ्या प्रतापी पेशव्यांच्या प्रबलतेचा प्रभाव नाहींसा झालेला होता. रजपुतांची राजशक्ति रसातळास गेलेली होती. मोगलांचा मंगल-ग्रह म्लानमुख झाला होता. मस्त मुसलमानांना चारी मुंड्या चीत करून नामोहरम करावयास लावणाऱ्या मराठ्यांच्या मनगटांतील मर्दुमकी मृतवत झालेली होती. शिखानष्ट यवनी शहानशहांची पादशाही पादाक्रांत करून शिखशाही स्थापन करणाऱ्या शिखाधीश रणजितसिंहाची रणगर्जना ऐकू येईनाशी झाली होती. हातीं तराजू घेऊन वाणिज्य वृत्तीचें वेड पांघरणाऱ्या व या आच्छादनाखालीं साम्राज्यसत्तेची अभिलाषा धरणाऱ्या इंग्रजांचा सत्ता हिंदुस्थानांत प्रस्थापिली जात होती.

जिकडे तिकडे अशांतता, जिकडे तिकडे झोटिंग पादशाही, बळी तो कानपिळी या न्यायानें जुलूम, जबरदस्ती, दंगेधोपे इत्यादींचा कहर गुदरला होता. नानापंथांच्या, नानामतांच्या गडबडी, दंशाला, धमाला

कोणीच त्राता न उरल्यामुळें व चोहोंकडे अविद्यांधःकार पसरल्याकारणानें लोकांची त्राही भगवान् अशी अनुकंपनीय स्थिति झालेली होती.

अशा प्रक्षुब्ध व परिवर्तनीय काळीं आमच्या चरित्रनायकाचा जन्म झाला. पंजाब प्रांतांतील जालंदर नांवाच्या जिल्ह्यामध्यें सतलज नदीच्या तीरावर तलवन नामक उपनगरामध्यें, नानकचंद्रजी नांवाच्या क्षत्रियास ( सन १८५६ सालीं ) विक्रमसंवत् १९१३ च्या फाल्गुन वद्य त्रयोदशीच्या दिवशीं पुत्ररत्न झालें. तेच आमचे चरित्रनायक होत. या बालकाचें जन्मनाम बृहस्पती व व्यावहारिक नाम मुन्शीराम असें ठेवण्यांत आलें. नानकचंद्रजीस चार पुत्र व दोन कन्या अशीं एकंदर सहा अपत्यें होतीं. त्यांपैकीं आमचे चरित्रनायक मुन्शीरामजी सर्वांत धाकटे होत.

पूर्वजन्मींचे संस्कार वर्तमान योनीस कारणीभूत होऊन त्याप्रमाणें मनुष्यमात्रास भलेबुरे आईबाप मिळतात. मातापित्यांच्या गुणावगुणांचा विशेष प्रभाव संततीवर पडतो. या पैतृकसंस्कारामुळें मानवजीवनाचीं पुष्कळ गूढ-प्रमेयें सुलभ होतात, म्हणून मुन्शीरामजींच्या कांहीं विशिष्ट गोष्टींचा उल्लेख करणें इष्ट आहे.

आमच्या चरित्रनायकाचें कुळ गुणकर्मानें व जन्मानें क्षात्रकुल म्हणून प्रामुख्यानें संबोधिलें जात होतें. तरी तें भक्तिप्रधान होतें, आपण आतां आमच्या चरित्रनायकास संन्यासावस्थेपूर्वीं संबोधिल्या जाणाऱ्या "मुन्शीराम" या नांवानें संबोधूं. मुन्शीरामजींच्या प्रपितामहाचें ( पणजोबाचें ) सुखानंद असें नांव होतें. त्यांच्या सदा प्रसन्नवदन मुखावर शांति व कांति यांचें वास्तव्य असे. त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव कपुर्थळ्याच्या राजाच्या वतीनें पंजाबकेसरी महाराणा रणजितसिंहाचे दरबारीं वकील होते. पुत्रानें बांधिलेल्या शिवमंदिरांत सुखानन्दजी प्रत्यहीं दोन वेळां नियमपूर्वक शिवपूजा करीत असत.

मुन्शीरामजींचे पितामह लाला गुलाबराय हे मोठे हरिभक्त होते. प्रातःकाळीं ब्राह्ममुहूर्तावर उठून प्रातर्विधि व स्नान करून ते 'सुखमनी' व भगवद्गीता या ग्रंथांचा पाठ म्हणत असत. ते अतिशय निर्भय व स्पष्टवक्ते होते.

अशा ईश्वरभक्त निर्भयवीर गुलाबरायांचे पोटीं मुन्शीरामजींच्या वडिलांचा नानकचंद्रजींचा जन्म झाला. आपल्या आजाच्या सहवासानें नानकचंद्रजी बालवयापासून शिवभक्त बनले होते. वयाच्या १४ व्या वर्षापासून नानकचंद्रजींनीं ब्राह्ममुहूर्तावर उठून शिवपूजेचें व्रत आमरण पाळलें. कपूर्थळ्याच्या वजीराबरोबर बोलाचाली होऊन त्यांनीं कपुर्थळ्याच्या ठाणेदारीचा राजीनामा दिला. आपल्या स्पष्टवक्तेपणामुळें आणखी एक दोन ठिकाणची नोकरी त्यांना सोडावी लागली.

विक्रमसंवत् १९१४ (सन १८५७) मध्यें भयंकर दुष्काळ पडला असतांना ते वडिलापासून एक कपर्दिकाही न घेतां लाहोरास सहकुटुंब येऊन राहिले, त्यावेळीं उपवर कन्येच्या विवाहाचा प्रश्न त्यांच्यापुढें दत्त म्हणून उभा राहिला. त्यांच्या मनांत चिंता उत्पन्न झाली. आपल्या नांवलौकिकास शोभेल अशा रीतीनें मुलीचा विवाह करण्याकरितां पैसा कसा संपादन करावा या विचारानें त्यांचें चित्त व्यग्र झालें. नशिबाची परीक्षा पाहण्याकरितां परमेश्वराचें स्मरण करून एका अश्वावर आरूढ होऊन त्यांनीं दिल्लीचा रस्ता धरला. मार्गावर लागलेल्या हिस्सार नगराला वेढा देऊन बसलेल्या बागी (पेंढारी) लोकांचें पारिपत्य करण्याचे कामीं त्यांनीं इंग्रजांस मदत केल्यामुळें त्यांना हिस्सार नगराची कोतवाली मिळाली. यानंतर मेंढावाटाचे लढाईत त्यांनीं इंग्रजांस मदत केली. क्षात्रधर्म पाळीत असतांना देखील त्यांनीं आपला शिवपूजापाठादि नित्य नियम सोडला नाहीं युद्धसमाप्तीनंतर लष्करी रिसाले काढून टाकते वेळीं सरकारनें देऊं केलेली १२०० एकर जमीन न स्वीकारतां क्षात्रवृत्तीस अनुसरून त्यांनीं पोलीस इन्स्पेक्टराचा पेशा पत्करला.

अशा भक्तिप्रधान निःस्पृह क्षत्रिय वीर नानकचंद्रजींच्या पोटीं आमच्या चरित्रनायकाचा जन्म झाला. पित्याची क्षात्रवृत्ति व निःस्पृहपणा आणि मातेची धर्मपरायणता व सहनशीलता मुन्शीरामजींच्या अंगीं आल्यास नवल नाहीं. **शुद्धबीजा पोटीं । फळें रसाळ गोमटीं ।** या उक्तीप्रमाणें या बालकाच्या हातून आपल्या घराण्यास साजशी कामगिरी झाल्यास नवल काय?

---

# श्रद्धाञ्जलि २ री.

## बाळपणाची लीला.

**यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ।**
**स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥**

मातापित्यांच्या चालीरीतीचा व स्वभावाचा मुलांच्या मनावर फारच तात्काळ परिणाम होतो. लहान मुलें अनुकरणप्रिय असतात. बालपणीं बालांची कोमलतरुतुल्य बुद्धि जशी वांकवावी तशी वांकते, व त्यांच्याकडून इष्ट कार्य करून घेतां येतें.

मातेच्या सहवासांत राहणाऱ्या बालकाच्या कोमल मनावर मातेच्या वर्तनाचे परिणाम होतात. माता हीच बालकाची आद्य गुरु होय! म्हणूनच मातृदेवो भव । असा वेदाचा उपदेश आहे. बरेलीला असतां मुन्शीरामजींची प्रथम तीन वर्षें त्यांच्या प्रिय मातेच्या व दोन भावंडांच्या सहवासांत गेलीं. त्यांचे ज्येष्ठ बंधु शिक्षकाजवळ शिकत असतां मुन्शीरामजी तेथेंच नाचत बागडत असत. त्यांचे वडील बंधु धडा पाठ करतां करतां थकत तरी त्यांच्याच्यानें लवकर पाठ न होणारा धडा मुन्शीरामजी खेळतां खेळतां ऐकत व घडाघड पाठ म्हणून दाखवीत. त्यांच्या स्मरणशक्तीला अगदीं बाल्यावस्थेपासूनच चालना मिळाली होती.

वडील जेव्हां कचेरींतून बाहेर कामास जात, तेव्हां मुनशीराम त्यांच्या बसण्याच्या जागीं खेळत बसत असत. तेव्हांपासूनच त्यांना खडा लष्करी सलाम येत असे, व त्याबद्दल त्यांना कचेरींतील मंडळीकडून, कागद लेखणी मिळत असे. एका छापील पुस्तकाच्या पृष्ठावर कागद ठेवून मुनशीरामजी कागदावर पुस्तकाचें छापील नांव गिरवूं लागलेले पाहून नानकचंद्रजी सकौतुकाश्चर्यानें म्हणाले, "अरे हा फारशी अक्षरें काढावयास कसें शिकला!"

## गुरुबिन ज्ञान न पावे भोला चेला !

आतांपर्यंत " सब गीता रगड मारी, और गुरु एकभी न बनाया" अशी मुन्शीरामजींची स्थिति होती. कोणत्याही एका शिक्षकाकडून त्यांना नियमपूर्वक शिक्षण मिळालें नव्हतें. माता व अन्य स्त्रियांच्या मुखांतून ऐकलेलें काशीमाहात्म्य त्यांनीं कंठस्थ केलें होतें, व पिताजींच्या नित्यपाठांपैकीं कांहीं स्तोत्रेंही त्यांनीं पाठ केलीं होतीं.

## जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ।

मातेच्या ममत्वपूर्ण शिक्षणानें, व लालनपालनानें मुलास मोठेपणीं महत्पद प्राप्त होत असतें. मुन्शीरामजींची माता जरी अशिक्षित होती व शिशुपालन आचारविचारशास्त्राचें तिला जरी पुस्तकावरून शिक्षण मिळालें नव्हतें तरी पण तिच्या अंतःकरणांत वसत असणाऱ्या मातृत्वशक्तीबरोबर संतानप्रेम व संतानरक्षणाचें ज्ञानही परमेश्वरानें तिला दिलेलें होतें.

मुन्शीरामजींचा मामा एक दिवस मदिराप्राशन करून हेलकावे खात घरीं येत असतांना त्याचे ते विचित्र हावभाव व भीषण मुद्रा मुन्शीरामजींच्या नजरेस पडूं नये व त्या कुदृश्याचा त्यांच्या कोमल मनावर अनिष्ट परिणाम होऊं नये म्हणून त्यांच्या प्रेमळ मातेनें त्यांना दुसऱ्या खोलींत नेलें. अशिक्षित मातृदेवतांमध्यें मातृप्रेमाच्या अगाध निधीबरोबरच शिशुपालनाचा स्वाभाविक विकास कसा होतो हें यावरूनच निदर्शनास येतें.

## जिच्या हातीं पाळण्याची दोरी। तीच देशातें उद्धरी ॥

आमच्या चरित्रनायकाच्या धर्मसेवेचें व देशसेवेचें बीज त्यांच्या मातेच्या या शिशुपालनामध्यें वसत होतें. आपला पुत्र सच्चरित्र व कर्तृत्ववान् निपजावा म्हणून त्यांच्या मातेनें आपल्या मातृशक्तीची पराकाष्ठा केली.

## उपनयन व शिक्षणाचा ओनामा !

प्राचीन काळची गुरुकुल–प्रथा बंद पडली होती, व यज्ञोपवीत संस्कार एक नाट्यप्रवेशच होऊन बसला होता. काशीला असतां संवत् १९२३ ( सन १८६६ ) च्या सुमारास मुन्शीरामजींचा यज्ञोपवीत संस्कार करण्यांत आला. परम पवित्र यज्ञोपवीत धारण केल्यानंतर वेदारंभाचा

विधि करण्यांत येऊन कौपीन धारण केल्यानंतर दंड हातीं घेऊन ब्रह्मचाऱ्याप्रमाणें "भीक्षां देहि" म्हणत काश्मीराला वेदाभ्यासास जावयाचें सोंग मुन्शीरामजींस घ्यावें लागलें. "भाऊ तुला येथेंच शिकवूं" असें त्यांची बहीण म्हणाली व काश्मीरला जाण्याचा नाटकी बेत रहित झाला.

नानकचंद्रजींनीं मुन्शीरामजीस शिकविण्यासाठीं एक शिक्षक नियत केला, व त्याच्या हातें मुन्शीरामजींस हिन्दी भाषेचा ओनामा शिकविण्यांत आला.

पिताजींस शिवपूजा करतांना पाहून मुन्शीरामजींनीं आपल्या भावाच्या साहाय्यानें एका पडक्या मंदिरांतून शिवलिंग घरीं आणिलें, व ते दोघे बंधू स्नानादि करून आपल्या पित्याप्रमाणें शिवलिंगपूजा करून त्यावर पुष्पबिल्वपत्रादि वाहून धूपदीप दाखवून देवास नैवेद्य अर्पण करूं लागले. मुन्शीरामजींच्या अंतःकरणामध्यें लहानपणापासूनच शिवभक्ति उत्पन्न झाली.

त्या दोघा बंधूंना नानकचंद्रजींनीं हिंदी पाठशाळेंत घातलें. नैमित्तिक धडे पाठशाळेंत शिकल्यावर घरीं येऊन मुन्शीरामजी तुलसीरामायण वाचीत असत. वर्ष सव्वावर्ष शिक्षणक्रम चालल्यावर त्यांच्या पित्याची बांदा जिल्ह्यामध्यें बदली झाली.

---

# श्रद्धाञ्जलि २ री.

## रामभक्तीचा मधुर रस.

**यस्तु संचरते देशान् यस्तु सेवेत पण्डितान् ।**
**तस्य विस्तारिता बुद्धिस्तैलबिन्दुरिवाम्भसि ॥**

बांदा जिल्ह्यामध्यें मुन्शीरामजींच्या शिक्षणाची भाषा हिन्दी ऐवजीं उर्दू झाली. परंतु ते घरीं तुलसीरामायण व महाभारताचा हिन्दी अनुवाद वाचीत असत. एका बुद्धभक्ताच्या सांनिध्यामुळें नानकचंद्रजींच्या व मुन्शीरामजींच्या मनावर व वर्तनावर फार चांगला परिणाम झाला.

बुद्धजी जातीनें वाणी होते. दररोज रात्रीं उच्चासनावर बसून ते रामायण वाचीत असत. त्यावेळीं ब्राह्मण चांभारादि झांज, टाळ, मृदंग घेऊन एका आसनावर बसत. "विष्णुमय जग । वैष्णवांचा धर्म ॥" या उक्तीप्रमाणें "उच्चनीच कांहीं नेणे भगवंत" अशी मनाची भावना धरून स्पृश्या-स्पृश्य श्रेष्ठकनिष्ठ भेद न पाळतां सर्व रामभक्त समान योग्यतेचे समजून क्षत्रिय पोलीस इन्स्पेक्टर, ब्राह्मण डेप्युटी कलेक्टर, किंवा अस्पृश्य झाडूवाला हे रामकथासुधारस प्राशन करण्याकरितां एका बैठकीवर बसत असत. बुद्ध भक्तजीच्या वाणीत माधुर्य व ओज असे. कथानुरोधानें येणाऱ्या वीर रसाच्या वेळीं श्रोत्यांचे बाहु स्फुरण पावत, व करुणरसाच्या वेळीं श्रोत्यांच्या नयनांतून अश्रुधारांची वृष्टि व्हावयास लागे.

या रामकथाश्रवणामुळें मुन्शीरामजी व त्यांचे वडील नानकचंद्रजी रामाचे भक्त बनले. नानकचंद्रजींचें रामायणावर एवढें प्रेम जडलें कीं बुद्ध-भक्ताप्रमाणें तेही रात्रीं रामायणावर कथा करूं लागले. जेथें जेथें ते जात तेथें तेथें रात्रीं नानकचंद्रजींची रामकथा श्रवण करण्याकरितां पुष्कळ मंडळी जमत असे फिर्यादी, आरोपी, वादी, प्रतिवादी, खुनी, चोर, गुन्हेगार देखील सर्व भेदाभेद व उच्चनीचता विसरून रामकथा श्रवणास जमत असत. एके समयीं नानकचंद्रजी प्रभुरामचंद्रजींच्या क्षमाशीलत्वावर बोलत असतां म्हणाले, "मनुष्यानें आपलीं पापें कबूल करून पश्चात्ताप दाखविणें हेंच खरें प्रायश्चित्त होय. भगवान् रामचंद्र शरणागतांचा कधींच त्याग करीत नाहीं." कथेच्या ओघांत नानकचंद्रजींनीं असें प्रतिपादितांच पकड-लेल्या गुन्हेगारांपैकीं एक धट्टा कट्टा पुरुष नानकचंद्रजींच्या पुढें साष्टांग नमस्कार घालीत म्हणाला.

**स्रवन सुजस सुन आयो प्रभु भंजन भववीर ।**
**त्राहि त्राहि आरत हरन सरन सुखद रघुवीर ॥**

रामकथेच्या श्रवणानें पश्चात्ताप होऊन नमन करणाऱ्या अपराध्यास नानकचंद्रजी उत्तरीत म्हणाले, "माझ्यासारख्या माणसाच्या पायां न पडतां प्रभु रामचंद्रजीस शरण जा."

" मलाच आपण श्रीरामचंद्रप्रभू सारखे आहांत" असें म्हणत त्या अपराध्यानें चोरी केल्याचें व खून केल्याचें कबूल केलें. तेव्हां त्या खुनी माणसाच्या मुखावर पश्चात्तापाची व समाधानाची विलक्षण क्रांति पसरली होती. खुनी दरोडेखोर चोरांसही अनुताप उत्पन्न करणाऱ्या प्रभावशाली रामायणावर पिताजींची रामकथा नित्य श्रवण करणाऱ्या मुन्शीरामजींची दृढ-भक्ति बसली.

चौदा वर्षांच्या वनवासामध्यें प्रभु रामचंद्रजींचें चित्रकूट पर्वतावर वास्तव्य होतें. प्रभुरामचंद्रजींचीं स्मारकस्थळें व तेथील राजांचे महाल व पूर्वकालीन ऐतिहासिक अवशेष मुन्शीरामजींना वडिलांबरोबर प्रवास करीत असतां पहावयास मिळाले. पण त्यामुळें शिक्षणांत व्यत्यय आला.

मिर्जापुराहून घोड्याच्या गाडींतून मुन्शीरामजी वडिलांबरोबर फत्ते-पुरास जात असतां गाडीवान घोडे बदलण्यास गेला आहे अशी संधि पाहून लुटारूंनीं त्यांच्यावर हल्ला केला. निबिड अरण्यांत गाडी रात्रीच्या वेळीं उभी, दुसरें कोणीही साहाय्य करण्यास जवळ नाहीं. चोरांचा एकदम हल्ला आलेला, अशा स्थितींत कोणाही साधारण माणसाचें धैर्य विगलित झालें असतें. भीतीमुळें त्याच्या हृदयास धडकी भरली असती, व शरीरास कंप सुटला असता.

" बाबांनों, आमच्या जवळील, सर्व चीजवस्तु, डागदागिने व द्रव्य घेऊन जा; पण आम्हास मारहाण करूं नका. आम्ही तुमच्या पायां पडतों, आम्हांला जीवदान द्या !" अशी प्रार्थना करीत आपलें सर्व वित्त चोरास देऊन आपलें जीवित सांभाळण्याकरतां कोणाही साधारण प्रतीच्या माणसानें चोरांच्या पायांवर डोकें ठेवून आपलें डोकें वाचविलें असतें. '**शीर सलामत तो पगडी पचास**' असें म्हणत त्यानें आपल्या आत्मसंरक्षणाचें वर्णन चार चौघांत मोठ्या प्रौढीनें केलें असतें.

पण मुन्शीरामजींचे वडील नानकचंद्रजी याचना करून आत्मरक्षण करणारे, व प्राण वांचविण्याची प्रौढी गाजवणारे प्रतापी शब्दशूर नव्हते. पेंढारी लोकांचें पारिपत्य करण्याचे कामीं त्यांनीं दोन वेळां इंग्रजांस साहाय्य केलें होतें. कित्येक वेळां प्रत्यक्ष युद्धाच्या धुमश्चक्रींत त्यांनीं शौर्य गाज-

विलें होतें. ते खरें क्षात्रिय होते. जातिवंत क्षत्रियत्वाचें रक्त त्यांच्या शरीरांत खेळत होतें.

चोरांचा हल्ला आला असतां ते मुळींच डगमगले नाहींत. हातांत पिस्तूल घेऊन त्यांनीं लुटारूंवर बार केला. त्या वेळीं मुन्शीरामजी केवळ १२—१३ वर्षांचें सरलमनस्क बाळ होतें. रात्रीच्या वेळीं असहाय्य असतां चोरांचा हल्ला आलेला पाहून त्या कोमल बालकाचें हृदय कंपित झालें. भीतीमुळें मुन्शीरामजींच्या अंगांत किंकर्तव्यमूढता आली असल्यास नवल नाहीं. मोठमोठ्या मिशीच्या माणसांची अशा समयीं मृतप्राय अवस्था होते.

## पित्याच्या तालमेंत क्षात्रशिक्षण.

पिस्तुलाचे बार होतांच चिडून जाऊन चोरांनीं त्यांच्यावर जोराचा हल्ला केला. पिस्तुलांतील भरलेल्या गोळ्या संपल्यावर आत्मसंरक्षण करणें कठीण जाईल हें जाणून नानकचंद्रजी मुन्शीरामजीस म्हणाले, “ बेटा मुन्शीराम, भिऊ नकोस ! ती बंदूक इकडे घे बघूं ! ”

वडिलांच्या या धीरात्मक भाषणानें मुन्शीरामजींची भीति दूर झाली. पित्यापासून प्राप्त झालेलें त्यांचें जन्मसिद्ध क्षात्रियत्व जागृत झालें, व आपल्या पित्याला त्यांनीं यथोचित साहाय्य केलें. पिता रणावर शौर्य गाजविणारा रणधुरंधर क्षात्रिय, माताही क्षत्रिय कन्या, अशा उभय क्षत्रिय कुलांत जन्म घेणाऱ्या मुन्शीरामजींच्या अंगांत क्षात्रतेज खेळत होतें. व पहिल्याच हल्ल्यांत बालवयामुळें किंचित गांगरलेला हा सिंहाचा छावा पित्याच्या उपयोगी पडला व त्याच्या यथोचित साहाय्यानें चोर पळून गेले. अशा रीतीनें मुन्शीरामजीस बंदूक वापरण्याचा ओनामा पित्याच्या हस्तानें मिळाला. मुन्शीरामजींच्या हातून कित्येक वेळां अनाथ अबलांचें व असहाय्य माणसांचें दुष्ट लोकांपासून जें रक्षण झालें व त्यांच्या धैर्याची पुढें जी दिगंत कीर्ति झाली त्याचें बीजारोपण पित्या समवेत आत्मसंरक्षण करण्याच्या या प्रसंगीं झालें.

यानंतर मुन्शीरामजी वडिलाबरोबर विंध्य पर्वतावरील विंध्यवासिनी देवीचा नवरात्रामधील होणारा उत्सव पाहण्यास गेले. या उत्सवांत

हजारों बकऱ्यांची देवी पुढें बळी म्हणून हत्या होत असे. त्यांच्याजवळ जोखु मिसर या नांवाचा विलक्षण धार्मिक सेवक होता. पोलिसइन्स्पेक्टर साहेबांच्या या जोखु सेवकास देवीपुढील सात बकऱ्यांचीं मस्तकें पोटपुजेकरितां मोफत मिळत. मस्तकें मुफत, पुष्पें मुफ्त, कण्डे (गवऱ्या) मुफ्त, मातीचें मडकें मुफ्त, हळद मीठ पीठ सुद्धां मुफत. या मोफत मिळालेल्या मालाचा जोखु मिसर एका वेळेस फन्ना उडवीत असे.

अशा अल्पाहारी अहिंसक ( ? ) वृत्तीच्या जोखु मिसराच्या चुलीतून चिलमीकरतां चिमट्यानें अग्नि उचलणाऱ्या अन्य सेवकावर क्रुद्ध होऊन जोखु म्हणाला " काय अधर्म हा ! आम्हीं आमचा धर्म कधींच सोडला नाहीं. खोटें बोललों, जुव्वा खेळलों, गांजाचे दम मारले, दारू प्यालों, लांच खाल्ली, चोरी, दगाबाजी, खून, मारामाऱ्या केल्या, पण विटाळलेल्या अग्नीवर शिजलेलें अन्न कधींच खाल्लें नाहीं. "

या महाधार्मिक जोखु मिसराचे वरील उद्गार ऐकून मुन्शीरामजींस हंसू आलें. त्यांना जोखूच्या विचित्र धर्मकल्पनेची कींव आली. जोखु अशिक्षित होता म्हणून त्याच्या वेडगळ धर्मकल्पनेचें मुन्शीरामजींस विशेष आश्चर्य वाटलें नाहीं. पण थोरकुलांतील सुशिक्षित व संभावित राजपत्नीला देवीपुढें नग्नपणें देवीची पूजा करतांना पाहून मात्र असल्या गर्भश्रीमंत गृहस्थांच्या स्त्रियांच्या वेडगळ धर्मकल्पनेबद्दल बाल मुन्शीरामजींच्या मनांत घृणा उत्पन्न झाली. पित्याबरोबर प्रवास करतांना मुन्शीरामजींना जगाचा अनुभव मिळाला खरा, पण त्यांच्या पाठ्यप्रणालींत मात्र यामुळें व्यत्यय आला.

ठाणे

# श्रद्धाञ्जलि ४ थी.

## काशीमध्यें वास्तव्य.

गंगातोयेन कृत्स्नेन मृद्भारैश्च नगोपमैः ।
आमृत्योः स्नातकश्चैव भावदुष्टो न शुध्यति ॥

"काशीस जावें नित्य वदावें" या म्हणीवरून काशीस जाणें किती पुण्यप्रद समजलें जातें हें सहज समजलें जातें. आपल्या आयुष्याचा शेषभाग व्यतीत करण्याकरतां व तेथें प्रत्यहीं गंगास्नान करून काशीविश्वनाथाचें दर्शन घेत असतां मृत्यु आल्यानें मोक्ष मिळावा, या हेतूनें श्रीमंत धार्मिक वृद्ध हिंदु लोक काशीमध्यें रहावयास जातात. **काश्यां मरणान्मुक्तिः** या प्रसिद्ध उक्तीप्रमाणें हिंदु धर्मीयांचा समज आहे.

मुन्शीरामजींच्या मातोश्रीला काशीमध्यें निवास करण्याची उत्कट इच्छा संवत् १९२८ (सन १८७१) मध्यें नानकचंद्रजींची बदली काशीस झाल्यामुळें अनायासें तृप्त झाली. आरंभीं त्यांनीं कपुर्थळ्याच्या संस्थानाधिपतींच्या धर्मशाळेंत वास्तव्य केलें. मातेबरोबर मुन्शीरामजीहि गंगास्नानास गेले.

प्रातःकालचा सुमंगल व आल्हाददायक समय ! गंगास्नानाकरतां जाणाऱ्या हिंदु स्त्रीपुरुषांनीं व बालकबालिकांनीं गंगेचे घाट अगदीं फुलून गेलेले होते. संकल्प सांगण्यांत पंडे लोकांची एकच गर्दी उडालेली ! ब्राह्मण, यति, संन्यासी एका बाजूस घाटावर ध्यानधारणेंत निमग्न झालेले ! 'गंगा माताकी जय ।' असा पवित्र ध्वनि गंगेचें सर्व पात्र निनादित करून सोडीत होता. गगनाचें मनोहर चित्र परावर्तित करणारें, व भगवान् सूर्यनारायणास जलशयांत आनंदानें नाचावयास लावणारें गंगेचें रमणीय पात्र ! हें दृश्य कोणाही प्रवाशास सहज प्रसन्नवदन करील !

एकामागें एक पांचपांच सातसात मजल्याच्या आकाशांत आपलीं मस्तकें प्रौढीनें उंच करणाऱ्या चढत्या उत्तुंग इमारती, गगनचुंबित माधवदास, मिनार, इत्यादि घाटावरून दिसणाऱ्या मनोहर दृश्यानें मुन्शी-

रामजींचें अंतःकरण प्रमुदित झालें. बालवयांत पाहिलेलें हें काशीचें आल्हादजनक दृश्य त्यांच्या नेहमीं दृष्टीसमोर असे. त्यांनीं आपल्या आत्मचरित्रांत त्यावेळेच्या काशीच्या आचारविचारांचा पुढें लिहिल्याप्रमाणें उल्लेख केला आहे.

**रांड, सांड, सिडी, संन्यासी ।**
**इनसे बचे तो सेवे काशी ॥**

भावार्थ---वारयोषिता, पोळ, शिड्या व संन्यासी यांच्यापासून बचाव झाल्यासच काशीच्या पुण्यमय वास्तव्याचा लाभ व्हावयाचा !

राजे रजवाडे, अमीर उमराव व धनवान लोक वृद्धापकाळीं काशीविश्वनाथाचें दर्शन घेऊन मोक्ष मिळावा म्हणून येत असत. परंतु सदाचारी लोकांबरोबर दुराचारी लोकही स्त्रियांना पळवून आणून काशीमध्यें धर्माच्या नांवाखालीं पर्वतप्राय पापें करीत. काशींतील लोकांना बिघडलेल्या विधवांचें व अन्य व्यभिचारी महिलांचें फारच भय असे. याशिवाय शेंकडों बैल विश्वनाथाचें वाहन म्हणून पोळ सोडले जात. या पोळांपासून व रस्त्यांत येणाऱ्या इमारतीच्या शिडीवजा जिन्यांपासून यात्रेकरूंना अतिशय उपद्रव पोंचत असे.

पण या सर्वांपेक्षां त्या समयींचे काशींतील संन्यासी अधिक बाधक होते. हें पुढील लोकोक्तीवरून सिद्ध होईल, व त्यायोगें त्यांच्या आचरणावरही योग्य तो प्रकाश पडेल.

**जगद्गुरु ब्राह्मण ब्राह्मण गुरु संन्यासी, संन्यासी गुरु चपरासी ।**

भावार्थः—सर्व जगाचे गुरु ब्राह्मण, ब्राह्मणांचे गुरु संन्यासी, व संन्याशांचे गुरु चपरासी ( चांभार. )

कोणत्या प्रतीच्या लोकांचे गुरु चांभार होऊं शकतात याची कल्पना केल्यास स्त्रिया व पुरुष यांच्या पुण्य मार्गांत त्या वेळचे संन्यासी किती व्यत्यय आणीत असतील हें सहज समजण्यासारखें आहे.

**" कैसे खलर कजरीया आप नए कुतवाल ! "**

मामलेदार कलक्टर यांपेक्षां पोलिस इन्स्पेक्टरचें (कोतवालाचें) त्या दिवसांमध्यें विशेष माहात्म्य असल्याकारणानें वरीलप्रमाणें पद स्त्रिया म्हणत असत अनाचारी व्यभिचारी स्त्रीपुरुषांना इतर अधिकाऱ्यांपेक्षां कोत-

चालाचें विशेष भय असे. नित्य नवे रंग ढंग करणाऱ्या रंगेल रागिणी वरील पद रागासुरांत म्हणत. रासक्रीडेला, कृष्णलीलेला व कृष्णकृत्याला कोतवाल कधीं मनाई करील याचा नियम नसल्यामुळें या स्वैरवृत्तीच्या नरनारींच्या लीलेंत व्यत्यय येई!

सारांश त्या वेळचें काशी क्षेत्र पुण्यक्षेत्रापेक्षां पापक्षेत्रच होतें असें म्हणणें भाग आहे. गंगेच्या संपूर्ण जलानें जन्मभर स्नान करीत राहिलें, पर्वतप्राय भस्म अंगावर फासलें आणि अंतःकरण दुष्ट भावनांनीं भरलेलें असलें तरी शुद्धता होत नाहीं. **अद्भिर्गात्राणि शुध्यन्ति** गंगाजलानें केवळ बाह्य शुद्धि होईल, सदाचारानें व सत्यानें मनाची शुद्धि होते.

**अंतरीं निर्मळ। वाचेचा रसाळ। त्याचे गळां माळ असो नसो॥**

अंतर्बाह्यशुद्धि झाल्याविना पुण्य कसें होईल व मोक्ष कसा मिळेल?

मुन्शीरामजींच्या वडिलाकडे येणाऱ्या लोकांचे व त्यांचे स्वतःचे गाडीघोडे दाराशीं सदा उभे राहात. नोकराचाकरांची अनुकूलता, व काशीला नित्य नव्या मौजेची विपुलता, यामुळें मुन्शीरामजींना नित्य नवी मौज पहावयास मिळे. कधीं दुर्गादेवीचें दर्शन, कधीं गौनहारियांचा नाच, तर कधीं अन्य चित्रविचित्र दृश्य पहातां पहातां मुन्शीरामजींचा समय व्यतीत होत असे. रामलीला पाहण्यांत, व पितृपक्षांत पुऱ्या कचोऱ्या, मेवामिठाइ व फळफळावळ खाण्यांत मुन्शीरामजींचे पुष्कळ दिवस निघून गेले. दसरा संपला तरी लिहिणें वाचणें बंद, म्हणून मुन्शीरामजींना ' करणघण्टा ' नामक पाठशाळेंत पाठविण्यास सुरवात झाली, व चौथ्या श्रेणींत त्यांचें नांव दाखल झाल्यावर अभ्यासक्रम पूर्ववत् सुरू झाला.

काशीमध्यें रहात असतां मुन्शीरामजी दररोज प्रातःकाळीं उठून प्रातर्विधि संपवून व्यायाम घेतल्यावर गंगास्नान करून काशीविश्वनाथाचें दर्शन घेत असत. गंगेहून येतांना मार्गांत लागणाऱ्या शिवलिंगावर झारींतून एकदोन जलबिंदु टाकीत. काशीविश्वनाथ, महावीर, अन्नपूर्णा, गणेश, धुंडिराज इत्यादि देवांची श्रद्धाभक्तिपूर्वक चंदनअक्षता, धूपदीप नैवेद्यादि साधनांनीं यथासांग पूजा करीत घरीं येत असत. त्यांच्या धार्मिक व श्रद्धावान् अन्तःकरणास काशीमध्यें योग्य कार्य

मिळालें. शिक्षणाबरोबर व्यायाम, गंगास्नान, काशीविश्वनाथाचें दर्शन व देवपूजा या कार्यांत मुन्शीरामजींचे काशीमधील दिवस मोठ्या आनंदांत व समाधानांत हां हां म्हणतां निघून गेले. परंतु पुढें थोड्याच दिवसांनीं त्यांच्या वडिलांची बदली बालिया जिल्ह्यांत झाल्यामुळें त्यांना व त्यांच्या मातेला मोठ्या कष्टानें काशी सोडणें भाग पडलें.

---

# श्रद्धाञ्जलि ५ वी.

## शिक्षणास नियमपूर्वक आरंभ.

**सुखार्थिनः कुतो विद्या कुतो विद्यार्थिनः सुखम् ।**
**सुखार्थी वा त्यजेद्विद्यां विद्यार्थी वा त्यजेत्सुखम् ॥**

नाचण्याबागडण्यांत, ठिकठिकाणची मजा पाहण्यांत, वडिलांबरोबर प्रवास करण्यांत, मुन्शीरामजींचा आतांपर्यंतचा काळ मोठ्या सुखांत गेला. **बारा वर्षें बाळपण । तेंहि वेंचिलें अज्ञानें ।** या उक्तीप्रमाणें त्याचें बाळपण सुखोपभोगांत व्यतीत झालें.

थोडें या गुरूजवळ कधीं उर्दु तर कधीं हिंदी व इंग्रजी असें खिचडीवजा शिक्षण त्यांना ह्या वेळपर्यंत मिळालें. विद्येच्या मागें लागणाऱ्यानें सुखास पाठमोरें झालें पाहिजे किंवा सुखार्थी बनणाऱ्यानें विद्येस पारखें झालें पाहिजे. हट्टपणा व सुखोपभोग यांमुळें मुन्शीरामजींच्या बालपणांत शिक्षणाची बरीच उपेक्षा झाली. त्यांच्या वडिलांना आपल्या व्यवसायामुळें आपल्या पुत्राच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष देण्यास फावलें नाहीं. तरी पण बलियास जातांच मुन्शीरामजीला पांचव्या यत्तेंत घालण्यांत आलें. त्यांचें चित्तही शिक्षणांत लागूं लागलें. त्यांच्या इंग्रजी शुद्धोच्चारित भाषणाबद्दल त्यांना एका इंग्रज परीक्षकानें पारितोषिक दिलें.

पुस्तकी शिक्षणाबरोबर मुन्शीरामजी नियमितपणें शारीरिक शिक्षणही मनःपूर्वक घेऊं लागले. शामसिंह नांवाच्या क्षत्रियाजवळ कुस्ती

खेळण्यास व अजितसिंहाजवळ फरीगदगा, लाठी व तलवारीचे हात करण्यास मुन्शीरामजी शिकले.

उच्च शिक्षण नियमितपणानें कोणताही व्यत्यय न येतां संपादन करतां यावें म्हणून मुन्शीरामजीस पिताजींनीं पुन्हां काशीस पाठविलें. **विद्याविहीनः पशुः।** काशी त्या वेळीं शिक्षणाचें प्रमुख केंद्र म्हणून समजली जात असे. निरनिराळ्या ठिकाणचे विद्यार्थी विद्यार्जनाकरितां काशीस येत असत. काशीमधील क्वीन्स कॉलेजाची त्या वेळीं उच्च कोटीचें विद्यालय म्हणून ख्याति होती. संवत् १९३० ( सन १८७३ ) च्या पौषमासीं या विद्यालयाच्या पाठशाळा विभागांत मुन्शीरामजींचा प्रवेश झाला. या पाठशाळेंत संवत् १९३४ च्या ज्येष्ठ महिन्यापर्यंत सुमारें चार वर्षें मुन्शीरामजींना नियमितपणें शिक्षण मिळालें. अन्य शाळेच्या शिक्षकवर्गापक्षां या पाठशाळेचा शिक्षकवर्ग अधिक योग्यतेचा होता. विशेषतः त्या पाठशाळेचे मुख्याध्यापक बाबू मथुराप्रसाद मिश्र हे अतिशय विद्वान् शुद्धाचरणी व अत्यंत साधे असे योग्य गृहस्थ होते त्यांच्या शुद्धाचरणाचा तेथील विद्यार्थी वर्गावर बराच परिणाम होऊन ते आचारवान् बनत असत.

## व्यावहारिक परिवर्तन.

**गंगा गये गंगादास। जमुना गये जमुनादास॥** मुन्शीरामजींच्या स्वभाव वरील उक्तीप्रमाणें किंवा '**पानी तेरा रंग कैसा; जिसमें मिलाया वैसा।**' असा बनला होता बलीयाला असतांना तेथील माणसांमध्यें ते भोजपुरी भाषा बोलण्यास शिकले व ते तेथील सरदारी मस्ती दाखविणारा ऐटबाज सरदारी पोशाख करीत असत. काशीला जातांच त्यांच्या जीवनप्रवाहाला निराळ्या दिशेनें गति मिळाली. त्यांच्या अंगची पूर्वीची हुकूमतीच्या मस्तीची निशा काशीस येतांच नष्ट झाली त्यांच्या डोक्यावरील पूर्वीच्या ऐटबाज फेट्याऐवजीं बनारसी टोपी बसली व काशीच्या सीधा साधा पोशाखाचा अंगीकार करून ऐटदार सरदारी पोशाखाचा त्यांनीं त्याग केला.

'**विद्या विनयेन शोभते**' या उक्त्यनुरूप विनयी विद्यार्थ्यांच्या

सुसंगतीमध्यें मुन्शीरामजींचा सरदारी बाणा जाऊन ते एक विनयशील विद्यार्थी बनले. संगतीचा माहिमाच असा विलक्षण आहे. बाह्य परिवर्तनाबरोबरच मुन्शीरामजींच्या अंतरंगांतही परिवर्तन झाल्याविना राहिलें नाहीं. त्यांच्या आंतर संकल्पाचें व आशेचें सर्व चित्र बदलून गेलें. प्रातःकाळीं ६ वाजतां उठण्याऐवजीं ते ब्राह्म मुहूर्तावर चार वाजतां उठूं लागले; व गंगास्नानास जाऊं लागले. पूर्वक्रमानुसार परत येतां येतां ते काशी विश्वनाथाची व अन्य देवतांची पूजा करीत स्वगृहास येत व अर्धा तास व्यायाम घेतल्यावर दुग्धपान करून अडीच तास एकाग्रतेनें नैमित्तिक अभ्यास करून पुढें भोजन घेऊन ते शाळेस जात. सायंकाळीं वायूसेवनार्थ नगराबाहेर जात. येतां येतां परत देवदर्शन करीत. घरीं आल्यावर भोजन केल्यावर तासभर गप्पा मारल्यावर ९ च्या सुमारास झोंपीं जात असत. काशीमध्यें ( सन १८७३ ) साल भर त्यांचा असा नियमितपणें क्रम चालला होता. मुन्शीरामजीला मातापित्याप्रमाणें सुडौल शरीर व लांबलचक हात पाय जन्मतःच प्राप्त झाले होते. नियमित व्यायामानें व कुस्ती, फरीगदगा, लाठी वगैरे कसरतीनें त्यांनीं आपलें शारीरिक बल वाढविलें होतें. त्यांना आतांशी कोठें कुमारावस्था संपून युवावस्था प्राप्त व्हावयास लागली होती. फिरण्यामुळें व अन्य व्यायामामुळें त्यांनीं आपलें शरीर काटक केलें होतें. आपल्या शक्तीचा त्यांना योग्य अभिमान वाटूं लागला होता. पण फिरावयास जातांना बनारसी गुंडाप्रमाणें ते आपल्या कमरेला सुरी खोवून जात, तरी बनारसी गुंडाप्रमाणें परपीडेंत प्रसन्नता मानणारे ते बनले नाहींत. आपल्या शक्तीचा त्यांनीं चुकून कधींही दुरुपयोग केला नाहीं. बनारसी गुंड विद्याविहीन पशुवत् असल्यामुळें परपीडनांत पाप न मानतां प्रसन्नता मानीत; तर विद्यासंपन्न विनयी मुन्शीरामजी परदुःखनिवारण करण्यांत सुख मानीत.

एके दिवशीं एका मुलाच्या मागें कित्येक गुंड लागले असतां त्या गुंडांच्या हातून मुन्शीरामजींनीं आपल्या बालवयांत त्या मुलाची सुटका केली होती. पण आत्म-संरक्षण व अनाथ-संरक्षण करण्याच्या कामीं त्यांना आपल्या शरीरबलाचा पुष्कळ वेळां उपयोग झाला.

असें जरी होतें तरी मुन्शीरामजींचा स्वभाव अत्यंत विनयी, लाजाळू व सहनशील बनला होता. आपल्या भिडस्त व सहनशील स्वभावामुळें दुसऱ्यांचे आरंभीं आरंभीं त्यांना अत्याचार सहन करावे लागत. ही त्यांच्या स्वभावांतलि पहिली निर्बलता होती. त्यांच्या सहनशीलतेची व दुसऱ्यांच्या अत्याचारांची पराकाष्ठा होई, तेव्हांच ते त्या गुंडांना अत्याचारापासून निवृत्त करण्याकडे लक्ष देत असत पण पाप्यांना यामुळें पापप्रवाहांत वहून जाण्यास समय मिळे. कारण ते मुन्शीरामजींच्या क्षमाशील स्वभावास निर्बलता समजत असत. पण प्रतिपक्षाचा प्रतिकार करण्यास जेव्हां ते अचानकपणें तयार होत तेव्हां मात्र त्यांच्या या स्वभावाच्या परिवर्तनानें प्रतिपक्षाची गाळण उडे पण त्यांच्या या आरंभीं क्षमाशील व नंतर प्रतिकारक्षम स्वभावामुळें त्यांच्या शत्रूंची संख्या मात्र वाढत असे.

---

# श्रद्धाञ्जलि ६ वी.

## पापाची पाऊलवाट !

**अविद्यायामन्तरे वर्तमानाः स्वयं धीराः पंडितम्मन्यमानाः।**
**दंद्रम्यमाणाः परियान्ति मूढाः अन्धेनैव नीयमाना यथान्धाः ॥**

आमच्या चरित्रनायकाचें आतांपर्यंतचें जीवन स्वैरपणांत व आनंदांत जरी गेलें होतें तरी आतांपर्यंत त्यांत प्रत्यक्ष पापाचा किंवा दुराचाराचा मुळींच संबंध आला नव्हता. आतांपर्यंत मुन्शीरामजी या जगास पवित्रमयच समजत आले होते. परंतु यापुढें मात्र कुसंगतीच्या परिणामामुळें त्यांच्याकडून कुमार्गाकडे पदार्पण करण्यास सुरवात झाली.

**ढेकणाच्या संगें हिरा जो भंगला ।**
**कुसंगें नाडला साधु तैसा ॥**

संगतीचा महिमा महाविलक्षण आहे. माणसास सत्संगामुळें उच्चत्व प्राप्त होतें. सुसंगतीमुळें नराचा नारायण बनतो तर कुसंगतिदोषामुळें पुरु-

षांच्या हातून पिशाच्यासमान किंवा पशुसमान दुष्कृत्यें होतात. ढेकणाच्या संगानें अत्यंत कठिण व मूल्यवान हिरा सुद्धां भंगतो. तसाच कुसंगामुळें साधूही साधूत्वापासून च्युत होतो.

मुन्शीरामजींचा नुकताच युवावस्थेंत प्रवेश होऊं लागला होता. भल्या बुऱ्या युवक मंडळींचा घोळका सदा त्यांच्या मागें असे. सुट्टीच्या दिवसांत ते आपल्या वडिलांच्या बलिया नामक गांवीं गेले. ते ज्यांच्याजवळ कुस्ती व लाठी, फरीगदगा खेळत असत, त्या अजितसिंग व शामसिंह नांवाच्या कसरत-बहादुरांच्या संगतीनें त्यांच्या आतांपर्यंतच्या आचरणांत बदल झाला. या मंडळींनीं नाच गायनाची बैठक मुनशीरामजीच्या घराजीक करण्याचें ठराविलें, व त्यांनीं नृत्यगायनाच्या जलशांत भाग घेण्याकारितां मुनशीरामजीस निमंत्रित केलें. त्यावेळीं मुनशीरामजी म्हणाले, ‘ पिताजी नाच तमाशे पहाण्यास कधींच जात नाहींत. मला त्यांच्याकडून या गायनांत सामील होण्यास आज्ञा मिळणें शक्य नाहीं. ’ परंतु त्या मंडळींच्या आग्रहामुळें मुनशीरामजी पिताजी निद्रावश झाल्यावर घरांतून गुपचुपपणें अंगावर केशरी आवरण घेऊन बाहेर पडून त्या जलशांत सामील झाले. पहिल्यानें त्यांच्या मनांत शंका कुशंका व लज्जादि भावना उत्पन्न झाल्या. परंतु इतर मंडळींबरोबर पान खातां खातां त्यांची लज्जा दूर झाली. रात्रीं ३ वाजतां जलसा समाप्त झाल्यावर ते गुपचुपपणें स्वगृहीं परत येऊन स्वस्थानीं निजले.

मुनशीरामजीस दुसरे दिवशीं पित्याशीं केलेल्या या प्रतारणेबद्दल पश्चात्ताप वाटला, त्यांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. पण वडिलांची क्षमा मागून प्रायश्चित्त घेण्याचें त्यांना धैर्य झालें नाहीं. अविश्वासाचा हा पहिला पडदा त्या पितापुत्रांमध्यें पडला. मुनशीरामजीवर त्यांचे वडील अत्यंत प्रेम करीत होते. व आपल्या सर्व पुत्रांपेक्षां नानकचंद्रजींचा मुनशीरामजीवर अधिक विश्वास होता. परंतु कुसंगतीमुळें सरलमनस्क मुनशीरामजींच्या हातून पापाच्या पाऊलवाटेवर एक पाऊल पडलें. सुटी संपताच मुनशीरामजी परत काशीला गेले व अभ्यासांत निमग्न झाले. सन १८७३ सालीं मॅट्रिकची परीक्षा नोव्हेंबर महिन्यांत होती. परीक्षा जवळ आल्यामुळें मुनशीरामजी सपाटून तयारी करूं लागले. त्यांनीं परी-

क्षेची पुरी तयारी केली. सोमवारपासून परीक्षा सुरू झाली. गुरुवारपर्यंत परीक्षेचे चार विषय पूर्ण झाल्यावर फारशी विषयाच्या परीक्षेचे वेळीं इंग्रजी विषयाची प्रश्नपत्रिका परीक्षेपूर्वी फुटली असल्यामुळें त्या विषयाची पुनः पुढील सोमवारीं परीक्षा घेण्यांत येईल असें जाहीर करण्यांत आलें.

मुनशीरामजींनीं सर्व विषय समाधानकारक रीतीनें लिहिले होते. व परीक्षेंत यश येण्याची त्यांना खात्री होती, पण त्यांना पिताजीकडून पत्र आल्यावर पितृग्रामीं जाणें भाग पडलें. व पुढील सोमवारीं पुन्हा होणाऱ्या इंग्रजीच्या परीक्षेस त्यांना हजर रहातां आलें नाहीं. अर्थात् यामुळें मुनशीरामजीस या परीक्षेंत अपयश आलें.

**यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्र दोषः ।**

परीक्षेंत अपयश आलें म्हणून मुनशीरामजी पुन्हा शाळेंत जाऊं लागले. त्यांचे सहाध्यायी वरच्या श्रेणींत गेल्यामुळें त्यांना शाळेंत जाण्याची लज्जा वाटूं लागली. बरोबरचीं मुलें पुढें गेलीं म्हणून वर्गांत बसण्याची त्यांना लाज वाटूं लागली. कादंबरी, नाटकें, जीवनचरित्रें इत्यादि पुस्तकें वाचण्यांत मनशीरामजी आपल्या काळाचा अपव्यय करूं लागले. दुसऱ्या पाठशाळेंत जाण्याच्या विचारानें त्यांनीं पहिली पाठशाळा सोडली.

अशा स्थितींत त्यांचे वडील काशीला आले. भोजन झाल्यावर वडिलांनीं मुन्शीरामजीस विचारलें, “ शाळेंत कधीं जावयाचें ? ” त्या वेळीं शाळा सोडण्याची सर्व खरी हकीगत वडिलास सांगावी असें मुन्शीरामजीस वाटलें, पण ‘ शाळेला सुट्टी आहे ’ असें त्यांनीं वडिलांस लज्जेमुळें असत्य सांगितलें. वडिलाशीं असत्य बोलण्याचा त्यांचा हा पहिलाच प्रसंग होता. परंतु वडिलांस लबाडी कळून आल्यामुळें ते म्हणाले, ‘ बाळ मी तुझ्यावर इतका विश्वास ठेवतों पण तूं माझ्याशीं अविश्वासानें वागतोस ? तुझें शाळेंत लक्ष लागत नाहीं तर मला तसें कां सांगितलें नाहींस ? ’

वडिलांच्या या शांततापूर्ण भाषणानें त्यांना आपल्या असत्याचरणाबद्दल पश्चात्ताप झाला. पिताजींनीं त्यांना क्षमाशील अंतःकरणानें पुन्हा यत्न करून पहा असें सांगितल्यामुळें ते उत्साहानें परत तयारीस लागले.

पिताजींनीं मुन्शीरामजीस धीर दिला. तरी त्यांना शांति मिळाली नाहीं. त्यांना सर्व विश्व अंधःकारमय व निराशामय दिसूं लागलें. पित्याशीं केलेल्या या दुसऱ्या प्रतारणेमुळें त्यांच्या नयनांतून पश्चात्तापपूर्ण अश्रूंची वृष्टि व्हावयास लागली. त्यांच्या मनांत नाना तऱ्हेचे विचार येऊं लागले. "मला पाप्याला शांति देण्याकरतां परमेश्वरी कृपाछत्राची शीतल छाया मिळेल काय? थंड जलाशयानें मला शांति मिळेल काय! अशा अंधः-कारमय दिङ्मूढ स्थितींतून परमेश्वर मला प्रकाश दाखवील काय?

मुन्शीरामजी एक सदाचारी युवक होते. संगतिसंगदोषामुळें एका रात्रीं त्यांना दुर्जनांचा सहवास झाला, व नाचगायनाच्या जल-शांत सामील होण्याची त्यांना बुद्धि झाली. पण त्यामुळें त्यांची मति विभ्रम पावली, व पित्याशीं असत्याचरण करण्याची त्यांना दुर्बुद्धि उत्पन्न झाली. पिताजींनीं त्यांना क्षमा केली तरी पण सदसद्विवेक बुद्धीची टोचणी त्यांच्या मनास लागूं लागली.

नानकचंद्रजींनी मुन्शीरामजीस शासन केलें नाहीं तरी त्यांचें मन त्यांना खाऊं लागलें. ही विवेकशक्तीची टोचणी त्यांच्यामागें संतत लागली असती, तर त्यांच्या आचरणाची नौका कुसंगतीच्या वादळांत सांपडून दुष्कृ-त्याच्या खडकावर आदळली नसती. परंतु त्यांना वाटलेला पश्चात्ताप क्षणिक होता. त्यांना तो अनुताप मनरूप अश्वाला संतत ताब्यांत ठेव-ण्याइतका प्रबळ नव्हता.

संगतीसंगदोषामुळें ते मार्गच्युत झाले. विचाराचा आश्रय सुटून त्यांचें मन विकाराच्या ताब्यांत गेलें. व पापाच्या पाऊलवाटेवर त्यांनीं एक दोन पावलें टाकलीं खरी, पण पापाच्या या पाऊलवाटेवरून पुण्य-पथावर येण्याचें कार्य त्यांच्या हातून लवकर न झाल्यामुळें वांकड्या वाटेवरून त्यांना बराच प्रवास करावा लागला.

कुसंगतीमुळें त्यांच्यासारख्या आचारशील युवकाच्या आयुष्याची किती हानि झाली, उन्नतीच्या शिखरावरून अधोगतीच्या गर्तेत ते कसे पडले व तिच्यांतून संतसंगामुळें क्रमें निघाले हें विशद करण्याचें हेंच कारण कीं युवकांना पुढील धोक्याची सूचना मिळावी व त्यामुळें त्यांचें पापापासून रक्षण व्हावें.

मुन्शीरामजींचें चरित्र वृद्ध, तरुण, लहान, थोर या सर्वांना आदर्शवत् आहे. मार्गभ्रष्ट झालेल्यास दिशा दाखविणारें, दिशाभूल झालेल्यास दिशा दाखविणारें, धर्मभ्रष्ट झालेल्यास धर्मदीप दाखविणारें, एवढेंच काय पण मदिरेंत मग्न झालेल्या, सुरेचे गुलाम बनलेल्या व पुढें सुधारण्याची मुळींच आशा नसणाऱ्या एकच प्याला—भक्त मद्यप्याला योग्य धडा दाखवून देऊन सन्मार्गावर आणणारें आहे.

पुण्यपथावरून पापगर्तेत पडण्यापूर्वी तरुणांना योग्य विचार करतां यावा किंवा पापगर्तेत पडलेल्या पाप्यांना परत पुण्यपर्वतावर पदार्पण करतां यावें व आपल्या आयुष्याचा आपल्या कुटुंबाला, आपल्या समाजाला, स्वदेशाला व नंतर अखिल जगाला उपयोग करतां यावा असा मार्ग मुन्शीरामजींच्या—स्वामी श्रद्धानन्दजींच्या—चरित्रावरून काढतां येण्यासारखा असल्यामुळें त्यांच्या गुणाबरोबर त्यांच्या दोषांचेंही दिग्दर्शन करणें क्रमप्राप्त आहे. त्यांच्या दोषाविष्करणामध्यें मनुष्यमात्रांस योग्य बोध घेतां यावा एवढाच उच्च हेतु आहे हें मात्र वाचक बंधुभगिनींनीं विसरूं नये.

---

# श्रद्धाञ्जलि ७ वी.

## स्वच्छंदी व स्वतंत्रमय जीवन.

**दुर्जनजनसंसर्गात्सज्जनपुरुषोऽपि दोषमाप्नोति ॥**
**रावणकृतापराधाज्जलधेरपि बन्धनं प्राप्तम् ॥**

शक्ति, स्वातंत्र्य, तारुण्य, श्रीमंती व अविवेकता या पंचकडीमुळें माणसाच्या जीवनक्रमावर विलक्षण परिणाम होतो. वास्तविक पाहूं गेलें असतां हीं एकेकच अनर्थास कारणीभूत होणारीं आहेत. तेव्हां ही पंचकडी एकसमुच्चयामुळें काय काय अनर्थ करील याचा मुळींच नियम नाहीं. आमच्या चरित्रनायकास या सर्व गोष्टींची अनुकूलता होती. या पंचकडीपेक्षां पहिल्या चौकडीनें ते पूर्णपणें चतुर्भुज झालेले होते. मात्र त्यांच्यावर अविवेकानें अद्यापपर्यंत विशेषसा अंमल बसविला नव्हता.

पण यौवनावस्था म्हणजे विकारस्थान किंवा भावनाप्रधान अवस्था असते. या वयांत विचारापेक्षां विकारांचेंच प्राबल्य अधिक असतें. या विकारास थोडें फार उत्तेजन मिळालें कीं विचारास अर्धचंद्र मिळतो, व अविचाराच्या अंधःकारामध्यें विकारास यथेच्छ थैमान घालावयास मिळतें. विकारापासून अविवेक जन्मास येतो. या अविवेकबालकास श्रीमंतीमध्यें वावरण्यास मिळालें कीं हा तेव्हांच तरुण बनतो आणि मग आपल्या शक्तिसामर्थ्यामुळें माणसाच्या मनास आवरेनासा होतो.

मुन्शीराम जी पितृग्रामापासून अत्यंत दूर, जेथें कोणाची देखरेख नाहीं, अशा काशी नगरामध्यें विद्याभ्यासासाठीं राहिले होते. त्यांचे वडील त्यांना लागेल तितका पैसा पाठवीत असत. ‘ बरें खावें बरें ल्यावें ’ अशी त्यांची सुखार्थी स्वतंत्र वृत्ति बनली होती.

**आत्मानं रथिनं विद्धि शरीरं रथमेव तु ।**
**बुद्धिं तु सारथिं विद्धि मनः प्रग्रहमेव च ॥ ३ ॥**
**इन्द्रियाणि हयानाहुर्विषयांस्तेषु गोचरान् ।**
**कठ. उ. १।३**

“ आत्मा हा रथामध्यें बसणारा, शरीर हा रथ, बुद्धि हा सारथी, मन हें लगाम, इंद्रियें हे घोडे, व विषय हें त्याचें चरण्याचें क्षेत्र आहे. ”

शरीररूप रथाच्या इन्द्रियरूप घोड्यांना मनःसंयमाचा लगाम घातला नाहीं तर हे घोडे शरीरास व आत्म्यास भलत्याच दिशेला ओढून नेतात. म्हणूनच मनाचें संयमन करण्यास बुद्धि ही प्रधान आहे. बुद्धिरूप सारथ्यानें मनःसंयमाचा लगाम ढिला ठेवला कीं हे इंद्रियाश्व अविचाराच्या व दुष्कृत्याच्या क्षेत्रांत चरावयास जातात. बुद्धीचें व मनाचें महत्त्व विलक्षण आहे.

**“ तन्मे मनः शिवसंकल्पमस्तु । ”**

अशा तऱ्हेची वैदिक प्रार्थना आहे. मनामध्यें मंगलाकारक विचार असले तर पुरुषाचा परमेश्वर बनतो, व अमंगल विचाराच्या तावडींत मन सांपडलें कीं तें पुरुषास पशुसमान बनवितें. मन उच्छृंखल बनलें असतां

मनाला वळविणारा कोणी नसला तर मनाचा लगाम ढिला पडून इन्द्रियाश्व भलत्याच दिशेला जातात.

मुन्शीरामजी नुकतेच कोठें तारुण्यांत प्रवेश करूं लागले होते. शक्ति, स्वातंत्र्य व संपत्ति या त्रयींचें त्रिकुट तारुण्यास मिळतांच या चौरंगी सेनेचा वेढा मुनशीरामजीभोंवतीं पडला. युवावस्थेंत भावना जन्मास येते आणि भावनेचा पुत्र अविवेक या चतुरंग सेनेचा सेनापति बनतो. या पंचपक्षांनीं मुनशीरामजीवर मारा करण्यास सुरुवात केली.

त्यांच्या मनाला वळण लावणारा कोणी सुमंत्री नव्हता. सुखार्थी सहाध्यायांचा त्यांच्या भोवतीं गराडा असे. अशा सुखार्थी विद्यार्थ्यांच्या साहचर्यामुळें व संमतीमुळें मुन्शीरामजींनीं व त्यांच्या सहाध्यायांनीं पहिली पाठशाळा सोडून दिली, व जयनारायण कॉलेजमध्यें नांव घातलें. हें कॉलेज केवळ नांवाचें कॉलेज होतें. कॉलेजच्या सर्व श्रेणी तुटल्या होत्या. केवळ इंग्रजी सातव्या यत्तेपर्यंतचेच वर्ग मिशनरी चालकांनीं कसे बसे चालविले होते. शिवाय शिक्षणप्रबंध उत्तम नसल्यामुळें विद्यार्थीही या संस्थेंत अगदीं थोडे होते.

मुन्शीरामजी व त्यांचे चार सुखार्थी सहाध्यायी या शाळेंत दाखल होतांच मिशनरी पाद्री मुख्याध्यापकास आनंद झाला. वासरांत लंगडी गाय शहाणी या म्हणीप्रमाणें मुन्शीरामजी व त्यांचे चार सहचर या संस्थेंत सर्वांत शहाणे म्हणून समजले जात. अति शहाणा, त्याचा बैल रिकामा. हे अतिशहाणे विद्यार्थी वर्गांत न बसतां पाठशाळेच्या विस्तीर्ण इतारतीच्या खुल्या आवारांत, उद्यानांत व जंगलांत नाचत बागडत असत.

कधीं हे शहाणे विद्यार्थी अध्यापकास त्रस्त करीत, तर कधीं पाठशाळेच्या इमारतीभोंवतीं प्रदक्षणा घालीत, तर कधीं जंगलांत सहल करण्यास जात. ही पंचकडी जंगलांत जंगलीपणा करण्यास गेली कीं शिक्षकास यांच्या त्रासांतून सुटल्याचें समाधान वाटे.

त्यांच्या स्वातंत्र्यास सीमा राहिली नाहीं. या स्वच्छंदी वृत्तीमुळें मुन्शीरामजींची जीवननौका अविवेकाच्या वादळांत सांपडून भलत्याच दिशेनें वहावयास लागली.

पौष संवत् १९३२ ( सन १८७५ ) च्या अखेरीस नित्य क्रमानुसार मुन्शीरामजी सायंकाळीं फिरावयास गेले. परत फिरतांना त्यांना नेहमींपेक्षां अधिक वेळ झाला. काशी विश्वनाथाच्या मंदिराजवळ दर्शनाभिलाषेनें ते जातांच त्यांना पहारेकऱ्यानें पुढें जाण्याची मनाई केली. " रीवांची राणी विश्वनाथाचें दर्शन करीत आहे. राणीसाहेबांचें दर्शन घेणें झाल्यावर द्वार उघडेल " असें त्यांना रक्षकानें सांगितलें, व मुन्शीरामजीस आसनावर बसण्यास सांगितलें.

एकच पळभर त्या आसनावर बसतांच मुन्शीरामजींच्या अन्तःकरणांत विचारांचें वादळ उठलें. काशीविश्वनाथाच्या दर्शनाच्या बंदीमुळें त्यांच्या हृदयास भयंकर धक्का बसला. त्यांचें हृदय कंपित झालें. तेथें क्षणभरही न थांबतां ते घरीं येऊन कपडेही न उतरतां बिछान्यावर पडले. त्यांना भोजन करण्याचेंही भान राहिलें नाहीं. भोजन घेऊन येणाऱ्या भृत्यास भूक नाहीं असें सांगून ते तसेच पडून राहिले. त्यांची तहान भूक हरपली.

रात्रभर निद्रा न घेतां सर्व रात्र त्यांनीं विचार करीत काढिली. त्यांचें मन नानातऱ्हेच्या विचारतरंगांनीं व्याकुळ झालें. त्यांच्या मस्तकांत भिन्न भिन्न प्रश्नांची विचारमालिका सुरू झाली. विचारौघांत ते स्वगत पुटपुटले. ' एक राणी विश्वनाथाच्या दर्शनास प्रतिबंध करते ! हा काशी-विश्वनाथ जगाचा खरोखरच स्वामी आहे काय ? जिच्यामध्यें असा पक्षपात भरलेला आहे ती ही विश्वनाथाची मूर्ति खरोखरच विश्वनाथ आहे काय ? परंतु मूर्तींना देवता कोणी केलें ? मूर्ति घडवितेवेळीं टाकीचे घाव घालणाऱ्या मूर्तिकारास कित्येक वेळां मूर्ति घडवितांना मीं पाहिलें आहे. '

मुन्शीरामजींचें चित्तस्वास्थ्य ढळलें. अस्वस्थ चित्तानें व्याकुळ होऊन ते कधीं उभे रहात, तर कधीं इकडून तिकडे तिकडून इकडे थोडा वेळ खोलींतच फिरत, तर कधीं बिछान्यावर पडून डोळे मिटवून विचार करीत. दुसऱ्या प्रश्नावलीच्या लहरीनें त्यांच्या मानससरोवरांत आंदोलन सुरू केलें.

" जर या जगामध्यें पक्षपात भरलेला आहे तर जगाच्या स्वामीच्या दरबारांत पक्षपात कशावरून नसेल? परमेश्वरापासून तर मनुष्य पक्षपात शिकला नाहीं ? माझ्या स्वच्छंदी वृत्तीनें तर मला अविश्वासी केलें नाहीं? "

**बार बार वर मागहू हर्ष देहू, सिय रंग ।**
**पदसरोज अनुपायनी भक्ति सदा सतसंग ॥**

गोस्वामी तुळसीदासजींच्या वरील दोह्याचें मुन्शीरामजीस स्मरण होतांच त्यांच्या नयनांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. एक प्रहरपर्यंत अश्रुवृष्टि थांबली नाहीं. नंतर त्यांनीं योग्यमार्ग दाखविण्याविषयीं आपल्या महावीर इष्टदेवाची प्रार्थना केली. परंतु त्यांच्या त्या व्याकुल अवस्थेंत त्या बालयति महावीराचें ध्यान करूनही इष्टलाभ झाला नाहीं.

त्यांचें मूक रुदन अखेरीस थांबलें. अश्रुबिंदू नाहींसे झाले. त्यांच्या मानसिक दृष्टीपुढें ग्रीक व रोमचा मूर्तिपूजाविषयक इतिहास येऊं लागला. मूर्तिपूजाविषयक त्यांनीं वाचलेल्या लेखावर नवा प्रकाश पडूं लागला. खिस्ती लोकांनीं मूर्तिपूजेवर जे शाब्दिक हल्ले केले होते त्यांच्या स्मरणानें त्यांची मूर्तिपूजेवरील श्रद्धा ढळली पाठशाळेचे पाद्री प्रिन्सिपाल ल्यूपोल्ट यांच्याकडे जाऊन संशयनिवृत्ति करून घ्यावी असें त्यांनीं ठरविलें.

मिशनरी लोकांनीं चालविलेल्या पाठशाळेंत मुन्शीरामजींना बायबलाचें शिक्षण घ्यावें लागत होतें. स्वतःच्या धर्मशिक्षणाच्या नांवानें हिंदुधर्मावरील मिशनऱ्यांचे शाब्दिक हल्ले त्यांना ऐकावे लागत होते. हे मिशनरी लोक हिंदुधर्मातील तत्त्वें जनतेपुढें विकृत रूपांत ठेवून हिंदुधर्मावर भडिमार करून खिस्ती धर्माचें श्रेष्ठत्व प्रतिपादण्याचा व लोकांच्या डोळ्यांत धूळ फेकण्याचा प्रयत्न करतात. याचा अशिक्षित लोकांवर व कोंवळ्या बुद्धीच्या विद्यार्थ्यांवर परिणाम होतो व पाद्रीसाहेबच खरे धर्मज्ञानी आहेत असा त्यांचा समज होतो. याच समजामुळें मुन्शीरामजींनीं आपली शंका ल्यूपोल्ट पाद्रीसाहेबांस विचारण्याचें ठरविलें.

तेच जर या वेळीं हिंदुपाठशाळेंत असते, तर हिंदुशिक्षकाविषयीं पूज्यभाव त्यांच्या मनांत असता व आपली शंका त्यांनीं हिंदुशिक्षकास विचारली असती. व त्यामुळें आस्तिकाचे नास्तिक न बनतां ते आस्तिकच राहते.

# श्रद्धाञ्जलि ८ वी.

## नास्तिकतेच्या नावेंतील नावाडी !

**अविद्यायामन्तरे वर्तमानाः स्वयंधीराः पण्डितम्मन्यमानाः ।**
**दन्द्रम्यमाणाः परियन्ति मूढा अन्धेनैव नीयमाना यथान्धाः ।**

... मिशनरी शिक्षकांच्या शिक्षाप्रणालीचा, त्यांनीं केलेल्या हिन्दुधर्माच्या टीकेचा व ग्रीस रोम देशांच्या मूर्तिपूजाविषयक ग्रंथांचा मुन्शीरामजींच्या मनावर विशेष पगडा बसला असल्यामुळें हिन्दुधर्मावरील त्यांची निष्ठा ढळून त्यांच्या मनाचा कल परधर्माकडे झुकूं लागला.

सूर्योदय होतांच, रात्रभर विचार करून ठरविल्याप्रमाणें, मुन्शीरामजींनीं शंका कुशंकांच्या भोंवऱ्यांतून मुक्त होण्याच्या, इच्छेनें व शांति समाधानाच्या प्राप्तीप्रीत्यर्थ रे. ल्यूपोल्ट यांचेकडे धांव घेतली.

पाद्रीप्रचारक ल्यूपोल्ट यांना मुन्शीरामजींच्या चित्ताची अस्वस्थता पाहून समाधान वाटलें. दुसऱ्याच्या असमाधानांत स्वतःचें समाधान मानणाऱ्या, दुसऱ्याच्या संकटांत स्वतःचा संतोष मानणाऱ्या, व दुसऱ्याच्या दुःखांत स्वतःचें सुख मानणाऱ्या ज्या थोर विभूति असतात, त्यांपैकीं हे पाद्री प्रचारक एक होते शंकाकुशंकेनें व्यग्र झालेल्या मुन्शीरामजीला युक्तिप्रयुक्तीनें आपल्या शब्दजालांत अडकवून त्यांच्या कोंवळ्या मनावर हिन्दुधर्माचा तिटकारा व ख्रिस्ती धर्माचें श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्यास हीच योग्य संधि आहे हें पाहून या पाद्रीप्रचारकानें मुन्शीरामजीस आपल्या मोहजालांत ओढण्याची पराकाष्ठा केली.

कनकजाल, कांताजाल, किंवा शब्दजाल या त्रयींपैकीं कोणत्या ना कोणत्या जालांत मनुष्यास आढून त्याच्या शिरावर जलसिंचन करण्यांत हे पाद्री प्रचारक प्रवीण असतात. अगोदर शब्दास्त्रानें मनुष्य घायाळ करावयाचा, नंतर कांचनाचा कोट त्याच्या भोंवती खडा करावयाचा व शेवटीं कामिनीच्या नयनबाणांनीं त्याचें हृदय विदारण करावयाचें अशी यांच्या

प्रयत्नांची दिशा असते. कोणी कोरड्या शब्दजालास बळी न पडला तर कांचनाची त्यास लालूच दाखवावयाची; याही लालचीस तो न लालचावला तर कामिनीचें निर्वाणीचें मोहास्त्र त्यावर सोडावयाचें अशी यांची ही युद्धनीति असते.

मुन्शीरामजी केवळ वाक्‌पांडित्यास मोहित होणारे नव्हते. पाद्रीसाहेबांस एकसारखे तीन दिवस शंका कुशंका, प्रश्नावर प्रश्न विचारून त्यांनीं त्रस्त करून सोडिलें. पाद्रीसाहेब चाणाक्ष मुन्शीरामजींचें समाधान करूं शकले नाहींत. त्यामुळें मुन्शीरामजीला आकाशांतील बापाच्या धर्मांत ओढण्याची पाद्रीसाहेबांची आशा नष्ट झाली; व मुन्शीरामजीला वळविण्याचें व आपल्या जाळांत पकडण्याचें पाद्रीसाहेबांनीं मोठ्या निराशेनें सोडून दिलें.

शंकेच्या व असमाधानाच्या भोंवऱ्यांत गिरक्या घेणाऱ्या त्यांच्या मनाचें हिन्दुशास्त्रज्ञही समाधान करूं शकले नाहींत. त्यामुळें त्यांची वृत्ति उदासीन झाली. हिन्दुधर्मावरील त्यांचा विश्वास पूर्णपणें उडाला व मूर्तिपूजेविषयीं त्यांच्या मनांत तिरस्कार उत्पन्न झाल्यामुळें काशीविश्वनाथादि देवांचें दर्शन घेण्याचें त्यांनीं वर्ज केलें. तरी पण नेहमींप्रमाणें गंगास्नान, व्यायाम, कुस्ती हा नित्य क्रम त्यांनीं सोडला नाहीं.

एके दिवशीं फिरावयास गेले असतां मुन्शीरामजींना एक रोमन कॅथोलिक खिस्ती पाद्री भेटला. त्याच्याशीं संभाषण केल्यावर तो कॅथोलिक पाद्री प्राटेस्टंट ल्यूथरन पाद्र्यापेक्षां अधिक विनयशील, शांत व सहिष्णु आहे असें मुन्शीरामजींस वाटलें. या पाद्री प्रचारकानें मुन्शीरामजींस असें विश्वासपूर्वक सांगितलें कीं, जर सूक्ष्म मताचें, खिस्तीधर्माचें तत्त्व जाणावयाचें असेल तर कॅथोलिक धर्माचे मूलभूत सिद्धांत समजून घेतले पाहिजेत.

मुन्शीरामजी कॅथोलिक चर्चमध्यें जाऊं लागले. त्यांच्या धार्मिक संस्थांचा, प्रार्थनेचा, व सभेचा मुन्शीरामजींच्या मनावर विलक्षण प्रभाव पडला. इतकेंच नव्हे तर मुन्शीरामजींच्या श्रद्धासंपन्न चित्तावर त्या पाद्र्याच्या आचारविचारांचा विलक्षण परिणाम झाला. पाद्र्यानें मुन्शीरामजीस इतकी भुरळ घातली कीं ते त्याचा शब्द शिरसावंद्य मानूं लागले, व त्याच्या आज्ञेंत राहूं लागले. मुन्शीरामजीस खिस्त्याच्या कळपांत ओढण्याचा मान आपणांस

मिळणार अशी पाद्रीसाहेबांस खात्री वाटूं लागली; मुन्शीरामजी त्या पादऱ्यावर विलक्षण मोहित झाले; व त्याच्या आज्ञेप्रमाणें बाप्तिस्मा घेऊन ख्रिस्तीधर्माचा स्वीकार करण्याचेंही त्यांनीं कबूल केलें. फक्त बाप्तिस्मा घेण्याची तारीखच निश्चित करण्याचें काय तें शिल्लक राहिलें होतें.

हे मिशनरी पादरी प्रचारक कोंवळ्या बुद्धीच्या मुलांच्या मनावर विश्वबंधुत्वाच्या प्रेमाच्या, समानतेच्या दिखाऊ भपक्यानें व भुलथापनें विलक्षण परिणाम करतात.

'जसें आकाशांत तसें पृथ्वीवर तुझें राज्य येवो, अशी आकाशांतील बापाची प्रार्थना करणारे हे प्रचारक आकाशाचें राज्य पृथ्वीवर प्रस्थापण्याचा, आकाशांतील हवेंत किल्ले बांधण्यावजा प्रयत्न करतात. आपल्या भुलवणीनें आणि आपण दाखविलेल्या कांचनाच्या आमिषानें एखादा मासा जरी यांच्या गळास लागला व त्या माणसाच्या डोक्यावर पाणी शिंपडून ख्रिश्चन करण्याचा मान मिळाला कीं यांना दोन बोटें स्वर्ग उरल्याचा आनंद होतो.

हिंदूचा ख्रिस्ती, कृष्णभक्ताचा ख्रिस्तभक्त, गोभक्ताचा गोभक्षक, मूर्तिपूजकाचा मूर्तिभंजक जरी नव्हे तरी मूर्तिनिंदक करण्यांत यांचा हातखंडा आहे. आमच्या चरित्रनायकास ख्रिस्ती करण्याचें कार्य जर पादरी प्रचारकांस साधलें असतें, तर आमचे चरित्रनायक कोठें तरी रेव्हरंड होऊन, 'ख्रिस्त माझी माऊली' अशीं उर्दू पद्यें म्हणत आपल्या मेंढरांच्या कळपांत अनेक हिन्दु माणसें ओढण्याचा प्रयत्न करीत राहिले असते. व "परमेश्वर हा गोपाळ नसून मेंढपाळ आहे व आपण माणसें मेंढरें आहोंत, असें प्रतिपादन करण्यांत त्यांनीं आपलें आयुष्य खर्चीं घातलें असतें.

मुन्शीरामजींनीं हिन्दुधर्मावरील विश्वास उडाल्यामुळें ख्रिस्ती होण्याचें व आकाशांतील बापाची सेवा करण्याचें जरी मनाशीं ठरविलें होतें, तरी पण परमेश्वराची योजना तशी नव्हती. त्यांनीं हिन्दुधर्माची सेवा करावी, हिन्दुधर्मरक्षणाचें त्यांनीं हातीं कंकण बांधावें, त्यांनीं वैदिक धर्मप्रसाराचा विडा उचलावा अशी परमेश्वराची इच्छा असल्यामुळें निराळीच घटना घडून आली.

ख्रिस्तीधर्मप्रचारकांच्या मायावी मोहनीनें मंत्रमुग्ध बनून मुन्शीरामजी संवत् १९३२(सन १८७५)च्या फाल्गुन महिन्यांत आपल्या बाप्तिस्माची

तारीख निश्चित करण्याकरतां फादरलीफच्या बंगल्यावर गेले. इकडे ते बाप्तिस्माच्या तयारीस लागले होते व तिकडे, पुढें त्यांनीं ज्या आर्यसमाजाची सेवा केली त्या समाजाची स्वामी दयानन्द सरस्वतींनीं या सुमारास संस्थापना केलेली होती.

आपल्या स्वाध्यायाच्या खोलींत पाद्री प्रचारक नाहीं हें पाहून मुन्शीरामजींनीं आंतल्या खोलीचा पडदा दूर केला. तों एक दुसरे पाद्री एका ब्रह्मचारिणीशी ( Nun ) एकांतांत अत्यंत घृणित असें पापकर्म करीत असलेले त्यांच्या नजरेस पडले. " हिन्दूधर्मांत धर्म व नीति यांचा वेबनाव आहे " असें प्रतिपादणारे पाद्री धर्माच्या नांवाखालीं भर दिवसा नीतीचे खून करतांना पाहून मुन्शीरामजींच्या मनांत या खिस्ती महानुभावांविषयीं घृणा उत्पन्न झाली व तेथें क्षणभरही न थांबतां ते तेथून तात्काळ आपल्या गृहाकडे निघाले.

विश्वबंधुत्वाच्या व ब्रह्मचर्याच्या गप्पा मारणारे पाद्री प्रचारक व ब्रह्मचारिणी जोगिणी कुमारावस्थेंत कुमार्गगामी बनून अत्यंत निंद्य पापकर्मांत लोळत असतात हें दिसून येतांच मुन्शीरामजीवरील खिस्ती धर्माची मोहिनी दूर झाली. मंत्रमूढ अवस्था संपल्यामुळें निद्रेंतून जागृत झाल्यामुळें ते विचार करूं लागले. विश्वबंधुत्वाचें प्रदर्शन करणारा व उच्च आचाराचें समर्थन करणारा खिस्तीधर्म दिखाऊ व आचारशून्य व नीतिभ्रष्ट असें त्यांना वाटूं लागून ज्या एका क्षणापूर्वी ते खिस्ती धर्माचा स्वीकार करण्यास तयार झाले होते, त्या खिस्ती धर्माचा ते तिरस्कार करूं लागले. या विचित्र घटनेमुळें मुन्शीरामजी खिस्ती व्हावयाचे राहिले.

मुसलमानी धर्मावर त्यांची पहिल्यापासूनच श्रद्धा नव्हती. खिस्ती धर्मास ते वरील घटनेमुळें तिरस्कृत समजत होते. राणीनें काशी विश्वनाथाच्या दर्शनास बंदी केल्यामुळें त्यांचा हिंदुधर्मावरील विश्वास नष्ट झालेला होता. त्यामुळें संप्रदाय पंथ व धर्म यांच्यावरील त्यांची श्रद्धा नाहींशी झाली. अंधश्रद्धाळू माणसांना जाळ्यांत ओढून मतलबसिंधु साधण्याचें धर्म हें एक साधन आहे असें मुन्शीरामजींना वाटूं लागून ते नास्तिक बनले; व प्रार्थना मंत्राऐवजीं पुढील कबीरपंथी पद्य म्हणूं लागले.

" आऊंगा न पाऊंगा, मरूंगा न जीऊंगा।
गुरुकोशब्द प्याला हरिरस पिऊंगा ॥
कोइ जावे मक्केको; कोई जावे काशी।
देखोरे लागो दोहु गलफाशी ॥
कोई फेरे माला कोई फेरे तसबी।
देखोरे लोगा, ये दोनोभी कसबी ॥
यह पूजें मठिया तो यह पुजे गोरा।
देखोरे लोगो यह लूट गई चोरा ॥
कहत कबीर सुनोगी भाई।
हम नहीं किसीके न हमारा ॥

न हिंदु, न यवन, न ख्रिस्ती, न पारशी अशी त्यांची स्थिति झाली. नास्तिकतेच्या नावेंत ते नावाडी होऊन या भवसागरांतून आपली नाव जोरानें वल्हवूं लागले, पण ती नाव कोठें गेली व त्या नावाड्याचें काय झालें ?

---

# श्रद्धाञ्जलि ९ वी.

## बुडत्याचा पाय खोलांत !

**पात्रमपात्रीकुरुते दहति गुणं स्नेहमाशु नाशयति।**
**अमले मलं नियच्छति दीपज्वालेव खलमैत्री ॥**

मुन्शीरामजींची जीवननौका नास्तिकतेच्या भयंकर वादळांत सांपडून अश्रद्धा, अस्वस्थता, अशांतता इत्यादिकांचें त्यांच्या हृदयाकाशांत तुमुल युद्ध सुरू झालें. तरी पण त्यांनीं आपला शरीरबलवर्धक व्यायाम सोडला नाहीं किंवा परीक्षेचा अभ्यासही सोडला नाहीं.

एके दिवशीं सायंकाळीं त्यांची माता मृत झाल्याची त्यांना एक तार मिळाली. या दुःखद वार्तेनें मुन्शीरामजी ज्ञानविमूढ झाले व त्यांच्या मुखांतून दुःखाचा आर्तस्वर निघाला. आपल्या ज्येष्ठ बंधूच्या बरोबर ते बलिया नगरास गेले. घरीं पोंचतांच मुन्शीरामजी पित्याच्या पायावर शोकाविव्हल होऊन पडले. घरांत शोकाचें साम्राज्य पसरलें. शोकसागरास थोड्या समयानें ओहोटी लागल्यावर मातेची अंतिम इच्छा मुन्शीरामजीस समजली.

" माझ्या मुन्शीचा विवाह माझ्या डोळ्यांदेखत व्हावा अशी माझी फार इच्छा होती. पण आतां मी जातें. माझ्या पश्चात् मुन्शीचा विवाह माझ्या हौसेप्रमाणें मोठ्या थाटानें करावा. "

मातेची अंतिम इच्छा मुन्शीरामजीस समजतांच त्यांच्या नेत्रांतून अश्रूंची वृष्टि सुरू झाली. **जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी।** मुन्शीरामजीस त्यांची माता स्वर्गाहूनही श्रेष्ठ वाटत होती. कुमारावस्थेंत जन्मभूमीची त्यांना जाणीव नव्हती, पण जन्मदात्या मातेच्या प्रेमाच्या शीतल छायेंत त्यांचें आतांपर्यंत संवर्धन झालेलें होतें. मुन्शीरामजी मातेचे फार लाडके होते. ते मातृभक्त होते. काशीमध्यें अभ्यास करीत असतां त्यांना मातेची आठवण होत असे. कधीं शाळा चालू असतां तर कधीं सुट्टी लागतांच ते आपल्या प्रेमळ मातेच्या दर्शनास अतिशय उत्सुकतेनें जात. पण त्याच घरीं त्यांना आतां मातृविहीन होऊन मातेसाठीं शोक करावा लागत होता. मातेच्या मृत्यूनें मुन्शीरामजीवर आकाशच कोसळून पडलें.

नास्तिकतेच्या वादळांत कुंठित झालेल्या त्यांच्या मनास मातेच्या मृत्यूचा जबर धक्का बसला. याच मातृदेवतेच्या उच्च आचारानें व धार्मिक शिक्षणानें मुन्शीरामजीस आपलें चारित्र्य आतांपर्यंत निष्कलंक ठेवण्यास साहाय्य झालें होतें. पण मातेचा आधार नाहींसा झाल्यामुळें मार्ग चुकलेल्या मृगाप्रमाणें त्यांची स्थिति झाली.

मॅट्रिकची परीक्षा केवळ तीन आठवड्यावर राहिल्यामुळें मुन्शीरामजीस लवकरच काशीला जावें लागलें. काशीला जातांच त्यांनीं व

त्यांच्या चार सहाध्यायांनीं आपल्या ‘ रेवडी ’ पाठशाळेच्या अध्यापकाजवळ वाचनालयाची किल्ली मागितली. “सबंध वर्ष उनाडपणें नाचण्यांत घालविलेंत आणि आतां परीक्षा जवळ आल्यावर अभ्यास सुचला होय ! पण परीक्षेंत उत्तीर्ण व्हा ! नाहीं तर आपलें काळें तोंड दाखवूं नका ! ” असें म्हणत अध्यापकानें किल्ली त्यांच्याजवळ दिली.

शिक्षकाच्या या भाषणानें सर्वांनीं जिवापाड अभ्यास करून परीक्षेंत उत्तीर्ण होण्याची प्रतिज्ञा केली. रात्रंदिवस अविश्रांत श्रम करून सर्वांनीं परीक्षेची सपाटून तयारी केली. परीक्षेस चार दिवस अवकाश असतांच प्रिन्सिपालच्या सांगण्याप्रमाणें मुन्शीरामजींनीं अभ्यास न करतां विश्रांति घेण्याचें ठरविलें. पण त्यांच्या चार सहचरांनीं मात्र परीक्षेच्या शेवटल्या क्षणापर्यंत पुस्तक सोडलें नाहीं. त्याचा परिणाम असा झाला कीं मुन्शीरामजी मॅट्रिकच्या परीक्षेंत दुसऱ्या वर्गांत पहिले आले, व त्यांचे एक स्नेही कसे बसे उत्तीर्ण झाले, पण बाकीच्यांना त्यांच्या दुर्दैवानें दगा दिला.

## क्वीन्स कॉलेजमध्यें प्रवेश !

मुन्शीरामजी सन १८७७ मध्यें मॅट्रिकच्या परीक्षेंत उत्तीर्ण झाल्यामुळें त्यांच्या घरच्या मंडळीस आनंद झाला. विश्वविद्यालयाचें उच्च शिक्षण संपादण्याकरतां मुन्शीरामजींनीं क्वीन्स कॉलेजमध्यें प्रथम वर्षांत प्रवेश केला.

कॉलेजमध्यें जातांच मुन्शीरामजींच्या जीवनक्रमांत पुष्कळ बदल झाला. त्यांच्या कॉलेजचे प्रोफेसर आपापले विषय शिकविण्यांत अत्यंत निपुण होते. अशा तज्ज्ञ प्रोफेसरांच्या हाताखालीं उच्च शिक्षण घेतल्यानें मुन्शीरामजींचें मन सुसंस्कृत झालें खरें; पण पाश्चात्य शिक्षणाचा व रीतिभातींचा त्यांच्या मनावर पगडा बसला. त्यांची नास्तिकता कमी न होतां उलट शिक्षणाच्या व वयाच्या वाढीबरोबर वाढूं लागली. पाश्चात्य शिक्षण घेणाऱ्या पहिल्या पिढीवर त्यावेळीं असाच परिणाम झालेला होता. ‘ खाना पीना, मजा उडाना ’ अशा वृत्तीचे त्या वेळचे विश्वविद्यालयाचे विद्यार्थी असत. पाश्चात्यांचें पोषाखादि व खाद्यपेयादि बाह्य गोष्टींत अनुकरण

करण्यांत त्या वेळचे विद्यार्थी प्रवीण असत. अर्थात् मुन्शीरामजीच याला कसे अपवाद असणार ?

मुन्शीरामजींच्या वडिलांनीं नाथूमल नामक एका इसमास नोकरी देऊन अन्नास लाविलें होतें. या नाथूमल्लानें मुन्शीरामजींस हुक्का पिण्याचें व्यसन लावून आपल्या अन्नदात्याच्या उपकारांची अपकारानें फेड केली. आतांपर्यंत मुन्शीरामजी अगदीं निर्व्यसनी होते; पण नाथूमल्लानें त्यांना हुक्केबाजीचा धडा दिला. व्यसनसोपानाची पहिली पायरी मुन्शीरामजी न कळत चढले खरे; पण एका व्यसनाचे गुलाम बनलेल्या माणसावर दुसरीं व्यसनें झडप घालतात व अशा रीतीनें मनुष्य व्यसनाधीन व दुराचारी बनतो. म्हणूनच कोणतेंहि व कितीही क्षुल्लक व्यसन कां होईना, मनुष्यानें त्यापासून पांच पावलें दूर झालें पाहिजे. अगदीं लहान व क्षुल्लक दिसणाऱ्या तपकिरीच्या व्यसनानें विडी ओढण्याची संवय लागते; विडीमागें गांजा, हुक्का हक्क गाजवूं लागतात, व धूम्रपानानंतर मद्य, मांस व मदिरा या तीन विनाशकारक व्यसनांचा मनुष्य गुलाम बनतो.

पण मुन्शीरामजींस या व्यसनाची मुळींच कल्पना नव्हती. त्यासमयीं हुक्का पिण्याची व्यसनांत गणना होत नव्हती, तर हुक्का पिणें हें प्रतिष्ठितपणाचें लक्षण समजलें जात होतें. कॉलेजचे सहाध्यायी त्यांच्या घरीं सकाळ संध्याकाळ हुक्का पिण्याकरतां नित्य नियमानें जमत असत. अशा रीतीनें मुन्शीरामजींच्या त्या खोलीचें हुक्केबाजीच्या अड्ड्यांत रूपांतर झालें.

एके दिवशीं रात्रीं मुन्शीरामजी घरीं येत असतां एका गुंडानें त्यांच्यावर सुरी घेऊन हल्ला केला. मुन्शीरामजींनीं सावधपणें आपला बचाव केला, व आपल्या जवळच्या सुरीनें त्यांनीं त्या गुंडास घायाळ केलें. कॉलेजमधील कित्येक बंगाली विद्यार्थ्यांचें गुंड लोकांपासून मुन्शीरामजींनीं आपल्या शरीरसामर्थ्यानें रक्षण केलें. यामुळें त्यांची प्रशंसा होऊन ते कॉलेजमध्यें लवकरच प्रसिद्ध झाले.

आपल्या शरीरबळावर मुन्शीरामजींनीं आपलें व दुसऱ्यांचेंही रक्षण केलें, पण दुर्व्यसनी माणसांपासून मुन्शीरामजीस आपल्या मनाचें रक्षण करतां आलें नाहीं. त्यांचें मन त्यांच्या काटक शरीराप्रमाणें खंबीर नव्हतें. त्यांचा स्वभाव भिडस्त बनला होता. दुसऱ्याचें मन दुखावणें

त्यांच्या जिवावर येत असे. पण '**भिडे भिडे पोट वाढे**' या म्हणीप्रमाणें दुर्व्यसनी माणसांना त्यांच्या भिडस्त स्वभावामुळें त्यांना व्यसनासक्त करण्यास फावलें. शरीरसंरक्षणास ज्याप्रमाणें शरीरसामर्थ्याची आवश्यकता असते, त्याप्रमाणें व्यसनापासून अलिप्त रहाण्यास खंबीर मनाची आवश्यकता असते. पण मुन्शीरामजींच्या लवचिक स्वभावामुळें त्यांना फारच नडलें.

मुन्शीरामजी क्षात्रिय घराण्यांत जन्माला आलेले होते. मांसाहार करणें क्षत्रियास निषिद्ध नसल्यामुळें त्यांच्या घरीं मांसाशन होत असे. त्यांचे मातुल मदिराभक्त होते. मुन्शीरामजी लहान असतां हेच मातुल मदिरेच्या निशेंत विचित्रपणें हावभाव करीत येत असतां तें कुदृश्य मुन्शीरामजींच्या नजरेस पडूं नये म्हणून मुन्शीरामजींच्या मातेनें खबरदारी घेतली. पण भागिनी मृत होतांच या मामानें भाच्याकडे जाण्यायेण्याचें सुरूं ठेविलें, व आपल्या एकच प्यालयाचा एकच घोट भाच्यास पाजण्याची खबरदारी घेतली. जेथें मामा भाच्यास मदिरापानाचे धडे देण्यास तयार होतो, तेथें भाचास मदिरापानाचा मोह कसा आवरेल ? मुन्शीरामजींच्या भिडस्त मनाला मामानें पुढें केलेला मदिरेचा 'एकच प्याला' परतवणें अशक्य झालें. एकच प्याला घेतां घेतां मुन्शीरामजी मामाच्या तालमेंत बाटली बाटली मदिरा फस्त करण्यास शिकले.

मुन्शीरामजी मदिरेच्या निशेमध्यें बेहोष असतां त्यांना दिवाळीच्या दिवसांत मैथिल नांवाच्या पंडितानें जुव्याच्या अड्यांत नेलें. यापूर्वी बालवयांत मुन्शीरामजी आपल्या संवगड्याबरोबर कवड्यारेवड्यांचा जुव्वेवजा खेळ खेळत असत. पण मैथिल पंडितानें त्यांना प्रत्यक्ष जुव्वेबाजाशीं जुव्वा खेळण्यास लावलें. पहिले दिवशीं त्यांना जुव्यामध्यें ४०।५० रुपयांची प्राप्ति झाल्यामुळें पुन्हां दुसरे दिवशीं जुव्याचें प्रलोभन सुटलें नाहीं. पुढें दोन तीन दिवसांत ते सुमारें दोनशें रुपये हरले. मुन्शीरामजींचे वडील रात्रीं चोर दरवडेखोर जुव्वेबाज लोकांना धरण्याकरतां रात्रभर शहरांत फिरत तर त्यांचे चिरंजीव जुव्वेबाजांच्या अड्ड्यांत जुव्वा खेळत ! पण जुव्वेबाजांच्या मुखांतून निघणाऱ्या अपशब्दामुळें व त्यांच्या निंद्य आचरणामुळें मुन्शीरामजी या जुव्वेबाज मंडळींचा लवकरच तिरस्कार करूं लागले.

बुडत्याचा पाय खोलांत या उक्तीप्रमाणें मुन्शीरामजींचे पाय पाप-पंकांत किंवा व्यसन कर्दमांत दिन प्रतिदिन अधिकाधिक रुतत होते, तरी पण त्यांचीं व्यसनें अद्याप पावेतों मर्यादेंत असल्यामुळें त्यांच्या शिक्षणांत किंवा व्यायामांत विशेषसा व्यत्यय आला नाहीं.

---

# श्रद्धाञ्जलि १० वी.

## शुभमंगल सावधान !

**संतुष्टो भार्यया भर्ता भर्त्रा भार्या तथैव च ॥**
**यस्मिन्नेव कुले नित्यं कल्याणं तत्र वै ध्रुवम् ॥**

एके दिवशीं प्रातःकाळीं मुन्शीरामजी स्नान करण्यापूर्वी मनकर्णिका घाटावरून सेंधिया घाटाकडे सहल करीत जात असतां कंकणाचा मंजूळ आवाज, व रुदनाचा आर्तस्वर त्यांना ऐकूं आला रुदनध्वनि ऐकतांच घाटखालीं असलेल्या गुंफेकडे मुन्शीरामजी धांवत गेले; तों एक नग्न साधु एका युवतीला आंत ओढीत आहे व ती ललना त्या पाप्याच्या हातून सुटण्या-करितां धडपड व आक्रोश करीत आहे असें त्यांना दिसलें. एका माणसाच्या साहायानें मुन्शीरामजींनीं त्या अबलेची त्या नग्न नरराक्षसाच्या हातून सुटका केली व तिच्या पातिव्रत्याचें रक्षण केलें

ती १६।१७ वर्षें वयाची युवती त्या पाप्याच्या हस्तस्पर्शामुळें व हल्लयामुळें बेशुद्ध झाली होती, म्हणून मुन्शीरामजीनें तिला शुद्धीवर आण-ण्याचा प्रयत्न चालविला. पुत्रप्राप्तीच्या इच्छेनें पुष्कळ स्त्रिया या साधूकडे भक्तिभावानें पंचपक्वान्नाचें ताट अर्पण करण्याकरितां येत असत. हा नग्न साधु पंचपक्वान्नांचा स्वीकार करून त्यांना ' पुत्रवती भव ' असा आशीर्वाद देत असे. पुत्रप्राप्ति व्हावी याच इच्छेनें प्रेरित होऊन ती अबला पंच-पक्वान्नांचा नैवेद्य साधूस समर्पण करण्याकरितां त्याकडे प्रातःकाळींच गेली होती. पतिव्रतांच्या अन्नावर पुष्ट झालेल्या त्या नग्न साधूच्या मनांत

पापानें प्रवेश केला व त्या अधमानें त्या अबलेचा हात धरला. ऐनवेळीं मुन्शीरामजी तेथें गेले म्हणून त्या अबलेचें रक्षण झालें. पुन्हां काशींत राहणार नाहीं असें त्या नराधमाकडून कबूल करवून त्यांनीं त्यास हांकून दिलें व त्या अबलेस तिच्या घरीं पोंचतें केलें. अबलांचें व अनाथांचें दुष्टांच्या हातून रक्षण करण्यास मुन्शीरामजी सदा तत्पर असत.

इंग्रजी शिक्षणामुळें व इंग्रजी कादंबऱ्यांच्या वाचनामुळें मुन्शीरामजींच्या मनावर पाश्चात्य चालीरितीचा प्रभाव पडला होता. नग्न साधूच्या हातून रक्षण केलेल्या त्या युवतीचे ते आपणांस वीररक्षक समजूं लागले. त्या मुक्त अबलेस आपली प्रियदेवता समजून ते तिचे सदैव रक्षक बनले. पाश्चात्य कादंबऱ्यांच्या कथानकाप्रमाणें ते स्वतःस वीररक्षक व मुक्त युवतीस आराध्य देवता मानूं लागले.

पण मुन्शीरामजींची आपल्या प्राचीन इतिहासावर भक्ति असती तर आर्यसभ्यतेप्रमाणें ते त्या स्त्रीचे रक्षाबंधु होऊन तिच्या पातिव्रत्यरक्षणाचें रक्षाबंधन हातांत बांधते व तिच्या रक्षणाची प्रतिज्ञा करते; पण आर्यसभ्यतेस रानटीपणा व आर्य साहित्यास मूर्खपणा मानणाऱ्या मुन्शीरामजींस आर्यविचार त्या वेळीं कसे सुचावेत ?

याच सुमारास मुन्शीरामजींच्या घरच्या मंडळीमध्यें मुन्शीरामजींच्या विवाहाचे विचार सुरू झाले. मुन्शीरामजींकरितां कुलशीलवान् व रूपवान् वधु निश्चित करून त्यांच्या मातेच्या अंतिम इच्छेप्रमाणें त्यांच्या पित्यांनीं त्यांचा विवाह मोठ्या थाटामाटानें करण्याचें ठरविलें. विवाहाची तयारी जोरानें सुरूं झाली.

पाश्चात्य साहित्याच्या वाचनानें मुन्शीरामजींचे विवाहविषयक विचारही भिन्न बनले होते. इतर तरुणाप्रमाणें आपलाही विवाह होणार हें समजतांच त्यांना आनंद झाला. उत्तमोत्तम कादंबऱ्यांत वर्णिल्याप्रमाणें आपली भावी पत्नी गुणवान्, रूपवान्, व तरुण असेल अशी मुन्शीरामजींनीं काव्य-कल्पना केली. आपल्या भावी पत्नीकरितां त्यांनीं निरनिराळ्या उपयुक्त अमोलिक वस्तू खरेदी केल्या. आणि वडिलांच्या पत्राप्रमाणें आपल्या गांवाकडे प्रयाण केलें.

तळ्यनला जातांच मुन्शीरामजींस आपल्या मृतमातेचें स्मरण झालें. व त्यांच्या नेत्रांतून अश्रु वाहूं लागले. मंडळींनीं त्यांचें समाधान केलें. सन १८७७ मध्यें वयाच्या २१ व्या वर्षीं मुन्शीरामजींचा विवाह एका द्वादशवर्षीय कुलीन कुमारिकेबरोबर मोठ्या समारंभानें झाला. पत्नीच्या पदरास शेल्याची गांठ बांधून मुन्शीरामजी देवब्राह्मणांच्या व वडील मंडळींच्या पायां पडले. पण पत्नीच्या मुखाचें त्यांना दर्शनही झालें नाहीं.

एका द्वादशवर्षीय अप्रबुद्ध बालिकेचें आपल्या गळ्यांत लोढणें घातलें म्हणून मुन्शीरामजींस वडिलांचा राग आला. पाश्चात्य पद्धतीप्रमाणें विवाह होतांच पत्नीशीं संभाषण करणें, तिच्याबरोबर फिरावयास जाणें हें तर लांबच राहिलें, पण तिचें मुखावलोकन करणेंही दुर्लभ झालेले पाहून मुन्शीरामजींच्या काव्य कल्पना नष्ट झाल्या व त्यांच्या चित्तास निराशेनें वेढलें. पण ते निराशेच्या जाळ्यांत फार वेळ सांपडले नाहींत. पत्नीला स्वतः शिक्षण देऊन सुशिक्षित करूं अशा आशादायक विचारानें त्यांची निराशा नाहींशी झाली व त्यांचें चित्त प्रसन्न झालें. -

बालविवाहामुळें होणारे तोटे मुन्शीरामजींसही सोसावे लागले. त्यांचें संपूर्ण शिक्षण संपल्यावर वयाच्या पंचविसाव्या वर्षीं जर त्यांचा विवाह झाला असता तर उत्तम झालें असतें. परंतु त्यांना विद्यार्थी दशेंतच गृहस्थाश्रमांत प्रवेश करणें भाग पडल्यामुळें त्यांच्या शिक्षणांत व भावी आयुष्यक्रमांत बराच व्यत्यय आला.

मुन्शीरामजी विवाहानंतर तीन चार महिने आजारी पडले. भयंकर क्षीणतेमुळें त्यांना वेळेवर कॉलेजमध्यें जातां आलें नाहीं. थोडी प्रकृति सुधारतांच मुन्शीरामजींनीं अलाहाबाद सेंट्रल कॉलेजमध्यें प्रवेश केला; व तेथें ते शिक्षण संपादूं लागले. या कॉलेजच्या वाग्वर्धिनी सभेंत त्यांनीं बराच भाग घेतला. यामुळें निरनिराळ्या वक्त्यांचीं भाषणें ऐकण्याचा व छोटीं मोठीं भाषणें स्वतः करण्याचा मुन्शीरामजींस शोक उत्पन्न झाला.

प्रयागला शिक्षण घेत असतां मुन्शीरामजींचा एका साधूशीं विशेष परिचय झाला. निबिड अरण्यांत रहाणारा हा साधु मध्यरात्रीं ध्यानस्थ

असतां एक व्याघ्र साधूच्या चरणापाशीं बसून पहारा करीत असे. साधूच्या दर्शनास येणाऱ्यास या व्याघ्रापासून मुळींच त्रास होत नसे. साधूचें हें महान् सामर्थ्य पाहून नास्तिक मुन्शीरामजी त्या साधूवर मोहित झाले. मुन्शीरामजी एक विचित्र प्रकारचे नास्तिक होते. काष्ठपाषाणांच्या देवतांवर जरी त्यांचा विश्वास नव्हता तरी योगामध्यें कांहीं अतर्क्य सामर्थ्य आहे असें वाटल्यामुळें एका हटयोग्याजवळ ते हटयोग करण्यास शिकलेले होते. पण या साधूच्या उपदेशानें हटयोग शरीरास अपायकारक आहे अशी खात्री झाल्यावरून त्यांनीं हटयोग करण्याचें सोडून दिलें व परीक्षा झाल्यावर त्या साधूजवळ राजयोग करण्याचें त्यांनीं ठरविलें.

केवळ तीन तास निद्रा घेऊन मुन्शीरामजींनीं जिवापाड परिश्रम घेऊन परीक्षेची तयारी केली. पहिले तीन दिवस परीक्षेस बसल्यावर चौथ्या दिवशीं प्रश्नपत्रिका लिहीत असतां मुन्शीरामजीस भयंकर ज्वर आला, व प्रश्न न सोडवितां घरीं यावें लागलें. अशा रीतीनें मुन्शीरामजींस परीक्षेंत अपयश आलें.

परीक्षेंत अनुत्तीर्ण झाल्यामुळें त्यांच्या मनास निराशेनें ग्रासलें. ते निराशावादी झाले. परीक्षेची उदासीनता एकाच प्याल्यांत बुडवून टाकण्याचा त्यांनीं विचार केला. एकस्ट्रा नंबर १ ब्रांडीची बाटली व एकच प्याला मेजावर ठेवून मुन्शीरामजी रात्रीं १२–१ वाजेपर्यंत बेकनचे निबंध व शिक्षणाची प्रगति इत्यादि विचारक्रांति करणारीं पुस्तकें वाचूं लागले. इकडे मस्तकामध्यें सिद्धांतावर सिद्धांतांचे विचार व दुसरीकडे प्याल्यावर प्याले मदिरा झोंकण्याचें कार्य! अशा रीतीनें एका रात्रीमध्यें पुस्तक वाचतां वाचतां दारूची एकेक बाटली ते फस्त करूं लागले. अशा रीतीनें एकच प्याल्यांतून मदिरापान करण्यांत व विचारक्रांतिकारक पुस्तकें वाचण्यांत त्यांनीं सात महिने पितृग्रामीं काढले. नानकचंद्रजी फिरतीवर असत किंवा गांवीं असले तरी रात्रीं कार्यवश सदा बाहेर जात; त्यामुळें मुन्शीरामजीस यथेच्छ पान करण्यास सांपडलें. कदाचित् नानकचंद्रजी घरीं एकाएकीं आले तर मुन्शीरामजीस पुस्तक वाचण्यांत निमग्न पाहून ' मुलगा मोठा अभ्यासी आहे ' असें त्यांना वाटे !

त्यांची परिक्षा पुन्हां जवळ आल्यामुळें त्यांचे वडिलांनीं त्यांना अलीगढला इस्लामी कॉलेजचे प्रोफेसर रमाशंकर M.A. यांचेकडे पाठविलें. हे रमाशंकर मोठे मदिराभक्त होते; त्यांनीं मुन्शीरामजींचें आतिथ्य मदिरेच्या एकाच प्याल्यानें करण्यास सुरवात केली. अशा रीतीनें अभ्यासाकरितां अलीगढला गेलेले मुन्शीरामजी पुस्तकी अभ्यास न करतां मदिरेचा मात्र एकनिष्ठतेनें अभ्यास करूं लागले.

अलीगढला महामारीचा उपद्रव सुरूं झाल्यामुळें मुन्शीरामजी परत वडिलांचे गांवीं आले. व त्यांचे वडील नानकचंद्रजी एके दिवशीं रात्रीं कामावर गेले असतां ते एका लग्नघरीं निमंत्रण आल्यावरून तेथें गेले. पण मंगलविवाहानंतर नर्तकीचें नृत्यगायन करण्यांत व वधूवरासमवेत अमंगल मदिरापान करण्यांत त्या वेळचे तिकडचे लोक मोठेपणा मानीत असत.

त्या बैठकींत नृत्यगायन सुरूं झालें असतां मुन्शीरामजी दाखल झाले. गायनाच्या आनंदांत मद्यार्काचीही मौज सुरूं झाली. मद्यार्काचे प्याल्यावर प्याले स्वाहा होऊं लागले. प्रत्येकानें आकंठ मद्यपान केलें. मुन्शीरामजींनाही या कार्यांत भाग घ्यावा लागला, येवढेंच काय पण नर्तकींना व वेश्यांनाही मदिरा प्यावयास भाग पडलें. मदिराप्राशन आकंठ केल्यामुळें सर्वजण बेहोश झाले.

मदिरासक्त एक जरठ निशेमध्यें नर्तकीचा हात धरून नाचूं लागला, वेडविद्रे हावभाव करून गाऊं लागला. नर्तकी भयभीत झाली. मुन्शीरामजी त्यावेळीं साधारण शुद्धीवर होते. त्यांनीं त्या वृद्धाच्या हातून वेश्येची सुटका केली. नाच, गाणें, बजावणें, बंद झालें. मदिरासक्त मंडळींचें बरळणें, ओरडणें सुरूंच होतें. कित्येकांना अतिपानामुळें ओकाऱ्या होऊं लागल्या. एकाची वांति दुसऱ्याच्या मुखांत पडून दुसरा ती मद्य म्हणून आनंदानें चाटूं लागला. मुन्शीरामजी त्या सर्व पतितांबरोबर जरी पतित झाले होते तरी थोडेसे शुद्धीवर होते. त्या सर्व घाणेरड्या दृश्यामुळें मुन्शीरामजीस किळस आली. पुन्हां दारू प्यावयाची नाहीं व नाचगाण्याच्या बैठकीस जावयाचें नाहीं असा त्यांनीं विचार केला, पण तो विचार आचारांत आला कीं एकाच प्याल्यांत लुप्त झाला ?

———

# श्रद्धाञ्जलि ११ वी.

## सद्गुरु महर्षि दयानन्दांचा सत्संग !

**अज्ञानतिमिरान्धानां ज्ञानांजनशलाकया ।**
**चक्षुरुन्मीलितं येन तस्मै श्रीगुरवे नमः॥**

मुन्शीरामजी दिन प्रतिदिन पापप्रवाहांत वेगानें वहात जात होते. कुसंगतीच्या योगानें त्यांच्या जीवनाची भयंकर हानि झाली होती. व्यसन-सोपानाच्या खालून वर जाणाऱ्या चढत्या पायऱ्या ते चढले. असत्य भाषण, असत्य आचरण, हुक्केबाजी, जुव्वेबाजी व मदिरापान इत्यादि पायऱ्या ते चढून गेले. त्यांच्या पापास आरंभीं अगदीं क्षुल्लक अशा असत्य वदण्यापासून सुरवात झाली, पण त्याचा परिपोष मदिराप्राशनासारख्या भयंकर व्यसनांत झाल्याकारणानें त्यांच्या पूर्वायुष्याची फार हानि झाली. पापाच्या क्षुल्लक उंचवट्यावरून मार्ग क्रमतां क्रमतां ते मदिरापानासारख्या पापाच्या पर्वतावर उभे राहिले. पर्वतप्राय पापें हातून झाल्यामुळें मुन्शीरामजींना भावी आयुष्य भयंकर भीषण असें दिसूं लागलें.

चोहोंकडे अंधःकार, चोहोंकडे उदासीनता, जिकडे तिकडे निराशाच निराशा त्यांना दिसूं लागली. आशेचा एकही किरण त्यांना दिसेनासा झाला उन्नतीचा प्रकाश त्यांना मार्ग दाखवीनासा झाला, सुधारण्याचा एकही पंथ त्यांच्या नजरेस पडेना. अशा रीतीनें दिशाभूल होऊन मुन्शीरामजी अंधपणें पापाच्या पर्वतावरून प्रवास करीत होते. मदिराप्राशनाच्या व्यसनानें ते पापाच्या अत्युच्च कड्यावरून अधोगतीच्या खोलतर गर्तेंत पडले.

खड्ड्यांत पडलेल्या वनराजाप्रमाणें वर येण्यासाठीं सिंहगर्जना करीत वर येण्याची ते धडपड करूं लागले. पुन्हां दारू प्यावयाची नाहीं अशी त्यांनीं कित्येक वेळां प्रतिज्ञा केली. मदिरापानाचा परित्याग केल्याविना आपलें पशुतुल्य आचरण सुधारणार नाहीं या जाणीवेनें त्यांनीं मदिरापान न करण्याचा दृढ निश्चय केला, पण व्यर्थ ! मद्यपी माणसाच्या महत्त्वा-

कांक्षा, त्याचे सुविचार, त्याच्या भीष्मप्रतिज्ञा, मद्याच्या प्याल्यांत विलीन होतात. मुन्शीरामजींच्या प्रतिज्ञा व सुखाशा मद्याच्या एकाच प्याल्यांत विरून गेल्या कांहीं दिवस ते आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें वागत; पण मद्यपी मित्रांच्या मद्यगृहामध्यें त्यांचा निश्चय डळमळून जात असे.

पुत्राच्या नास्तिकतेप्रमाणें मद्यासक्ततेची नानकचंद्रजींस पूर्ण जाणीव झाली होती. ते स्वतः अत्यंत निर्व्यसनी व शिवभक्त होते. आपल्या पोटीं असला नास्तिक कुलांगार मद्यपी निपजला म्हणून त्यांना मनस्वी दुःख होई. योग्य शब्दांत त्यांनीं मुन्शीरामजींची कानउघाडणी करण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ ! मद्यासक्ततेमुळें मुन्शीरामजीवरील त्यांचें प्रेम तिळमात्रही कमी झालें नाहीं. पुत्राच्या कर्तृत्वशक्तीवर त्यांचा पूर्ण विश्वास होता. आपल्या पुत्राचें आचरण कोणत्या ना कोणत्या उपायांनीं सुधारावें म्हणून त्यांनीं एकसारखे प्रयत्न चालूं ठेविले.

संवत् १९३६ ( सन १८७९ ) मध्यें श्रावण महिन्यामध्यें स्वामी दयानन्दसरस्वती नामक एक महाविद्वान् विभूति बासबरेलीला व्याख्यान देऊं लागली. स्वामीजींच्या व्याख्यानाचा योग्य बंदोबस्त राखण्याकरितां नानकचंद्रजी गेले असतां स्वामींच्या विद्वत्ताप्रचुर भाषणाचा त्यांच्या मनावर विलक्षण प्रभाव पडला व स्वामींच्या व्याख्यानश्रवणानें मुन्शीरामजींच्या नास्तिकतेची निवृत्ति होईल असें त्यांना वाटलें.

**जाड्यं धियो हरति सिञ्चति वाचि सत्यं**
**मानोन्नतिं दिशति पापमपाकरोति ।**
**चेतः प्रसादयति दिक्षु तनोति कीर्तिं**
**सत्सङ्गतिः कथय किं न करोति पुंसाम् ॥**

सत्संगति बुद्धीचें जाड्य हरण करतें, वाणीद्वारें अमृताचें सिंचन करते, मान वाढवून दशदिशा कीर्ति फैलाविते, चित्त प्रसन्न करते. या संतसंगामुळें नराचा नारायण व पाप्याचा परमेश्वर बनतो.

या साधुश्रेष्ठाच्या सत्संगानें मुन्शीरामजी नास्तिकाचे आस्तिक, मद्यप्याचे निर्व्यसनी बनतील असें नानकचंद्रजीस वाटलें. व्याख्यान समाप्तीनंतर घरीं येतांच ते मुन्शीरामजीस म्हणाले, “ बेटा मुन्शी, एक

दंडी संन्यासी येथें आले असून अतिविद्वान व योगिराज आहेत. त्यांच्या व्याख्यानश्रवणानें तुझ्या संशयाची निवृत्ति होईल. उद्ईक माझ्याबरोबर व्याख्यानास चल."

मुन्शीरामजींनीं होकारार्थी उत्तर दिलें पण त्यांच्या मनांत विचार आला कीं एक संस्कृत जाणणारा संन्यासी बुद्धीवादपूर्वक व तर्कशुद्ध बोलणें अगदीं अशक्य आहे.

पित्याबरोबर व्याख्यान ऐकण्यास मुन्शीरामजी गेले असतां स्वामींची तेजःपुंज दिव्य मूर्ति पाहून मुन्शीरामजींचा मनांत श्रद्धा उत्पन्न झाली. स्वामींच्या चरणापाशीं रे. पादरी स्कॉट व अन्य तीन युरोपियन उत्सुकतेनें व्याख्यान ऐकत बसलेले पाहून मुन्शीरामजींची श्रद्धा द्विगुणित झाली.

परमेस्वराचें नाम " ओम् " या विषयावर स्वामी दयानन्दजी व्याख्यान देत होते. व्याख्यानश्रवणानें नास्तिक मुन्शीरामजींच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. नास्तिक असूनही मुन्शीरामजीस अभूतपूर्व आत्मिक आनंद झाला. स्वामींच्या व्याख्यानानें प्रभावित झाल्यामुळें स्वामींचें व्याख्यान ऐकण्यास ते दररोज जाऊं लागले. त्यांची श्रद्धा दिन-प्रतिदिन शुक्लेंदुवत् वाढूं लागली. खाण्यापिण्याव्यतिरिक्त ते आपला सर्व समय स्वामीजींच्या सत्संगामध्यें व्यतीत करूं लागले. नानातऱ्हेचे लोक स्वामीजींस भिन्न भिन्न प्रकाराचे प्रश्न विचारीत, स्वामीजी त्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें समाधानकारक रीतीनें देत असतां मुन्शीरामजी तेथेंच असत, व त्यामुळें त्या प्रश्नोत्तरांचा त्यांना आनंद लुटावयास मिळे.

स्वामींच्या भाषणांत कोटिक्रम व हास्यरस असे. पुराणांतील असंभाव्य गोष्टींवरील स्वामींची टीका ऐकतांना युरोपियन लोकांना हास्याची उकळी फुटलेली पाहून स्वामीजी म्हणाले, " पुराणांच्या लीला मीं वर्णन केल्या. आतां बायबलांतील बालिश लीला ऐका. हे लोक असे भ्रष्ट आहेत कीं कुमारीच्या पोटीं येशुख्रिस्त जन्मणें संभाव्य आहे असें सांगून त्याचा दोष सर्वशुद्ध परमात्म्यावर लादण्यास थोडे सुद्धां लाजत नाहींत. "

हें भाषण ऐकून कलेक्टर कमिशनरांचीं मुखें क्रोधानें लाल झालीं. पण आचार्यांचें भाषण पहिल्याप्रमाणेंच जोरानें चाललें होतें, व आपल्या

भाषणांत ते ख्रिस्तीधर्माचें शेवटपर्यंत खंडण करीत होते ! स्वामींनीं पुन्हां ख्रिस्तीधर्माचें खंडन करूं नये म्हणून कलेक्टर कमिशनरानें आपल्या सेवकाहातीं धमकीवजा निरोप पाठविला. परंतु स्वामीजी सत्यवक्ते व स्पष्टवक्ते होते. **निस्पृहस्य तृणं जगत्** या उक्तीप्रमाणें स्वामी कोणाच्या धमकीला, दरडावणीला भीक घालणारे भ्याडवृत्तीचे नव्हते

दुसरे दिवशीं आत्म्याचें स्वरूप या विषयावर व्याख्यान देतांना कलेक्टर कमिशनराकडे दृष्टिकटाक्ष टाकीत स्वामी निर्भयतेनें म्हणाले, " लोक म्हणतात कीं सत्य प्रकट करूं नका. कलेक्टर क्रुद्ध होईल, कमिशनर अप्रसन्न होईल, गव्हर्नर पीडा देईल. अरे चक्रवर्ती राजा कां रुष्ट होईना, आम्ही तर कोणाची भीति न धरतां सदोदित सत्याचेंच प्रतिपादन करणार. "

**नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।**
**न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ॥**

या गीता श्लोकाची व्याख्या करित स्वामी म्हणाले. " आत्म्यास न अग्नि भस्म करूं शकतो, न शस्त्र कापूं शकतें, न जल बुडवूं शकतें, न वायु सुकवूं शकतो. आत्मा अविनाशी व अमर आहे. हें शरीर नाशवंत व अनित्य आहे. या शरीराचा लोभ धरून सत्य प्रकट न करणें म्हणजे अधर्म आहे. " स्वामी दयानंदजी चोहोंकडे पहात गर्जना करीत म्हणाले. " परंतु माझ्या शरीराबरोबर माझ्या आत्म्याचा नाश करणारा शूरवीर मला कोणी दाखवा. जोंपर्यंत आत्म्याचा नाश करणारा जगांत मला कोणी आढळत नाहीं, तोंपर्यंत प्राणभयानें सत्य प्रकट न करण्याचा विचारही मी मनांत आणणार नाहीं. "

स्वामींच्या या निर्भय भाषणानें चोहोंकडे शांतता पसरली. त्यांच्या या धैर्यशाली व निःस्पृह भाषणानें मुन्शीरामजींच्या मनावर फारच इष्ट परिणाम झाला. आतांपर्यंत मुन्शीरामजी आपल्या नास्तिकतेबद्दल फारच अभिमान धरीत होते. निरनिराळे मुद्दे, व भिन्नभिन्न प्रमाणें काढून ईश्वराच्या अस्तित्वावर आक्षेप घेण्याकरतां व स्वामींशीं वादविवाद करण्याकरतां मुन्शीरामजी मोठ्या तयारीनें व उत्साहानें जात. पण स्वामीजी आपल्या तर्कशुद्ध व युक्तिप्रचुर भाषणानें मुन्शीरामजीस तेव्हांच निरुत्तर

करीत. स्वामींना वादविवादांत पराजित करण्याच्या प्रेरणेनें जाणारे मुन्शीरामजी स्वतःच पराजित होत व त्यांच्या मुखावर मौनाची मोहोर ठोकली जाई. त्यांनीं दोनचार वेळ प्रयत्न करून पाहिला पण त्यांची वादविवाद-कुशलता स्वामींच्या भाषणापुढें फिकी पडली.

"स्वामीजी, आपली तर्कबुद्धि अति प्रबळ आहे. आपण मला वादविवादांत हरविलेंत. पण माझ्यामध्यें परमेश्वर आहे असा विश्वास मात्र उत्पन्न केला नाहीं." मुन्शीरामजी अखेरीस काकुळतीस येऊन म्हणाले.

"हें पहा, तूं प्रश्न केलेस त्यांचीं मीं उत्तरें दिलीं. ही युक्तीची गोष्ट झाली. तुझा परमेश्वरावर विश्वास बसवीनच अशी मीं कधीं प्रतिज्ञा केली ? " स्वामी हंसत म्हणाले.

**नायमात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया न बहुना श्रुतेन ॥**

परमेश्वरावर विश्वास केवळ बुद्धिवाद केल्यानें, वाचनानें किंवा प्रवचनानें बसत नसतो. परमेश्वराच्या अस्तित्वाची प्रचीति येण्यास फार परिश्रम पडतात. जेव्हां परमेश्वराची मर्जी होईल तेव्हांच तुझा त्याच्यावर विश्वास बसेल."

स्वामी दयानन्दसरस्वतींच्या या भाषणानें मुन्शीरामजींची खात्री झाली कीं परमेश्वर हा इंद्रियगम्य नाहीं. इन्द्रियातीत परमेश्वराच्या अस्तित्वाची अंधुक कल्पना त्यांना आली. परमेश्वर जगाचा चालक, पालक व संहारक आहे हें स्वामींच्या युक्तिसिद्ध भाषणानें त्यांस पटलें. त्यांच्या नास्तिकतेचा अभिमान नाहींसा झाला व ते हळूहळू आस्तिक होऊं लागले.

स्वामींच्या सत्संगाचा, त्यांच्या उपदेशाचा मुन्शीरामजींच्या मनावर व आचरणावर अत्यंत अनुकूल परिणाम झाला. सत्संगाचा महिमाच असा विलक्षण आहे. सत्संगानें त्यांच्या आयुष्यक्रमांत बराच बदल झाला; त्यांच्या विचारांत भयंकर क्रांति झाली, अधोगतीच्या गर्तेतून उन्नतिसोपानाच्या पायऱ्या त्यांना दिसूं लागल्या.

त्यांच्या मस्तकांतील शंका कुशंकांचा अंधःकार नाहींसा झाला. स्वामीजींनीं आपल्या ज्ञानांजनानें मुन्शीरामजींचे नेत्र उघडले. जगाकडे पहाण्याकरितां त्यांना नवीन दृष्टि मिळाल्यामुळें ते जगाकडे नवीन नजरेनें

पाहूं लागले. त्यांना नवीन उत्साह वाटूं लागला; आपणांस नवजीवनच मिळाल्याप्रमाणें त्यांना आनंद झाला. त्यांच्या अंधःकारमय जीवनाची रात्र संपून त्या वेळेपासून त्यांच्या उन्नतीचा प्रकाशमय प्रातःकाल सुरूं झाला.

---

# श्रद्धाञ्जलि १२ वी.

## आर्य सभ्यतेची श्रेष्ठता ।

**कार्येषु मंत्री वचनेषु दासी भोज्येषु माता शयनेषु रंभा ।**
**धर्मानुकूला क्षमया धरित्री भार्या च षाड्गुण्यवतीह दुर्लभा॥**

स्वामी दयानन्दसरस्वतींच्या सत्संगामुळें मुन्शीरामजींस नवीन दृष्टि मिळाल्यानें त्यांना चांगलें, वाईट, कुमित्र, सन्मित्र, नित्य, अनित्य इत्यादि गोष्टींतील भिन्नता तेव्हांच कळून येऊं लागली. कुसंगतीमुळें आपल्या आयुष्याची माती झाली असें त्यांना समजूं लागल्यामुळें अतःपर असल्या खलहृदयी मद्यप्यांच्या सावलीनेंही उभें रहावयाचें नाहीं असा त्यांनीं आपल्या मनाशीं निश्चय केला.

मनुष्य मद्याचा गुलाम बनल्यावर त्याच्या आयुष्याची हानि होते, व त्या व्यसनापासून सुटण्याचा त्याला मार्ग सांपडत नाहीं. एकच प्याला पितां पितां त्याची स्थिति अति भयंकर होते व मद्यप्याला मद्यपानांत मृत्यु येतो असें कविश्रेष्ठानें म्हटलें तें खरें असल्यानें हा एकच प्याला ओठास लावण्यापूर्वी माणसानें सावध राहिलें पाहिजे, व त्याचवेळीं मद्याचा अव्हेर केला पाहिजे. पण मद्याची एकदां कां लज्जत लागली तर ती चितेवर देहाचें भस्म होईपर्यंत सुटत नाहीं. तरी पण मद्यप्यांना पक्के मदिराभक्त बनल्यावरही मद्य कसें सोडतां येतें व आपलें चरित्र कसें उज्ज्वल करितां येतें हें आमच्या चरित्रनायकाच्या चरित्रावरून सहज समजण्यासारखें आहे.

मद्यपी मित्रांच्या सावलीस उभें रहावयाचें नाहीं, त्यांच्यापासून दूर रहावयाचें असा मुन्शीरामजींनीं निश्चय केला. हाच निश्चय सामर्थ्य सोपा-

नाच्या प्रथम पायरीप्रमाणें होता. उन्नतीच्या चढणीवरील एक पायरी मुन्शीरामजी या विचारानें चढले खरे! मद्यप्यापासून दूर रहावयाचें पण मद्यपीच जवळ येऊन लगट करूं लागले तर काय करावयाचें?

एके रात्रीं मुन्शीरामजी घरीं येत असतां त्रिवेणीसहाय नांवाच्या मद्यपी मित्रानें त्यांचा हात धरून त्यांना आपल्या खोलींत नेलें, व मुन्शीरामजी नको नको म्हणत असतां त्यांच्या मुखांत त्या मद्यप्यानें तो मद्याचा पेला बळेंच ओतला. एकामागें एक दोन तीन प्याले दारू प्याल्यामुळें मुन्शीरामजी बेहोश झाले. त्यांच्या इतर मद्यपी मित्रांनीं त्यांना निशेच्या भरांत वेश्येच्या घरीं नेलें. यापूर्वीं मुन्शीरामजी कधींही वेश्येच्या घरीं गेले नव्हते. पोलीस इन्स्पेक्टरचा मुलगा आपल्या घरीं आलेला पाहून वेश्यांनीं गायनाची तयारी चालविली. गायनास वेळ झालेला पाहून मुन्शीरामजी क्रुद्ध होऊन कांहींसे बोलले. भीतीनें थरथर कांपत वेश्या हात जोडून क्षमा मागूं लागली. पण मुन्शीरामजी तेथें क्षणभरही उभे न रहातां घराकडे निघाले.

दारूच्या निशेमुळें मुन्शीरामजीस आपल्या घराचा जिनाही चढणें अशक्य झालेलें पाहून त्यांच्या सेवकांनीं त्यांना त्यांच्या माडीवरील खोलींत पोंचविलें. मुन्शीरामजीस उलटी होऊं लागली. त्यावेळीं शिवदेवीनें त्यांच्या मस्तकावर आपला कोमल कर ठेविला. मुन्शीरामजी शिवदेवीच्या हातांत शिशुवत् पडले. पत्नीनें त्यांचें मुख धुवून पुसून त्यांना बिछान्यावर निजविलें. पतीस निद्रा लागली तरी ती सती पतिसेवा करीतच होती.

दोन वाजण्याच्या सुमारास मुन्शीरामजी जागे होऊन पाहतात तों आपली पत्नी शुद्धांतःकरणानें पतिप्रेमानें प्रेरित होऊन पतिसेवा करीत आहे, या दृश्यानें मुन्शीरामजींच्या हृदयावर परिणाम झाला. व आपल्या अधःपाताबद्दल त्यांना पश्चात्ताप वाटला. आपल्या अधोगतीची कहाणी पत्नीस सांगून त्यांनीं तिची क्षमा मागितली. तेव्हां आर्यसती शिवदेवी म्हणाली "नाथ, आपण माझे स्वामी आहांत. माझी क्षमा मागून आपण मला पापपंकांत कां लोटतां, स्त्रियांना या जगतीं पतिसम दैवत दुसरें नाहीं. पतीस परमेश्वर समजून त्यांची सेवा करावी असें मला शिक्षण मिळालें आहे."

आर्य स्त्रियांच्या पातिव्रत्याच्या पुण्यप्रभावापुढें भारतभू रसातळास गेली नाहीं. या महिलांच्या सतित्वामुळें भारत देशाच्या पुनरुत्थापनाची कांहीं आशा आहे असें मुन्शीरामजींस वाटलें. दुसऱ्या दिवसांपासून त्यांच्या जीवनांत परिवर्तन झालें.

त्यांच्या दारूच्या दुकानदाराचे सुमारें तीनशे रुपये द्यावयाचे होते, त्याचा तगादा सुरू झाला. पण मुन्शीरामजीजवळ एक कपर्दिकाही शिल्लक नव्हती; त्यामुळें त्यांना चिंता उत्पन्न झाली. शिवदेवीला पतीच्या चिंतेचें कारण समजून येतांच पतीच्या सुखांत स्वतःचें सुख, व पतीच्या संकटांत स्वतःचें संकट समजणाऱ्या त्या साध्वीनें आपल्या हातांतील सोन्याच्या गोठाची जोडी मुन्शीरामजीपुढें टाकीत म्हटलें, "इतकेंच ना ? माझे हे सोन्याचे गोठ विकून टाकून चिंतामुक्त व्हा.——"

"देवी, तुला अलंकारांनीं सुशोभित करण्याऐवजीं तुझीं आभूषणें काढण्याचें मी पाप कसें करूं" मुन्शीरामजी सद्गदित होऊन म्हणाले.

"नाथ, असा संकोच धरूं नका." शिवदेवी म्हणाली, "आपली चिंता माझ्याजवळ शिल्लक असलेल्या या सुवर्णवलयांनीं दूर होणार असली तर मला त्यांत आनंदच आहे. पति हाच स्त्रियांचा सौभाग्यालंकार आहे. या सौभाग्यालंकाराच्या प्रसन्नतेकरितां शेंकडो सुवर्णालंकार ओवाळून टाकावेत."

**'स्त्रियः परीक्षा तु निर्धने पुंसि'** या कविवचनानुसार मुन्शीरामजींस आपल्या पत्नीच्या औदार्याची परीक्षा झाली होती. ते या वेळीं निर्धन होते, संकटग्रस्त होते, अशा स्थितींत त्यांच्या मुक्ततेकरतां त्यांच्या पतिभक्त पत्नीनें आपल्या प्रिय अलंकाराचा मोह सोडला, व **'विपत्तौ बुद्धिदात्री च'** या सतीच्या गुणाप्रमाणें पतीच्या विपत्तीच्या समयीं त्या साध्वीनें पतीला कर्जमुक्त होण्याचा उपाय सुचविला. अशा पतिभक्तिपरायण स्त्रिया पूर्व पुण्याईनेंच प्राप्त होत असतात

पत्नीच्या या स्वर्गीय प्रेमाचा व औदार्याचा मुन्शीरामजींच्या मनावर सुपरिणाम झाला. पाश्चात्य पतिपत्नी—प्रेमापेक्षां पौर्वात्य पतिपत्नी—प्रेम अधिक निस्सीम व स्वर्गीय असतें अशी खात्री होऊन आर्य सभ्यतेवर ते प्रेम करूं लागले. पत्नीच्या अत्याग्रहावरून तिच्या इच्छेप्रमाणें मुन्शी-

रामजींनीं तीं दोन हिरण्यवलयें विकून देणेंकराचे पैसे देऊन टाकले. व अतःपर पुन्हां कधींहि मद्यपी मित्रांच्या जालांत सांपडावयाचें नांहीं असा त्यांनीं दृढ निश्चय केला.

## नौकरीचा अनुभव !

मुन्शीरामजींचें शिकण्याकडे विशेष लक्ष नाहीं असें पाहून नानकचंद्रजींनीं त्यांना बरेलीला, तहसीलदार रजेवर गेले होते त्यांच्या जागीं बदली म्हणून नौकरीस लाविलें. कांहीं दिवसांनीं मुन्शीराम मामलेदारीच्या पदावर कायमचे आरूढ होतील या आशेनें नानकचंद्रजींना आनंद वाटला. मुन्शीरामजींना मामलेदारीचें काम पहात असतां बरेलीपासून पांच कोसावरील गांवीं सोल्जरांची एक तुकडी उतरली होती तिला अन्नसामुग्री पुरविण्याकरितां हुकूम मिळाला. मुन्शीरामजी आपल्या सरकारी सेवकांसह त्या स्थानीं गेले असतां तेथील दुकानदारांचीं दुकानें सोल्जर लुटीत आहेत असें त्यांना दिसतांच त्यांनीं सोल्जरांना तो अत्याचार करण्यापासून परावृत्त केलें व सोल्जरांच्या निंद्य आचरणाबद्दल त्यांनीं कर्नल साहेबांकडे तक्रार केली. पण कर्नल साहेब सोल्जरांचा पक्ष घेऊन मुन्शीरामजीस उद्दामपणानें कटु बोलले. सरकारी सेवेंत सन्मानानें जीवन व्यतीत करणें कठीण आहे, असा कटु अनुभव येतांच मुन्शीरामजींनीं आपल्या मामलेदारीचा राजीनामा दिला. इतरांनीं पुष्कळ समजाविलें पण त्यांना तें रुचलें नाहीं. सरकारसेवेपेक्षां त्यांनीं समाजाचीच सेवा करावी असें परमेश्वरानें योजिलें होतें.

सरकारी सेवेची शृंखला ताडकन् तोडून टाकल्यावर मुन्शीरामजी आपल्या गांवीं वडिलांच्या आज्ञेप्रमाणें शेती सावकारी करूं लागले. पण शेतीसावकारीमध्येंही त्यांचें चित्त रमेना, म्हणून स्वतंत्रवृत्तीचा पोषक असा वकीलाचा धंदा करावा असें त्यांच्या मनानें घेतल्यामुळें सन १८८१ मध्यें लाहोरच्या लॉक्लासमध्यें त्यांनीं आपलें नांव दाखल केलें. कायद्याच्या पुस्तकांतील कलमांचा अभ्यास करण्यांत मुन्शीरामजी कांहीं दिवस मग्न झाल्यावर आपल्या पुतणीच्या विवाहाची तयारी करण्याकरितां त्यांना आपल्या गांवीं परत जावें लागलें. या विवाहकार्यांत बरेच दिवस गेल्यामुळें

त्याच्या व्याख्यानांची इष्ट संख्या न भरल्यामुळें त्यांना वकीलीच्या परीक्षेला पहिले वर्षी बसतां आलें नाहीं.

परीक्षेस बसतां न आल्यामुळें मुन्शीरामजी उदासीन झाले. पित्यावर किती दिवस अवलंबून रहावयाचें या विचारानें त्यांनीं मुखत्यारीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर जालंदरास वकिली करण्यास ताबडतोब सुरवात केली.

आपल्या मनमिळाऊ व गोड स्वभावामुळें मुन्शीरामजींनीं थोड्याच दिवसांत वकिलीचा चांगलाच जम बसविला. चांगल्या मंडळीमध्यें मुन्शीरामजींची जा ये सुरूं झाली. चार सभ्य मंडळींची ओळख झाल्यामुळें त्यांना चोहोंकडे मानसन्मान मिळूं लागला. तेथील पुढारी मंडळींत त्यांची गणना होऊं लागली.

एका मोठ्या वकिलाच्या येथें निमंत्रण आल्यावरून मुन्शीरामजी तेथें गेले. पानसुपारीनंतर मद्याचे प्याले प्रत्येकापुढें धरण्यांत आले. मुन्शीरामजींनीं मद्याचा अव्हेर केला. पण चार सभ्य वकिलांनीं मुन्शीरामजीस बळजबरीनें मद्य पिण्यास भाग पाडलें. त्या मद्यपी मित्रांबरोबर घरीं येत असतां एका घरामध्यें त्यांना मद्यपी मंडळींनीं नेलें. तेथें मद्याचे प्याल्यावर प्याले झोंकण्यांत आले. शेजारच्या खोलींत कंकणाचा ध्वनि मुन्शीरामजीस ऐकूं येतांच खोलीचें दार उघडून ते आंत गेले तों त्यांचा मद्यपी मित्र एका स्त्रीचें पातिव्रत्यभांडार लुटण्याच्या प्रयत्नांत आहे असें त्यांना दिसून आलें.

मुन्शीरामजींच्या मस्तकावर जणुं काय विद्युत्पातच झाला ! आपल्या शिवदेवीचेंच तो चांडाळ पातिव्रत्य लुटीत आहे असा त्यांना भास झाला. व त्या नीचाच्या हातून त्यांनीं त्या ललनेची सुटका केली. मुन्शीरामजींचें मदिरापान सभ्यांपर्यंत अनत्याचारी होतें. मद्यपानाची अत्याचारापर्यंत मजल गेलेली पाहून मुन्शीरामजींस मद्याचें पुरें वैराग्य आलें. बाटलींतील शिल्लक दारू एका पाल्यांत ओतून पुन्हां दारू प्यावयाची नाहीं अशा विचारानें त्यांनीं पूर्वक्रमानुसार तो एकच पेला उचलला व त्यांतील दारू ते प्राशन करणार तोंच त्यांच्या मनःचक्षूपुढें स्वामी दयानन्द सरस्वतींची मूर्ति उभी

राहिली व म्हणाली, “अद्यापही तूं एकच प्याला सोडीत नाहींस कां ? परमेश्वरावर तूं अजूनही विश्वास ठेवीत नाहींस काय ! ”

मुन्शीरामजींचें हृदय कांपूं लागलें. परमेश्वराच्या आस्तिक्याबद्दल त्यांची पूर्ण खात्री झाली परमेश्वराचें नांव घेऊन त्यांनीं मद्याचा तो एकच प्याला समोरील भिंतीवर फेंकून ताडकन फोडून टाकला.

**चित्तभ्रांतिर्जायते मद्यपानात् । भ्रांते चित्ते पापचर्यामुपैति ।**
**पापं कृत्वा दुर्गतिं यांति मूढाः । तस्मात् मद्यं नैव पेयं न पेयम् ॥**

चित्तभ्रांति करून पापास प्रवृत्त करणारें मद्य पुन्हां प्यावयाचें नाहीं अशी त्यांनीं परमेश्वराला स्मरून भीष्मप्रतिज्ञा केली व परमेश्वरावरील श्रद्धेमुळें ती प्रतिज्ञा त्यांनीं आमरण पाळली.

---

# श्रद्धाञ्जलि १२ वी.

**समानो मंत्रः समितिः समानि । समानं मनः सहचित्तमेषाम् ॥**
**समानं मन्त्रमभि मंत्रये वः । समानेन वो हविषा जुहोमि ॥**

पुन्हां मद्याच्या एका थेंबासही स्पर्श करावयाचा नाहीं अशी त्यांनीं शपथ वाहिली व मद्यपी मंडळींना कायमचें सोडून ते स्वगृहीं परत आले. निद्रा घेऊन ते दुसरे दिवशीं उठतात तोंच अंगांत नवीन चैतन्य संचारल्याचा त्यांना भास झाला नवीन उत्साह, व स्फूर्ति आल्यामुळें त्यांना सर्व जग आनंदमग्न वाटूं लागलें. त्यांच्या अंतःकरणांत परमेश्वरावरील दृढविश्वास उत्पन्न झाल्याकारणानें त्यांना अननुभूत आत्मिक आनंद उपभोगावयास मिळाला.

हायकोर्ट वकीलीचा अभ्यास करण्याकरितां मुन्शीरामजी मुखत्यार वकीलीचें काम सोडून पुन्हां लाहोरास गेले; व लॉ क्लासांत नियमितपणें जाऊं लागले. रविवारीं सकाळीं ते लाहोरच्या आर्यसमाज मंदिरांत गेले. तेथें त्यांना हरिकीर्तनाचा व उपदेशाचा लाभ झाला. सायंकाळीं त्यांनीं ब्रह्मसमाजामध्यें ‘ भक्तीचें महत्त्व ’ या विषयावर व्याख्यान ऐकलें.

धर्मास थोतांड समजणारे मुन्शीरामजी स्वामी दयानन्द सरस्वतींच्या व्याख्यानांनीं व प्रेरणेनें धर्मसेवक होऊं लागले. धर्मसेवा हीच श्रेष्ठ सेवा होय असें त्यांना वाटूं लागलें. ते दर रविवारीं आर्यसमाज व ब्राह्मसमाज मंदिरांत व्याख्यानास जाऊं लागले, व धर्मग्रंथांचें भक्तिभावपूर्वक अध्ययन करूं लागले.

सदाचारी धर्मसेवक आर्यसमाजी सभासदांच्या सहवासांत व त्यांच्याशीं धर्मचर्चा करण्यांत मुन्शीरामजींचा समय जाऊं लागला. जालंदराप्रमाणें त्यांना येथें कुमित्र भेटले नाहींत म्हणण्यापेक्षां खलसंगति त्यांनीं टाळण्याचा प्रयत्न केला. मनोनिग्रह केल्यास इंद्रियनिग्रह सहज होतो हें तत्त्व त्यांना कळलें. त्यांनीं मनोनिग्रह केल्यामुळें मद्याचा विचारही त्यांच्या मनांत आला नाहीं. मग इंद्रियें तिकडे कशीं जाणार ?

लाला मुन्शीरामजी ब्राह्मसमाजामध्यें व्याख्यानश्रवणास जात होते तरी त्यांच्या मनाचा आर्यसमाजाकडे अधिक कल होता. स्वामी दयानंद सरस्वतींचीं व्याख्यानें ऐकून ते श्रद्धावान् बनले. त्यांच्या प्रेरणेनें ते नास्तिकाचे आस्तिक झाले. त्यांनीं लिहिलेला सत्यार्थप्रकाश नांवाचा ग्रंथ वाचून आर्यसमाजाकडे त्यांची अधिक रुचि होऊं लागली. आपल्या हातानें समाजाची यथाशक्ति सेवा व्हावी म्हणून ते सन १८८५ मध्यें लाहोर आर्यसमाजाचे सभासद झाले.

लाला मुन्शीरामजींनीं आर्यसमाजाची व तद्वारां वैदिक धर्माची व भारत देशाची जी बहुमूल्य सेवा केली तिचें बीज स्वामी दयानन्द सरस्वतींनीं सन १८७५ मध्यें आर्यसमाजाची जी स्थापना केली त्याच्या तत्त्वांत व उद्देशांत आहे. म्हणून आर्यसमाज संस्थापक स्वामी दयानन्दसरस्वती यांचें संक्षिप्त जीवन चरित्र आणि आर्यसमाजाचा उद्देश व कार्य यांचा त्रोटक इतिहास प्रस्तुत प्रसंगीं लिहिण्याचें योजिलें आहे.

आर्यसमाजप्रवर्तक स्वामी दयानन्द सरस्वती यांचा जन्म सन १८२४ सालीं काठेवाडांतील मोरवी नामक ग्रामीं एका औदिच्य ब्राह्मणकुलांत झाला. स्वामींचें जन्मनाम मूलशंकर व त्यांच्या पित्याचें नांव अंबाशंकर असें होतें. हें घराणें कट्टें शिवभक्त होतें. अंबाशंकरांनीं मूलशंकरास वयाच्या पांचव्या वर्षापासून लिहिणें, वाचणें शिकविण्यास आरंभ केला. आठव्या

वर्षी यज्ञोपवीत संस्कार होतांच मूलशंकरास संध्याविधीबरोबर रुद्राध्यायी व यजुर्वेदसंहिताही शिकविण्यास सुरवात झाली.

वयाच्या चौदाव्या वर्षापर्यंत यजुर्वेद संहिता कंठस्थ करून त्यांनीं संस्कृत व्याकरणादि ग्रंथांचेंही बरेंच अध्ययन केलें. शिवरात्रीच्या दिवशीं बालक मूलशंकर पित्यासमवेत शिवालयांत मंत्रजागरास गेले. मध्यरात्रीनंतर मूलशंकराखेरीज सर्व माणसें निद्रावश झालीं असतां एक मूषक महादेवाच्या पिंडीवर चढून प्रसाद भक्षण करतांना पाहून मूलशंकर चकित झाला. ज्याअर्थीं महान् शक्तिमान् महादेवास मूषकापासून आपलें रक्षण करतां येत नाहीं, त्याअर्थीं जगाचा अधिपति या पिण्डीं वास न करतां दुसरीकडे कोठें तरी असला पाहिजे, यामुळें मूर्तिपूजेवरील त्यांची श्रद्धा उडाली, व परमेश्वराचा शोध हाच त्यांचा नेहमींचा विषय होऊन बसला.

त्यांच्या सोळाव्या वर्षी भगिनीच्या व चुलत्याच्या मृत्यूनें त्यांच्या मनांत मृत्यूच्या महारौद्र स्वरूपाविषयीं विचार सुरू झाले, व मृत्यूच्या मगरमिठींतून मुक्ततेचे महान विचार त्याच्या मस्तकांत सुरू झाले. संसार असार आहे हें सारभूत तत्त्व मूलशंकरास पटलें, व म्हणून त्यांच्या मुखावर उदासीनता राहूं लागली. हें पाहून मुलाला प्रेमपाशांत ओढण्याकरतां अंबाशंकरांनीं मुलाच्या विवाहाची तयारी चालविली. पण वैवाहिक पाश हा पारतंत्र्याचा पिंजरा असून मुक्तीच्या मार्गांतील ही महान् मोहिनी आहे,असा विचार करून ' शुभमंगल ' मंत्रानें विवाहबद्ध होण्यापूर्वी एके रात्रीं मूलशंकरानें सावध होऊन आपल्या प्रिय मातापितरांस व प्रासादतुल्य गृहास शेवटचा रामराम ठोकून अरण्याचा रस्ता धरला.

मूलशंकरानें आपलें यौवन विवाहजन्य प्रेमसौख्यांत न घालवतां प्रवासाच्या परिश्रमांत, पवित्र पुरुषांच्या पदकमलापाशीं, सज्जनांच्या सहवासांत, सद्गुरूंच्या सांनिध्यांत, धर्मशिक्षण, वेदाध्ययन, ईशसेवा व तपश्चर्यादि खड्गवत् खडतर व्रतांमध्यें व्यतीत केलें. ज्ञानलालसेची झोळी हातीं घेऊन, अमीराचा फ़क़ीर बनून मूलशंकर देशाटन व तीर्थाटन करूं लागला. भिन्न भिन्न स्थानीं भ्रमण करीत असतां महान् महात्म्यांच्या मीलनानें, योगिराजांच्या सांनिध्यानें, विद्वानांच्या शिक्षणानें मूलशंकर मुक्तीचा महान मार्ग शोधीत मथुरेस गेला.

मुक्तीचा मार्गदर्शक महात्मा मूळशंकरास मथुरेस भेटला. या महात्म्याचें नांव स्वामी विरजानंद असून ते जन्मान्ध होते; पण आपल्या ज्ञानचक्षुंमुळें त्यांची कीर्ति चोहोंकडे पसरली होती. तीर्थाटन करीत असतां मूळशंकरानें एका महाराष्ट्रीय संन्याशाच्या हस्तें संन्यास ग्रहण केला, त्या वेळीं त्यांचें नांव स्वामी दयानंद असें ठेवण्यांत आलें. स्वामी दयानन्द विरजानंद स्वामीजवळ वेदाध्ययन करूं लागले. बरेच दिवस विरजानन्दजीजवळ धर्मशिक्षण घेतल्यावर गुरूच्या आज्ञेप्रमाणें वैदिकधर्माचा जगभर प्रसार करण्याकरितां स्वामी दयानन्दजी परत देशाटन करूं लागले.

इ. स. १८६४ सालीं वयाच्या ४० व्या वर्षी स्वामी दयानन्द सरस्वतींनीं धर्मकार्य करण्यास आरंभ केला. ज्या क्षेत्रांत मतमतांतराचा घोर संग्राम चालला होता, इर्षा द्वेषादींच्या धूम्रानें लोकांचे प्राण गुदमरून गेले होते त्या धर्मक्षेत्रामध्यें स्वामी दयानन्द एखाद्या निपुण सेनानायकाप्रमाणें धैर्यानें उतरले **सत्यमेव जयते** ही सत्याची विजयशाली ढाल, अधर्मखंडणाचें खड्ग, व वैदिकधर्माचा वैभवशाली झेंडा या त्रयींच्या त्रिशूलावर स्वामी दयानन्द सरस्वतींनीं वैदिकधर्माचें साम्राज्य पुनरपि प्रस्थापित केलें.

स्वामींनीं आग्रा शहरांत प्रथम पदार्पण करून तेथें त्यांनीं मूर्तिपूजा, श्राद्ध, व जातिभेद या अवैदिक रूढींचें खंडण करण्यास सुरवात केली. सडकीं फळें प्रथम फेंकून देऊन ज्याप्रमाणें कुशल माळी चांगल्या आम्रांचें रक्षण करतो, त्याप्रमाणें स्वामींनीं हिन्दुसमाजाचा अधःपात करणाऱ्या कुरीतींचें व कुरूढींचें खंडण करण्यास आणि वैदिकधर्माचीं उच्च तत्वें प्रतिपादण्यास सुरवात केली.

पण साधारण लोकांना स्वामींच्या या उच्च विचारांचें आकलन न झाल्यामुळें त्यांनीं स्वामींना विरोध करण्यास सुरवात केली. मूर्तिपूजेचें खंडण करण्यांत, एकेश्वरीचें उच्च तत्त्व प्रतिपादण्यांत, जातिभेदावर टीका करण्यांत, गुणकर्मप्रधान चातुर्वर्ण्य पुन्हां प्रस्थापित करण्याचा स्वामींचा उद्देश होता. पण हा हेतु साधारण लोकांच्या लक्षांत न आल्या कारणानें त्यांच्याकडून स्वामींना विरोध झाल्यास नवल नाहीं.

यानंतर स्वामींनीं अजमीर येथें वैदिक धर्माचें श्रेष्ठत्व, एकेश्वरी व गोरक्षण या विषयांवर व्याख्यानें दिलीं. रामकृष्णादि दैवी विभूतींची

केवळ गंधपुष्पानें पूजा न करतां त्या पुण्य पुरुषांचे दिव्य गुण अंगीं आणून तदनुसार आचरण करणें हीच खरी मूर्तिपूजा होय. स्वामींच्या व्याख्यानांचा विलक्षण प्रभाव पडत असे. ठिकठिकाणीं त्यांचा यथोचित सत्कार होत असे. वैदिक धर्माच्या प्रसाराकरितां स्वामी प्रवास करीत असतां स्वामी बारेवलीला आले व व्याख्यानें देऊं लागले याच ठिकाणीं स्वामींचीं व्याख्यानें श्रवण करण्यास प्रस्तुत चरित्रनायक लाला मुन्शीरामजी आपल्या वडिलांबरोबर जाऊं लागले, व नास्तिकाचे आस्तिक, व अधार्मिकाचे पूर्ण धार्मिक बनले.

स्वामींच्या विद्वत्ताप्रचुर पांडित्यापुढें कोणताही प्रतिपक्षीय पंडित किंवा पुरुष पुरुषार्थ दाखविण्यास समर्थ नव्हता. त्यांच्या विरोधी मंडळींनीं स्वामींचा कुटिल कारस्थानानें पाडाव करण्यास सुरवात केली. विड्यांतून स्वामींना विष देणाऱ्या मारेकऱ्यांस स्वामीपुढें आणिलें असतां स्वामी त्यास क्षमा करीत म्हणाले. “ मी मनुष्यास बंधनांत घालण्याकरितां जन्मलों नसून बंधनांतून मुक्त करण्याकरितां जन्मलों आहे ” प्रत्यक्ष प्राणहर्त्याच्या रक्षणार्थ प्रयत्न करणाऱ्या महात्म्यास कोण अलौकिक म्हणणार नाहीं ?

स्वामींचा अनुयायी वर्ग दिवसेंदिवस वाढूं लागला; त्याला संघटित स्वरूप देण्याकरितां व वैदिकधर्मप्रसाराचें पद्धतशीर कार्य करण्याकरतां स्वामी दयानंद सरस्वतींनीं सन १८७५ मध्यें आर्यसमाजाची स्थापना केली. ब्रिटिश हद्दींत सरकारी अधिकाऱ्यांसमक्ष राजधर्म व स्वराज्य यांवर व्याख्यानें दिलीं. स्वामी दयानंद हेच स्वराज्याचे आद्यजनक होत. त्यावेळीं राष्ट्रीय सभेचा जन्मही झाला नव्हता. लोकांना प्रिय किंवा राजाला मान्य असें बोलून लोकमान्य किंवा राजमान्य होण्यापेक्षां अप्रिय पण पथ्यकर बोलून समाजाची उन्नति करण्याचा त्यांनीं आजन्म प्रयत्न केला. त्यांच्या निस्पृहपणामुळें त्यांना अनेक शत्रू उत्पन्न झाले व त्यांनीं स्वामींना मारण्याचे कित्येक प्रयत्न केले !

स्वामींच्या उपदेशानें जोधपूरच्या महाराजांचा आश्रय नाहींसा झालेल्या नन्हीजान नामक वेश्येनें स्वयंपाक्यास वश करून घेऊन स्वामींना दुधांतून विष पाजलें. जगाकडे मित्रत्वाच्या दृष्टीनें पाहणारे स्वामी दयानंद सरस्वती

तो विषाचा प्याला प्याले. पुष्कळ उपाय केले. पण स्वामींचा आत्मा ता. ३०–१०–८३ ला नश्वर देह सोडून गेला! स्वामींच्या पश्चात् आर्यसमाजाचा प्रसार करणाऱ्या पं. लेखराम व श्रद्धानन्द यांचेही परधर्मीयांनीं असेच बळी घेतले; पण समाजाचा वृक्ष खच्ची न होतां तो उत्तरोत्तर जोमांत वाढूं लागला.

---

# श्रद्धाञ्जलि १४ वी.

## आर्यसमाजाचे उद्देश व कामगिरी.

**समानीव आकूतिः समाना हृदयानि वः ।**
**समानमस्तु वो मनो यथा वः सुसहासति ॥** ऋ० ॥

फळावरून बीजाची जशी परीक्षा करतां येते, तशी स्वामी दयानन्द सरस्वती यांनीं स्थापन केलेल्या आर्यसमाजाच्या कामगिरीवरून स्वामींच्या कर्तृत्वाची कल्पना येईल. म्हणून आर्यसमाजाच्या प्रमुखेंद्रियांची माहिती संक्षेपतः देण्याचें योजिलें आहे.

'सर्व विद्यांचें व जे पदार्थ विद्येच्या योगानें जाणिले जातात त्या सर्वांचें आदि मूळ परमेश्वर आहे' हा आर्यसमाजाचा प्रथम नियम समाजाची आस्तिक्याबुद्धि व परमेश्वरावरील प्रेम व श्रद्धा दाखवितो. **एकमेवाद्वितीयं ब्रह्म** असें प्रतिपादून स्वामी दयानंदांनीं भिन्न भिन्न देवतांची भक्ति करणाऱ्या व एकमेकांचा द्वेष करणाऱ्या लोकांना एकेश्वरवादी बनवून त्यांच्यामध्यें ऐक्य करण्याचा प्रथम प्रयत्न केला.

परमेश्वर निर्गुण, निराकार, अजन्म, अनंत आहे. स्वामी दयानन्दांनीं **न तस्य प्रतिमास्ति यस्य नाम महद्यशः ।** परमेश्वर निराकार आहे असें वेदमन्त्रद्वारां सिद्ध करून परमेश्वराची मूर्ति करून पूजा करणें म्हणजे खोट्या रुपयास खरा रुपाया म्हणणें होय, रामकृष्णादि देवांवर गंधपुष्पादि वाहण्यापेक्षां त्यांचे दिव्य गुण अंगीं आणणें हीच खरी मूर्तिपूजा आहे असें स्वामींनीं प्रतिपादिलें. परमेश्वर प्रकृतीहून भिन्न आहे, त्याची प्राप्ति मूर्तिपूजेनें होत नसून पंचमहायज्ञविधीं, संध्योपासना, ध्यान धारणादिकांनीं होते.

सर्व मानव समाज जर सत्य सनातन एका परमेश्वराचा भक्त बनेल तर ऐक्य सहज होईल.

**वेदोऽखिलो धर्ममूलम्।** वेद हेंच धर्माचें मूळ आहे असें स्वामीजींनीं कंठरवानें सांगून 'वेद हें सत्य ज्ञानाचें पुस्तक आहे, वेद शिकणें, शिकविणें, ऐकणें, ऐकविणें हा आर्यांचा परम धर्म आहे' असा समाजाचा तृतीय नियम करून वेदविद्येचा पुनरुद्धार केला. वेदाध्ययन करण्यास सर्व जातींना—शूद्रादिशूद्रांनाही अधिकार आहे असें उच्च स्वरानें सांगून स्वामींनीं ब्राह्मण–ब्राह्मणेतर वादास तिलांजलि दिली. सर्वमान्य समाज समान योग्यतेचा आहे, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे विराट स्वरूपाच्या अवयवाप्रमाणें समान योग्यतेचे आहेत. त्यांच्यामध्यें उच्चनीच भाव नाहीं. या चार वर्णांची जन्मापेक्षां गुणकर्मस्वभावानुरूप विभागणी केल्यास सर्व मानवांस उन्नतीचीं द्वारें खुलीं होतील हें जाणून स्वामींनीं वैदिक पद्धतीप्रमाण गुणकर्मांवर चातुवर्ण्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. मग स्पृश्यास्पृश्य ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद कसा राहील ?

**सत्यमेव जयते नानृतम्।** या तत्त्वाप्रमाणें 'सत्याचा स्वीकार करण्यास व असत्याचा त्याग करण्यास प्रत्येकानें तयार असलें पाहिजे' हा आर्यसमाजाचा चौथा नियम आर्यसमाजियांची सत्यानिष्ठा, परगुणग्राहकता, परमतहिष्णुता व उदारता दाखविण्यास पुरेसा आहे.

"जगावर उपकार करणें हा आर्यसमाजाचा मुख्य उद्देश आहे! त्यास अनुसरून शारीरिक, मानसिक व सामाजिक उन्नतीकरतां आर्यसमाज यथाशक्ति प्रयत्न करीत आहे. आर्यसमाजाचें विश्वबंधुत्व या समाजाच्या सहाव्या नियमानें प्रकट होतें. शारीरिक उन्नतीकरतां व वेदादि धार्मिक शिक्षणाकरतां आर्यसमाजानें गुरुकुल विद्यालयें चालविलीं आहेत. आपल्या चरित्रनायकानें या बाबतींत विशेष प्रशंसनीय कामगिरी केली असल्यामुळें गुरुकुल शिक्षण प्रणालीचा अन्यत्र कथानुरोधानें उल्लेख होईल.

मुलांप्रमाणें मुलींनाही शिक्षण देणें योग्य आहे हें जाणून आर्यसमाजानें ठिकठिकाणीं कन्या पाठशाळा स्थापन केल्या असून स्त्रीशिक्षणाचें हें पवित्र कार्य समाज करीत आहे.

पौर्वात्य शिक्षणाप्रमाणें पाश्चात्य शिक्षण देण्यातही आर्यसमाजानें स्पृहणीय कामगिरी केली आहे. पंजाबांत प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणीं आर्यसमाजाचीं दयानंद हायस्कुलें असून तो सध्यां सहा कॉलेजें चालवीत आहे. आर्यसमाजाची दयानन्द युनिव्हर्सिटी काढण्याचा विचार कृतींत येण्याचीं सुचिन्हें दिसत आहेत.

स्वामी दयानन्द सरस्वतींनीं औद्योगिक शिक्षणाकरितां साठ वर्षांपूर्वी कांहीं विद्यार्थी जर्मनीस पाठविण्याचा प्रयत्न केला. स्वामींच्या या उद्देशानुरूप समाजानें औद्योगिक व कलाशिक्षणाच्या पाठशाळा काढल्या असून देशाची औद्योगिक उन्नति व्हावी म्हणून समाज झटत आहे.

आर्यसमाज परोपकाराचें व जनसेवेचें कार्य करीत आहे. शेंकडों अनाथांना आर्यसमाजानें आश्रय दिला असून त्यांच्याकरतां सुमारें साठ अनाथालयें स्थापन केलीं आहेत.

जातिहीनत्वामुळें व अनाथ लोकांस लुब्ध होऊन अस्पृश्य लोक विधर्मीय बनतात, यामुळें हिंदुधर्मास ओहटी लागलेली पाहून स्वामी दयानन्दांनीं सुरू केलेलें अस्पृश्योद्धाराचें व शुद्धीचें कार्य आर्यसमाजानें सतत नेटानें पुढें चालविलें आहे. विधर्मीय बनलेल्या बांधवांना व परधर्मातून हिन्दुधर्मात येणाऱ्यास हिन्दुधर्माचीं द्वारें स्वामी दयानन्दांनीं प्रथमत: खुलीं केलीं. सांप्रतची शुद्धीसंघटनाची चळवळ आर्यसमाजाचें एक मधुर अनुकरण आहे. आर्यसमाजाची शुद्धी हिंदुसमाजास पटली इतकेंच नव्हें तर ती हिंदुसमाजाच्या पचनीं पडली हें म्हणणेंच योग्य !

धर्म व व्यवहार यांची सांगड घालण्याकरतां " सर्व कामें धर्मानुसार अर्थात् सत्य व असत्य याचा विचार करून केलीं पाहिजेत " हा आर्यसमाजाचा पांचवा नियम बनवून तदनुरूप वर्तन ठेवण्याकरतां सोळा संस्कार व पंचमहायज्ञविधी स्वामीजींनीं परत सुरू केले. मातापिता जिवंत असतां त्यांची मनोभावें सेवा करणें हेंच खरें व जिवंत श्राद्ध आहे असें प्रतिपादून स्वामींनीं जनतेला **मातृदेवो भव । पितृदेवो भव** । असा उपदेश केला. मातृदेवतेइतकीच जन्मभूमीची भक्ति महत्वाची आहे हें सांगून **जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी व वंदेमातरम्** असा घोष करून स्वामीजींनीं जनतेस देशसेवक बनविलें. राजकारणाविषयीं व स्वराज्याविषयीं

आपले निर्भीड विचार व **आर्यांकरितां आर्यावर्त** अथवा **हिंदूंकरतां हिंदुस्थान** ही घोषणा स्वामींनीं आपल्या सत्यार्थप्रकाश ग्रंथांत केली. त्यांची राजनीति पूर्वीच्या व सांप्रतच्या पुढाऱ्यांपेक्षां वरच्ढ होती. स्वामी दयानंद हेच **स्वराज्याचे आद्य जनक** होत.

त्यांनीं केलेला नृपोपदेश जगांतील सर्व भूपतींना सार्वकालिन असा आदर्शच होय! बेजबाबदार राजाच्या हातून राजसत्ता कशी काढून घ्यावी हें स्वामींनीं वेदमंत्राच्या आधारें प्रतिपादून स्वराज्य संपादण्याच्या अनत्याचारी मार्गाचा उपदेश केला. त्यावेळीं राष्ट्रीयसभाही स्थापन झालेली नव्हती. महात्मा गांधींचें राजकीय आंदोलन व सत्याग्रह स्वामी दयान्दजींच्या साठ-वर्षांपूर्वीच्या राजनीतीचें प्रतिबिंब होय! स्वामी दयानन्दजींनीं घालून दिलेल्या पायावर दे. भ. लजपतराय व चरित्रनायक स्वामी श्रद्धानन्द यांचें राजकीय व सामाजिक कार्य सांप्रत मनोहर मंदिराप्रमाणें शोभायमान दिसत आहे.

साठ वर्षांपूर्वीच्या स्वामीच्या स्वदेशी व बहिष्काराच्या चळवळीस सांप्रत यश येत आहे हा स्वामींचा पुण्यप्रभावच म्हणावयाचा. वेदावर विस्तृत भाष्य करून स्वामींनीं आधुनिक भाष्यकार म्हणून आपलें नांव अज-रामर करून ठेविलें आहे.

आर्यसमाजाचा व त्याच्या संस्थांचा दिवसेंदिवस जोरानें प्रसार होत असून हिन्दुस्थानांत बहुतेक मोठ्या शहरीं आर्यसमाजाच्या शाखा आहेत. एवढेंच नव्हे तर आफ्रिका, मॉरिशस, अमेरिका इत्यादि ठिकाणींही आर्य-समाजाचा प्रसार झाला असून वैदिक धर्म हाच विश्वधर्म करण्याचा आर्य-समाज यथाशक्ति प्रयत्न करीत आहे. आर्यसमाजाच्या या अल्प परि-चयानें स्वामी दयानन्द सरस्वतींच्या बहुविध व सर्वांगसुंदर कार्याची वाचकांना कल्पना होईल अशी आशा आहे. लाला मुन्शीराम आर्यसमाजाचे सभासद झाल्यावर स्वामींनीं आखून दिलेल्या मार्गानें कसे गेले हे कथानुरोधानें समजेलच.

———

# श्रद्धाञ्जलि १५ वी.

## शैक्षणिक, साहित्यविषयक व सामाजिक सेवा.

**सहनाववतु सहनौ भुनक्तु सहवीर्यं करवावहै ॥**
**तेजस्विनावधीतमस्तु मा विद्विषावहै ॥**

लाला मुन्शीराम लाहोर आर्य समाजाचे सभासद होतांच त्यांच्या जालंदरच्या स्नेही मंडळीस आनंद झाला. शिवदेवीचे बंधु लाला देवराज यांनीं आपले मेहुणे लालामुन्शीराम यांना पत्र पाठवून जालंदरच्या आर्यसमाजाचें प्रधानपद स्वीकारण्याविषयीं विनंति केली. मंडळींच्या अत्याग्रहामुळें लालामुन्शीरामजींनीं प्रधानपदाचा स्वीकार केला. अध्यक्ष पदास अनुरूप अशी योग्यता अंगीं आणण्याकरतां ते सत्यार्थप्रकाश व अन्य धार्मिक पुस्तकांचें अध्ययन करूं लागले.

सुट्टी लागतांच लाला मुन्शीरामजी जालंदरास जातांच तेथील आर्यसमाजी मंडळींनीं त्यांचें व्याख्यान करविलें. व्याख्यानाचा विषय "बालविवाहाचे दोष व ब्रह्मचर्याचा माहिमा" हा होता. व्याख्यानश्रवणास प्रमुख नागरिक व सुशिक्षित वर्ग आला होता. पण इकडे समाजाचे अध्यक्ष लाला मुन्शीरामजींचें व्याख्यान चालूं होतें व तिकडे समाजाचे मंत्री लाला देवराजजी यांचे वडील त्यांच्या एक वर्ष मुलाची सव्वा वर्षाच्या कन्येशीं सोयरीक करण्यांत मग्न झाले होते. हें वृत्त सभेंत जेव्हां समजलें तेव्हां **लोकां सांगे ब्रह्मज्ञान, आपण कोरडे पाषाण** याप्रमाणें मंत्री महोदयाच्या व अध्यक्षांच्या कृतीबद्दल मंडळींत एकच हंशा पिकला. लाला मुन्शीरामजी व लाला देवराजजी खजील अन्तःकरणानें घरीं गेले. व त्यांनीं देवराजजींच्या वडिलांनीं केलेली सोयरीक मोडून टाकली व अशा रीतिनें त्यांच्या प्रयत्नानें तो बालविवाह व्हावयाचा टळला.

जालंदरास एका सनातनी पंडितानें आर्यसमाजावर टीका करण्यास सुरवात केली. आर्यसमाजाचे सभासद गडबडून गेले. पण लाला मुन्शी-

रामजींनीं त्या सनातनी पंडिताबरोबर शास्त्रार्थ केला. या शास्त्रार्थाच्या प्रभावानें आर्यसमाजाच्या सभासदांची संख्या वाढली. हें पाहून सनातनी मंडळींनीं लाला मुन्शीराम व लाला देवराजादि आर्यसभासदांना क्षत्रिय जातींतून बहिष्कृत करण्याचा घाट घातला. ज्ञातिबहिष्काराच्या भयानक भुतानें आर्यसमाजी मंडळी कार्य पराङ्मुख होईल, लाला मुन्शीराम व लाला देवराज कर्तव्यच्युत होतील अशी सनातनी मंडळींना आशा होती.

**निश्चयाचें बळ। तुका म्हणे तेंचि फळ॥**

लाला मुन्शीरामजी व त्यांचे आर्यसभासद निश्चयी होते, ते सत्यपथावरून चालणारे होते, या बहिष्काराच्या भयानें ते डगमगले नाहींत, उलट जातीच्या पंचायतीस सर्वांनीं जातीनिशीं हजर राहण्याचें ठरवून आपला पक्ष जातीपुढें मांडण्याचा त्यांनीं निश्चय केला. पण त्यांच्या निश्चयानें त्यांच्या विरोधी मंडळींचें धाबें दणाणलें व पंचायत भरविणारीं प्रमुख माणसेंच गैरहजर राहिल्यामुळें त्यांच्या वरचा बहिष्काराचा हल्ला मागें परतला.

ननकचंद्रजीस आर्यसमाजाची विशेष माहिती नसल्यामुळें ते आरंभीं लाला मुन्शीरामजीवर आर्यसमाजाचे सभासद झाल्याबद्दल रुष्ट झाले होते. परंतु त्यांना जेव्हां आर्यसमाजाचीं उच्च तत्त्वें समजलीं, तेव्हां लाला मुन्शीरामजी आर्यसमाजाच्या द्वारां भारत देशाची सेवा करून आपल्या कुलाचें नांव राखील या भावनेनें ते मुन्शीरामजीवर अधिक प्रेम करूं लागले. त्यांनीं आपल्या मृत्युपत्रान्वयें सर्वांपेक्षां अधिक संपत्ति मुन्शीरामजीस देऊं केली. पण जगाकडे समानतेच्या दृष्टीनें पहाणाऱ्या लाला मुन्शीरामजीस ती विषम वाटणी पटली नाहीं, व पित्यानें देऊं केलेल्या अधिक संपत्तीचा स्वीकार न करतां त्यांनीं योग्य तोच हिस्सा घेतला. या समदृष्टीनें लाला मुन्शीरामजींवर त्याच्या घरची सर्व मंडळी अधिकच प्रेम करूं लागली.

याच सुमारास त्यांचे वडील आजारी पडले. लाला मुन्शीरामजींनीं आपल्या वडिलांच्या प्रकृतीला आराम पडावा म्हणून पुष्कळ औषधोपचार केले. पण व्यर्थ त्या दुखण्यांतच त्यांच्या वडिलांचा अंत झाला. व त्यांनीं वडिलांच्या इच्छेप्रमाणें त्यांचा अंत्यविधि वैदिक पद्धतीप्रमाणें केला. लाला

मुन्शीरामजींच्या निःस्वार्थीपणामुळें व त्यांच्या विद्वत्तेमुळें त्यांच्या घरांतील सर्व व्यक्तींवर त्यांचें विलक्षण वजन असे. सर्व मंडळींचा त्यांच्यावर अत्यंत विश्वास होता. त्यांच्या मागोमाग त्यांचे दोन बंधुही आर्यसमाजी होऊन समाजसेवा करूं लागले.

दसऱ्याच्या नवरात्रामध्यें जालंदरास मोठा उत्सव होत असे. या उत्सवांत मिशनरी मंडळी ख्रिस्ती धर्माचा प्रचार करीत असे. लाला मुन्शीरामजींनीं व त्यांच्या सहचाऱ्यांनीं त्या उत्सवांत वैदिकधर्माचा प्रचार करविण्याचें ठरविलें. लाला मुन्शीराम व लाला देवराज यांचीं व्याख्यानें इतकीं आकर्षक होऊं लागलीं कीं मिशनरी प्रचारकांच्या व्याख्यानास एक श्रोता मिळेना. अखेरीस मिशनरी प्रचारकांस श्रोत्यांभावीं व्याख्यान देणें बंद करावें लागे व आर्यसमाजी मंडळींच्या व्याख्यानाचा लाभ घ्यावा लागे. कांहीं दिवसांपूर्वीं ख्रिस्ती होण्यास तयार झालेले मुन्शीराम ख्रिस्तीधर्माचें खंडण व वैदिकधर्माचें श्रेष्ठत्व प्रतिपादतांना श्रोत्यांचीं अन्तःकरणें आकर्षलीं जात.

सुट्टी संपतांच लाला मुन्शीरामजी लाहोरास गेले व लॉक्लासांत जाऊं लागले. सन १८८५ च्या सुमारास त्यावेळीं लाहोरच्या आर्यसमाजी मंडळींनीं ' आटा ( कणिक ) फंड ' सुरू केला होता. प्रत्येक सभासदाच्या घरीं एक मृत्तिकाघट ठेवून त्यांत दररोज मूठभर पीठ टाकावयाचें व हें पीठ आठ दिवसांनीं गोळा करून तें विकून त्याचा पैसा धर्मकार्यार्थ लावावयाचा ही त्यांची कल्पना होती. हा आटाफंड महाराष्ट्रांत मुष्टिफंड या नांवानें परिचित आहे. आटाफंडाच्या योगानें आर्यसमाजाच्या दयानंद अँग्लो वैदिक कॉलेजास बरीच मदत झाली. पण याच प्रमाणें जालंदरच्या आर्यसमाजी मंडळींनीं रद्दीफंड काढला होता. सर्वांच्यां घरची रद्दी एकत्र करून विकावयाची व त्या पैशांतन वाचनालयास पुस्तकें घ्यावयाचीं असा यांचा क्रम असे या मुष्टिफंडाचा किंवा रद्दी फंडाचा पुन्हां हिंदुसभांनीं उपक्रम सुरू केल्यास त्यांतून किती तरी चांगलें कार्य करतां येईल.

लाला मुन्शीरामजी परीक्षा पास झाल्यावर वकीली करूं लागले. त्यांच्या वक्तृत्वामुळें त्यांची वकीलीच्या धंद्यांत फारच लवकर प्रगति झाली.

खरें काम हातीं घ्यावयाचें हा त्यांचा पहिल्यापासून बाणा होता. एकदा एका पक्षकारानें एका खोट्या कामाच्या वकीलपत्रावर कार्यबाहुल्यामुळें मुन्शीरामजींची सही घेतली. पण पक्षकाराचा खोटेपणा त्यांच्या मागाहून नजरेस येतांच त्यांनीं तो कोर्टाचे नजरेस आणला. सत्यप्रतिपादनामुळें त्यांच्या पक्षकाराचें नुकसान झालें खरें; पण त्यास त्यांचा इलाज नव्हता. **नहि सत्यात् परो धर्मः** । हें तत्त्व त्यांच्या अंगीं पुरें उतरलें होतें. त्यांच्या सत्यनिष्ठेमुळें वकीलीच्या खरेखोटें समान लेखणाऱ्या त्यांच्या धंद्यांत त्यांचें कित्येक वळां नुकसान झालें, पण सत्यतपाची तपश्चर्या करणाऱ्या मुन्शीरामजींनीं त्यांची मुळींच पर्वा केली नाहीं.

---

# श्रद्धांजलि १६ वी

## कन्यामहाविद्यालयाची स्थापना.

**यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ।**
**यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राऽफला क्रियाः ॥**

संसाररूप रथाचीं स्त्री व पुरुष दोन समान चक्रें आहेत. यांतील पुरुष तेवढा सुशिक्षित व सुदृढ असला आणि स्त्री ज्ञानशून्य व शक्तिहीन असली तर संसाररथ चालणार नाहीं. लाला मुन्शीराम विवाहसमयीं पत्नी आशिक्षित व अल्पवयी पाहून जरी असंतुष्ट झाले होते, तरी पत्नीला स्वतःच शिकविण्याचा त्यांनीं निश्चय केला व आपल्या निश्चयाप्रमाणें शिवदेवीला ते स्वतः शिक्षण देऊं लागले, व दुसरीही एक वृद्ध शिक्षकीण शिकविण्यास ठेविली. त्यांची मुलगी वेदकुमारी एका मिशनऱ्यांच्या पाठशाळेंत या शिक्षकिणीबरोबर शिकण्यास जात असे. एके दिवशीं वेदकुमारी शाळेंत शिकविलेलें पद्य आपल्या वडिलांच्या मांडीवर बसून आपल्या बोबड्या शब्दांनीं लडिवाळपणें म्हणूं लागली.

**इकबार ईसा बोल बोल । तेरा क्या लगेगा मोल ।**
**ईस मेरा राम रसय्या । ईस मेरा कृष्ण कन्हय्या ।**

कन्यकेच्या मुखांतून निघालेल्या बोबड्या पद्यानें लालाजींस आनंद न होतां दुःख झालें. ज्या कन्यका पुढें मातृदेवता बनून संसाराचें अर्धे कार्य सांभाळणार त्या कन्यकांना आपण हिन्दुधर्मनिंदक खिस्ती मंडळींच्या हातांत दिलें व त्यांना खिस्तभक्त बनविण्याचें मिशनऱ्यांनीं आरंभिलेलें पाहून लाला मुन्शीरामजींस अत्यंत वाईट वाटलें. जोंपर्यंत हिन्दु कन्यकांची हिन्दु चालकांनीं चालविलेल्या पाठशाळेंत शिकविण्याची व त्यांना स्त्रीधर्म, गृहिणीधर्म शिकविण्याची आपण सोय करीत नाहीं, तोंपर्यंत बाहेर व्याख्यानबाजी करून कांहीं कार्य होणार नाहीं, हें त्यांच्या लक्षांत येतांच त्यांनीं कन्या पाठशाळा काढण्याचा विचार केला.

ता. ३-११-१८८८ रोजीं ऋषि दयानंदांच्या मृत्युदिनानिमित्त भरलेल्या सभेंत लाला मुन्शीरामजींनीं " स्त्री शिक्षणाची आवश्यकता " या विषयावर ओजस्वी भाषण केलें. सभेमध्यें कन्या पाठशाळा काढण्याचा विचार कायम झाला. हा विचार बाहेर गांवच्या मंडळींस कळविण्याकरतां व सर्व आर्यसमाजी मंडळींचें या कार्याकडे चित्त वेधून संघटित प्रयत्न करण्याकरतां " सद्धर्मप्रचारक " नामक एक वर्तमानपत्र काढण्याकरतां २५।२५ रुपयांचे भाग काढून समाईक भांडवलावर छापखाना काढण्याचेंही ठरलें.

## सद्धर्मप्रचारक वृत्तपत्रद्वारें साहित्यसेवा

लवकरच साप्ताहिकाकरितां इष्ट तें भांडवल जमा झालें; व भागीदारांनीं सभा भरवून लाला मुन्शीराम व लाला देवराज यांना पत्राचे संपादक व प्रकाशक म्हणून नियुक्त केलें. संवत ( १९४७, सन १८९० ) च्या प्रतिपदेस सद्धर्म प्रचारकाचा पहिला अंक निघाला. संपादकाच्या कामाची जबाबदारी अंगावर पडतां लाला मुन्शीरामजींनीं पहिल्यापेक्षां अधिक समय स्वाध्याय करण्यास दिला. निरानिराळे धार्मिक ग्रंथ व संस्कृत ग्रंथ वाचण्यांत आल्यामुळें त्यांची संस्कृत भाषेमध्येंही झपाट्यानें प्रगति झाली.

लाला मुन्शीरामजींनीं सद्धर्म प्रचारकामध्यें उर्दू अक्षरांमध्यें सुबोध हिंदी लिहिण्याचा पहिल्यानें प्रघात पाडला. त्यावेळीं पंजाबांत जिकडे तिकडे उर्दू भाषेचें प्रामुख्य होतें. पण आर्य समाज मंडळीनीं संस्कृत-मिश्रित हिन्दी बोलण्याचें आरंभिलें. लाला मुन्शीरामजींनीं असलें हिंदी उर्दू लिपीमध्यें लिहिण्याचा उपक्रम सुरू केला. निरनिराळ्या विषयांचें अगोदर अध्ययन करून त्यावर विचारपूर्वक मननीय लेख लिहिण्यांत मुन्शीरामजींचा हातखंडा असे. या सद्धर्मप्रचारक साप्ताहिकाचा आर्यसमाजी मंडळींवर व हिंदुधर्मीय बांधवांवर चांगलाच परिणाम झाला. वैदिक धर्माच्या प्रसारार्थ या पत्रानें बहुमूल्य सेवा केली. परंतु त्यावेळीं वर्तमानपत्राचा हल्लींइतका खप नसे. आरंभीं एक दोन वर्षें वर्तमानपत्र त्यांना नुकसानींतच चालवावें लागलें. म्हणून त्यांनीं भागीदारांचे पैसे देऊन टाकून छापखाना व पत्र पुढें स्वतःच्या जबाबदारीवर चालविलें. आरंभीं त्यांनीं लोकांना हिन्दी भाषा उर्दू लिपीमध्यें वाचण्याची गोडी लावून सद्धर्मप्रचारक देवनागरी लिपीमध्यें छापण्यास सुरवात केली. हिन्दी भाषा ही राष्ट्रभाषा करण्यासाठीं हिन्दीमध्यें उच्च साहित्य निर्माण करण्याच्या कामीं या पत्रद्वारां लाला मुन्शी रामजींनीं जनतेस प्रवृत्त केलें. या पत्रानें हिन्दी साहित्याची अनुपम सेवा केली.

सद्धर्मप्रचारकाच्या दुसऱ्या अंकापासूनच लाला मुन्शीरामजींनीं "अधूरा इन्साफ" नामक एक स्त्रीशिक्षणात्मक लेखमाला लिहिण्यास सुरुवात केली. त्यांत त्यांनीं मुलांप्रमाणें मुलींना शिक्षणाची आवश्यकता आहे असें प्रतिपादिलें. या लेखमालेनें जनतेचें लक्ष स्त्रीशिक्षणाकडे आकर्षिलें गेलें. आर्य समाजानें ठरविल्याप्रमाणें कन्यापाठशाळा काढण्याचा विचार कृतींत उतरला. लाला मुन्शीरामजींनीं आपले मेहुणे यांच्या सहकारित्वानें जालंदरास सन १८९० मध्यें कन्या पाठशाळेची स्थापना केली.

त्यांनीं आपल्या अविरत श्रमानें व पुरुषार्थानें व स्वार्थत्यागानें स्त्रीशिक्षणाचें कार्य हातीं घेतल्यामुळें ही संस्था आज अडतीस वर्षें सुव्यवस्थितपणें चालू असून त्या पाठशाळेचें सांप्रत कन्या महाविद्यालयांत रूपांतर झालें आहे. लाला देवराज यांनीं आपलें सर्व आयुष्य या संस्थेच्या उन्नतीकरतां अर्पण केलें. सांप्रत या विद्यालयांत सुमारें २४ शिक्षक व

शिक्षकिणी स्त्रीशिक्षणाचें कार्य निरलसपणें उत्साहानें करीत आहेत. या विद्यालयांत वयाच्या ७ व्या वर्षापासून मुलींना शिक्षण देण्यास सुरुवात होते. एकंदर शिक्षणक्रम बारा वर्षांचा आहे. हिंदी, संस्कृत, इंग्रजी या पुस्तकी शिक्षणाबरोबर धर्मशिक्षण, पाकशास्त्र, संगीत, शिवणकाम, इत्यादि गृहोपयोगी शिक्षण देण्यांत येतें. हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रांतांतून या विद्यालयांत शिक्षण घेण्याकरितां मुली येत असतात. मुली, सुकन्या, सुगृहिणी, व सुमाता निपजाव्यात अशी काळजी घेण्यांत येते. "जिच्या हातीं पाळण्याची दोरी। तीच देशातें उद्धारी॥" या अत्यंत मार्मिक उक्तीप्रमाणें देशोद्धारक व धर्मोद्धारक संतती निर्माण करण्याच्या कामीं या संस्थेंतील कन्यका शिक्षण संपादन केल्यावर यथोचित साहाय्य करतात. लाला मुन्शीरामजींच्या मुलींचें प्रारंभिक शिक्षण याच संस्थेंत झालें. हल्लींच्या कन्यामहाविद्यालयास भिन्न भिन्न ठिकाणच्या पाठशाळा जोडल्या असून त्यांतून विद्यालयानें आंखून दिलेला शिक्षणक्रम चालू आहे.

या कन्यामहाविद्यालयाखेरीज लाला मुन्शीरामजींनीं दिल्लीला इंद्रप्रस्थ कन्या पाठशाळा स्थापन केली. मुलांच्या शिक्षणाच्या अगोदर कन्याशिक्षणाचें कार्य त्यांनीं हातीं घेतलें. यावरून त्यांचें स्त्रीशिक्षणावरील उत्कट प्रेम निदर्शनास येतें.

लाला मुन्शीरामजी स्त्रियांचे कैवारी होते. स्त्रीदाक्षिण्य त्यांच्या अन्तःकरणांत परिपूर्ण होतें. विधवा स्त्रियांना आपलें आयुष्य हालअपेष्टेंत, दुःखांत कंठावें लागतें, व त्यांत त्यांची अधोगतिही होतें हें लक्षांत घेऊन पुनर्विवाह रूढ करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला त्यांच्या प्रयत्नानें सन १८८९ मध्यें एक पुनर्विवाह झाला. विधवासाहाय्यकसमिति व विधवाविवाहोत्तेजक एक मंडळ स्थापन करण्यांत त्यांनीं पुढाकार घेतला.

आर्यसमाजामध्यें काम करीत असतां पं. गुरुदत्त विद्यार्थी नामक एका विद्वान व निःस्पृह आर्यसमाजी पंडिताबरोबर त्यांचा परिचय झाला. त्यांच्या सत्संगामळें लाला मुन्शीरामजीस धार्मिक पुस्तकांच्या अध्ययनास अधिकच साहाय्य झालें. कोणतेंही धार्मिक, सामाजिक कृत्य करतांना लाला मुन्शीरामजी पं. गुरुदत्तांचा सल्ला घेऊन करीत असत.

लाला मुन्शीरामजींच्या श्वशुरगृहाची व पितृगृहाची आप्तवासीय मंडळी समाजसेवा करण्यास सदा तयार असे. आप्तवासीयांच्या साहाय्यानें त्यांना समाजसेवा करण्यास अधिकाधिक सुलभता आली. त्यांचे ज्येष्ठ मेहुणे भक्तरामजी सन १८८९ च्या आगष्ट महिन्यांत महामारीच्या रोगामुळें मृत्युवश झाले. त्यांच्या मृत्यूमुळें त्यांच्या सर्व परिवारास अत्यंत दुःख झालें. आपला उजवा हातच तुटून पडल्याप्रमाणें त्यांना वाटलें.

लाला भक्तरामजींच्या मृत्यूनें लाला मुन्शीरामजींच्या पत्नीस शिवदेवीला अतिशय दुःख झालें. पत्नीची उदासीनता दूर करावी म्हणून लाला मुन्शीरामजी सपरिवार हरिद्वारला गेले. हरिद्वारची तपोभूमि, समोर वहाणारा गंगेचा प्रशांत जलप्रवाह, हिमालयाचीं गगनचुंबित शिखरें इत्यादि निसर्गदेवीची अनुपम शोभा पाहून लाला मुन्शीरामजींना व त्यांच्या पत्नीला आनंद झाला. तेथें कांहीं दिवस राहून ते परत जालंदरास आले.

---

# श्रद्धाञ्जलि १७वी.

**सानन्दं सदनं सुताश्च सुधियः कांता प्रियालापिनी ।**
**सन्मित्रं सुधनं स्वयोषिति रतिश्चाज्ञापराः सेवकाः ।**
**आतिथ्यं शिवपूजनं प्रतिदिनं मिष्टान्नपानं गृहे ।**
**साधोः संगमुपासते हि सततं धन्यो गृहस्थाश्रमः ॥**

सन १८९२ मध्यें हरिद्वारला कुंभमेळा महोत्सव होता म्हणून लाला मुन्शीरामजींनीं त्यावेळीं प्रचार करण्यासाठीं आपल्या साप्ताहिकामध्यें उद्बोधक लेख लिहिले. १८९१ च्या मार्च महिन्यांत आर्य प्रतिनिधी सभेनें सदर उत्सवांत प्रचार करण्यासाठीं ठराव पास केला, व लाला मुन्शीरामजींना सद्धर्मप्रचारकामध्यें प्रचारासाठीं जनतेनें द्रव्यसाहाय्य करावें म्हणून लेख लिहिण्यासाठीं विनंतिपर पत्र लिहिलें.

पंडित लेखराम, व पंजाब आणि संयुक्तप्रांतांच्या आर्यप्रतिनिधीसभेच्या उपदेशक मंडळींच्या साहाय्यानें लाला मुन्शीरामजींच्या नेतृत्वाखालीं

कुंभमेळ्यामध्यें फारच उत्साहानें वैदिकधर्मप्रचाराचें काम झालें. ज्या ज्या जागेवर आर्यसमाजानें प्रचार केला ती जागा पुढें लवकरच प्रतिनिधी सभेनें खरेदी केली. यावेळेपासून पुढें ज्या ज्या वेळेला हरिद्वाराला कुंभ-मेळा भरेल त्या त्या वेळीं आर्यसमाजानें प्रचाराचें कार्य अगदीं नियमपूर्वक व पद्धतशीर रीतीनें केलेलें आहे. व त्याच पद्धतीप्रमाणें पुढेंही प्रचार करण्याचा समाजाचा निर्धार आहे.

हरिद्वारच्या कुंभमहोत्सवांत प्रचार करणारी स्वामीआत्मानंद, स्वामी विश्वेश्वरानंद, नित्यानंद, प्रभृति संन्यासी व विद्वान मंडळी लाला मुन्शी-रामजींनी जालंदरास आपल्या घरीं निमंत्रित केली. **संत जन येती घरा। तोचि दिवाळी दसरा।** या उक्तीप्रमाणें लाला मुन्शीरामजीस दिवाळी दसऱ्याच्या दिवसाप्रमाणें आनंद झाला. या सर्व विद्वान मंडळींचीं जालं-दरास व्याख्यानें झाल्यामुळें नागरिकांना या ज्ञानसत्राचा आनंद लुटावयास मिळाला. लाला मुन्शीरामजींच्या गृहसौख्यास या समयाला सीमा राहिली नव्हती. त्यांचा आनंद या वेळीं कळसास पोहोंचला होता.

या प्रकरणाच्या आरंभींच्या सुभाषिताप्रमाणें लाला मुन्शीरामजींचें सदन म्हणजे आनंदनिधान बनलें होतें. त्यांची इन्द्र व चंद्र हीं मुलें पुढें मोठेपणीं त्यांच्या कीर्तींत भर टाकतील अशीं बाळचिन्हें दिसत होतीं. शिवदेवीसारखी प्रियभाषणी,धर्मपरायण व पतिव्रता पत्नी त्यांना लाभलेली होती. सन्मित्रांचा सहवास, संपत्तीची व आज्ञापर सेवकांची अनुकुलता, अतिथि अभ्यागतांचा आदरसत्कार, प्रत्यही परमेश्वराची प्रार्थना व मिष्टान्न-भोजन, साधुसंन्याशांचा सत्संग, चोहोंकडे मानसन्मान, व कीर्ति इत्यादींचीं मुन्शीरामजीस अनकूलता असल्यामुळें त्यांचा गृहस्थाश्रम धन्य झाला होता. गृहसौख्य धनसुतदारा यांच्यामुळें त्यांना पूर्णपणें मिळत होतें. त्यांच्या सुखास व आनंदास पारावार नव्हता. पण

**चक्रवत् परिवर्तन्ते दुःखानि च सुखानि च।**

सुखदुःख चक्राप्रमाणें फिरत असतें. त्यांच्या सुखाची परमावधी झाल्यामुळें, त्यांचा आनंद अत्युच्च शिखरावर चढल्यामुळें सृष्टिक्रमानुसार त्यांच्या सुखानंदास उतरती कळा लागणें अगदीं साहजिक होतें. परंतु

त्यांच्या गृहसुखाच्या आनंदास उतरती कळा न लागतां त्यांनीं सुखाच्या अत्युच्च शिखरावरून दुःखाच्या अति खोल दारुण गर्तेत पडावें अशी प्रभूचीच इच्छा होती काय कोण जाणे.

**सुख पहातां जवापाडें । दुःख पर्वताएवढें ॥**

जवाप्रमाणें सुखाचा उपभोग घेतल्यावर दुःखाच्या पर्वताखालीं त्यांचा चक्काचूर होण्याचा समय येत होता. पण त्यांना त्याची मुळींच कल्पना नव्हती. जवळ जवळ चौदा वर्षें त्यांनीं संसार केला होता. इतक्या दिवसांत त्यांनीं आपल्या धर्मपत्नीला हिन्दी, संस्कृत शिकविलें होतें. शिवदेवीनेंही संस्कार विधींतील मंत्रभाग पाठ केला होता. पतीच्या प्रत्येक कार्यांत शिवदेवी यथाशक्ति साहाय्य करीत असे. उत्तम गृहिणीस आवश्यक असे गुण शिवदेवीच्या अंगीं वसत होते.

**न गृहं गृहमित्याहुर्गृहिणी गृहमुच्यते ।**

गृहिणीमुळें गृहास गृहत्व प्राप्त होतें. स्त्री हीच गृहदेवता घरांत वावरत असल्यामुळें गृहास शोभा येते लालामुन्शीरामजींचें घर त्यांच्या अनुरूप गृहिणीमुळें शोभायमान दिसत होतें. हें दांपत्य संसाराची व देशाचीच स्वार्थ साधून परमार्थाची सेवा करीत होतें. अनुरूप गृहिणीमुळें त्यांचा गृहस्थाश्रम धन्य धन्य झाला होता असें कोणीही म्हटलें असतें. पण या धन्य गृहस्थाश्रमाचें सुख बहुत दिवस घ्यावें असें त्यांच्या नशिबा नव्हतें. किंवा गृहस्थाश्रमापेक्षां अन्य आश्रमांचा त्यांनीं स्वीकार करावा, व त्यांच्या हातून याहीपेक्षां अधिक देशाची व धर्माची सेवा व्हावी असा ईश्वरी संकेत होता कीं काय न कळे.

श्रावण संवत १९४८ ( सन १८९१ ) मध्यें शिवदेवीस कन्यारत्न झालें. प्रसूतिसमयीं शिवदेवीस भयंकर वेदना सहन कराव्या लागल्या. डॉक्टरांचेंही साहाय्य घ्यावें लागलें. जन्मता क्षणींच मुलगी मृत्युवश झाली. या प्रसूतींनीं शिवदेवी अतिशय निर्बल झाली. धर्मशाळाग्रामाच्या आर्यसमाजाचें लाला मुन्शीरामजीस वार्षिकोत्सवास निमंत्रण आल्यामुळें उत्सवास धर्मपत्नीसह जाण्याचा त्यांनीं विचार केला खरा, पण तिकडे कर्मानुसार निराळीच घटना घडून येत होती.

२८ आगस्ट सन १८९१ रोजीं शिवदेवीला जुलाब उलट्या होण्यास सुरवात झाली. लाला मुन्शीरामजी एका डॉक्टरास जवळ ठेवून रात्रभर जागृत राहून औषधोपचार करीत होते. पहाटे जुलाब बंद झाले. २९ तारखेला शिवदेवीला सबंध दिवसभर बरें वाटलें, म्हणून सर्व मंडळीस आनंद वाटला. ता. ३० रविवार रोजीं मुन्शीरामजी साप्ताहिक अधिवेशनास गेले असतां पुन्हां जुलाब सुरूं झाल्याचा निरोप आल्यामुळें साप्ताहिक प्रार्थना समाप्तीनंतर लालाजी घरीं गेले. संघटित संमतीकरितां डॉक्टरांना निमंत्रित केलें व सर्वांच्या सल्ल्यानुरूप एका डॉक्टराच्या हस्तें औषधोपचार सुरूं झाले.

शिवदेवीचे माता, बंधु, इतर आप्तवासीय जवळ होते. औषधोपचाराची शिकस्त होत होती. मंडळी दूर गेलेली पाहून शिवदेवीनें आपल्या वेदकुमारी नामक ज्येष्ठ कन्येकरवीं कलमदान व कागद मागविला. एका कागदावर कांहींसें लिहून तो कागद घडी करून कलमदानाच्या कप्प्यांत घालून कलमदान जागचें जागीं ठेवण्यास शिवदेवीनें आपल्या मुलीस सांगितलें.

लाला मुन्शीरामजी रात्रीं एक वाजतां जेव्हां औषध पाजूं लागले तेव्हां शिवदेवी पतीस प्रणाम करीत आपले मातेस अनुलक्षून म्हणाली, " माझ्या हातून पुष्कळ अपराध झाले, ज्यांची (पतिदेवाची ) मी सेवा करावयाची, तेच माझी सेवा करीत आहेत. "

" कांहीं हरकत नाहीं. बरी झाल्यावर तूं आपल्या पतीची सेवा कर. " माता म्हणाली.

' भगिनी, भजन ऐकावयाचें कां ? " शिवदेवीचे बंधु लाला देवराज म्हणाले.

" होय ! " शिवदेवी उद्गारली.

## प्रभूजी भेट धरूं क्या मैं तेरी ।

हें भक्तिप्रधान पद लाला देवराज म्हणत होते. शिवदेवी त्यांच्याबरोबर अस्पष्टपणें तें पद म्हणत होती. ओठ हलत होते, पण अशक्ततेमुळें आवाज खोल येत होता. भजन समाप्त झाल्यावर शिवदेवीच्या मातेनें विचारलें. " मुलें कोणाच्या हवाली करून चाललीस. "

“ दुसऱ्या कोणाच्या ? ” लाला मुन्शीरामजीकडे पहात शिवदेवी म्हणाली.

थोड्या समयानें शिवदेवी लाला मुन्शीरामजीस म्हणाली, “ बाबूजी, बाबूजी,” लाला मुन्शीरामजी पत्नीकडे पाहूं लागले तोंच “ओऽम्” शब्दाचा उच्चार करीत पतिभक्तपरायण शिवदेवीनें आपल्या मातेच्या मांडीवर मान टाकून प्राण सोडला.

**आले देवाजीच्या मना । तेथें कोणाचे चालेना ॥**

पुष्कळ प्रयत्न केले पण त्यांत यश न येतां भगवंताच्या इच्छेप्रमाणें घडून आलें. देवाच्या इच्छेपुढें मान तुकविणें भाग आहे. शिवदेवीचे प्राण पंचत्वांत मिळाले. मुन्शीरामजींच्या गृहास शोभायमान होणारी गृहिणी गृहास सोडून गेली. तिची प्राणज्योत निमाली, व दुःखाची दारुण रात्र राज्य करूं लागली. दुःखामुळें परिवाराच्या माणसांच्या मुखावर प्रेतकळा दिसूं लागली. सर्व आप्तवासीय संबंधीं शोकसागरांत बुडूं लागले. रुदनाच्या महारौद्रध्वनीनें त्या घरांत हलकल्लोळ माजला. स्त्रियांनीं आक्रोश करण्यास व छाती बडवण्यास सुरवात केली. मृत्यूच्या महाभयानक अक्राळ विक्राळ स्वरूपामुळें चोहोकडे उदासीनता व भीषणता पसरली. लाला मुन्शीरामजींची पतिव्रता पत्नी परलोकवासी झाली असें कळतांच जालंदरांतलि प्रजाजन, स्त्रीपुरुष, लहानथोर लालाजींच्या गृहाजवळ जमा झाले. गृहिणीहीन झालेल्या त्या घरास अरण्याचें स्वरूप प्राप्त झालें होतें. प्रत्येकांच्या मुखावर निराशेची छाया पसरली होती.

---

# श्रद्धाञ्जलि १८ वी.

## कालाय तस्मै नमः ।

**कालः पचति भूतानि कालः संहरते प्रजाः।**
**काल सुप्तेषु जागर्ति कालोहि दुरतिक्रमः॥**

कालाची गति विचित्र आहे. मृत्यूपुढें प्रत्येक माणसास मान वाक-

वावी लागते. हा लहान, हा थोर, हा महात्मा, हा दुरात्मा, हा गुणी, हा दुर्गुणी, हा वृद्ध, हा तरुण असा भेदाभेद मृत्यु पाळीत नाहीं.

**मृत्यु न म्हणे भूपति। मृत्यु न ह्मणे चक्रवर्ति ॥**
**मृत्यु न म्हणे संग्रामपति। मर्त्य भूमीवरी ॥**

मृत्यूच्या या चक्रांतून प्रत्येकास जावें लागतेंच. आप्तवासीय सुत दारा यांची धर्मशाळेंत बसलेल्या प्रवाशी मंडळीप्रमाणें या संसारांत गांठ पडते. कांहीं काल सहवास झाल्यावर आपापल्या ग्रामाकडे गमन करणाऱ्या प्रवाशांप्रमाणें कोणी अगोदर मृत्युपंथांस जातो कोणी मागाहून पण मरण हें कांहीं कोणाला चुकवितां येत नाहीं.

लाला मुन्शीरामजींचीं सद्गुणखाण धर्मपत्नी मृत्युवश झाली असतां त्यांच्या कुटुंबांतील मंडळींनीं आक्रोश केला, शिवदेवीची जन्मदात्री माता हंबरडा फोडून रडूं लागली, छाती बडवून घेऊं लागली, कपाळ आपटून रक्तसिंचन करूं लागली, म्हणून शिवदेवीवरील मृत्युपाश यमराजानें ढिला केला काय ? शिवदेवीच्या अचेतन प्रेतावर पडून रुदन करणाऱ्या लाला मुन्शीरामजींच्या लहान मुलांची देखील निष्ठुर काळास दया आली नाहीं.

कालाची गति विचित्र आहे, काल अजिंक्य आहे, काल असा आहे म्हणून **कालाय तस्मै नमः** असें म्हणतात. देवाजीच्या मनापुढें कोणाचें कांहीं चालत नाहीं असें मनाचें कसें बसें समाधान करून उत्तरक्रियेची तयारी सुरू झाली. वेदमंत्रांचा पाठ म्हणत शिवदेवीचें प्रेत स्मशानभूमीकडे नेण्यांत आलें. चंदनपलाशादींच्या लाकडांनीं रचलेल्या चितेवर शिवदेवीचें शिरीषकुसुमवत् मृदुशरीर ठेवण्यांत आलें, व वैदिक संस्काराप्रमाणें मंत्रोक्त रीतीनें चितेस अग्नि लावण्यांत आला.

**अस्याः कुसुमशय्यापि कोमलांग्या रुजाकरी ।**
**साधिशेते कथं देवी ज्वलन्तामधुना चिताम् ॥**

पुष्पशय्याही जिला जितेपणीं रोगकारक व त्रासदायक वाटत होती त्या शिवदेवीला काष्ठाच्या प्रज्वलित चितेवर निष्ठुर कालानें शयन करावयास लावलें जळणाऱ्या चितेकडे पाहणाऱ्यांचीं मनें शोकाग्निमुळें दग्ध झालीं. शोकग्रस्त अंतःकरणानें मंडळी स्मशानभूमीवरून परत फिरलीं.

मातेवीण पोरक्या झालेल्या चार मुलांमुलींनीं लाला मुन्शीरामजीं-भोंवतीं गराडा घातला. मातृदुःखामुळें म्लान झालेल्या मुलांच्या मुखाकडे पहातांच मुन्शीरामजींचें अंतःकरण दुःखानें भरून आलें. मृत्युपूर्वी घडी करून लिहून ठेविलेलें शिवदेवीचें पत्र त्यांच्या मुलीनें त्यांना दिलें. त्या पत्रांत काय लिहिलें होतें, त्या पत्रांत शिवदेवीनीं आपल्या पतिराजास काय मागणी केली होती ? कोणती इच्छा त्या पतिभक्त पत्नीनें त्या पत्रांत प्रदर्शित केली होती ?

प्रियपत्नीनें लिहिलेलें तें शेवटचें पत्र लाला मुन्शीरामजींनीं दुःखितान्तःकरणानें वाचण्यास सुरवात केली.

" नाथ, मी जाते. माझ्या अपराधाची क्षमा असावी. माझ्यापेक्षां अधिक गुणवान् रूपवान् पत्नी आपणांस मिळेल. **पण माझ्या मुलांना कधीं विसरूं नका.** माझ्या अंतिम प्रणामाचा विचार करावा.

या पत्राच्या वाचनानें लाला मुन्शीरामजींच्या हृदयावर परिणाम झाला. पत्नीचे ते अखेरचे शब्द मुन्शीरामजींनीं आपल्या हृत्पटलावर कोरून ठेविले. आपल्या स्वतःकरितां कोणतीच मागणी न करतां त्या साध्वीनें आपल्या मुलांना विसरूं नका एवढेंच मागणें पतीजवळ मागितलें होतें त्या विनंतीवरून शिवदेवीचें ममत्वपूर्ण मातृहृदय कळून येतें. मातृसुखास वंचित झालेल्या मुलांना मातेची आठवणही होऊं न देतां पित्याच्या प्रेमपूर्ण अंतःकरणामध्यें मातृहृदयाची कोमलता व सदयता उद्दीपित करून मुलांचें संगोपन करा अशी शिवदेवीनें लाला मुन्शीरामजींस अंतिम प्रार्थना केली होती. त्या प्रार्थनेप्रमाणें लालामुन्शीरामजींनीं रात्रीं परमेश्वराची मनोभावें प्रार्थना केली व पुन्हां विवाह न करतां आपल्या मुलांचें मातृहृदयानें संगोपन करण्याचें ठरवून मुलांच्या मातेची उणीव स्वतःच भरून काढण्याचा त्यांनीं संकल्प केला.

प्रथम पत्नी निवर्तल्यावर आपल्या संततीचें संगोपन करीत पुन्हां विवाह न करतां ' हरि हरि ' म्हणत काळ कंठण्याचा किती तरी संकल्प करतात पण तो संकल्प किती बरें पुरा करतात ? प्रथम पत्नी मृत्युवश होतांच प्रत्येक पुरुषास स्मशानवैराग्य प्राप्त होतें. पण द्वादशदिनांचें आशौच्य दूर होतें न होतें तोंच स्मशानवैराग्य लयास जाऊन तेराव्या

दिवशीं दुसऱ्या विवाहाकरतां बोहल्यावर चढण्यास तो विधुर तयार होतो. प्रथम पत्नीच्या चितेस अग्नि लावणारा पति आशौच्य संपताच दुसऱ्या विवाहाचा लाजाहोमाग्नि प्रदीप्त करण्यास तयार होतो.

स्मशानवैराग्य स्मशानभूमींतून परत फिरतांच नाहींसें होतें, व संसारसुखोपभोगांत रत असणाऱ्या माणसाकडे लक्ष जातांच जगाच्या रहाटीप्रमाणें विधुराचें मन पुन्हां लग्न करण्यास तयार होतें. कोणाचें हें स्मशान वैराग्य लवकर लयास जातें किंवा कोणाचें बरेच दिवस टिकतें एवढेंच. कोणी पुत्रप्राप्तीविना मुक्ति नाहीं या कारणानें, कोणी वंशवृद्धीकरतां, कोणी आपल्या संपत्तीच्या उपभोगार्थ संतती असावी म्हणून, कोणी पोरक्या मुलांच्या संगोपनार्थ, तर कोणी कांतेविण गृह कांताराप्रमाणें भासतें, गृहणीहीन गृह अरण्याप्रमाणें भयंकर दिसतें, म्हणून नाना तऱ्हेचीं कारणें, नाना निमित्त सांगून पुन्हां लग्नास तयार होतो. पण एकही हरीचा लाल संसारलालसेनें लग्नास तयार होतो म्हणून सांगेल तर शपथ.

पण या सर्व कारणांच्या मुळाशीं त्यांची संसारासक्ति किंवा सुखोपभोगेच्छा असते हें मात्र निःसंशय. बाहेर दाखवावयाचें वेगळें व आंत हेतु असावयाचा निराळा ! निरनिराळी कारणपरंपरा प्रतिपादणाऱ्या व पुनरपि नवरदेव होऊं इच्छिणाऱ्यांस हें समजत नाहीं कीं कोणतीही कुलवधु सवती संततिसंगोपनार्थ बिजवरास माळ घालण्यास तयार होत नाहीं. कोणतीही नव वधु आपल्या सवतीच्या संततीनें “आई, आई,” म्हणून मारिलेल्या हाकेस सवत्सांतःकरणानें ओ देऊन जवळ घेणार नाहीं.

**पन्नाशीची झुळुक लागली । बाईल दुसरी करूं नको । किंवा बायको दुसरी व फजिती तिसरी** या सूचनेकडे मुद्दाम डोळेझांक करून कन्या शोभणाऱ्या कुमारिकेशीं लग्न करण्यास विधुर जे तयार होतात ते केवळ कामलोलुपतेनेंच होय. दुसऱ्या विवाहाकरितां तो ज्या सबबी सांगतो त्यांच्याबुडाशीं विधुराची विषयांधता बहुतेक असतेच. असते चाळिसी लागली व पन्नाशी पालटली, साठी बुध्दि नाठी झाली तरी किंवा अवघें पाउणशें वयमान आहे असें म्हणत कन्या किंवा नाती शोभणाऱ्या कुमारिकेबरोबर विवाह लावण्यास व गुढग्याला बांशिंग बांधण्यास विधुर जे तयार होतात ते केवळ कामुकतेमुळें.

**न जातु कामःकामानामुपभोगेन शाम्यति ।**
**हविषा कृष्णवर्त्मेव भुय एवाभिवर्धते ।**

कोणत्याही किंवा कितीही उपभोगाच्या योगानें या कामाची, शांति होत नाहीं. अग्नीस अर्पिलेल्या घृताप्रमाणें हा कामाग्नि उपभोगानें अधिकच भडकतो. अतएव ही कामेच्छा आमूलाग्र नष्ट करण्याकरतां मनाला कोणत्यातरी धार्मिक, सामाजिक कार्यांत किंवा तपश्चर्येंत लावलें पाहिजे. मनोनिग्रह करून इंद्रियनिग्रह केल्यास हा कामाग्नि दग्ध करतां येतो.

जन्मापासून मरेपर्यंत संसार लालसा समाजांत बोकाळल्यामुळें समाजसेवक दुर्मिळ झाले आहेत. लाला मुन्शीरामजींची प्रथम पत्नी जेव्हां मृत्युवश झाली तेव्हां त्यांचें वय केवळ पस्तीस वर्षांचें होतें. संपत्तीची अनुकूलता, विद्वत्ता व कीर्ति, व वयही पस्तिशीच्या सुमाराचें यामुळें द्वितीय विवाहाचा विचार जर ते मनांत आणते तर त्यांच्या पत्नीनें पत्रांत लिहिल्याप्रमाणें शेकडो कुमारिकांमध्यें त्यांना वरण्याकरतां अहमहमिका सुरू झाली असती.

लाला मुन्शीरामजींना त्यांच्या आप्तवासीयांनीं, इष्टमित्रांनीं द्वितीय विवाह करावा म्हणून पुष्कळ आग्रह केला. मातृसुखाभावीं सुकलेल्या मुलांना नवीन माता करून सुखी करावें असें कित्येकांनीं त्यांना सुचविलें. पण पत्नीप्रमाणें माता पैशानें किंवा मोलानें मिळत नसते. ‘ मुलांस विसरूं नका ’ हें शिवदेवीच्या पत्रांतील वाक्य मुन्शीरामजींना एकीकडे बजावीत होतें; तर दुसरीकडे आदित्यब्रह्मचारी स्वामी दयानन्द सरस्वतींची दिव्यमूर्ति त्यांच्या अन्तश्चक्षूंपुढें उभी राहून त्यांना हें विश्वाचि संसार समजून आयुष्याचा उपयोग देशसेवेंत व धर्मसेवेंत कर असें आज्ञापीत होती. जगाचें मांगल्य करण्यासाठीं स्वतः चतुर्भुज न होतां सावधान होऊन ज्या महात्म्यानें आपलें आयुष्य ब्रह्मचर्याच्या खडतर व्रतामध्यें, तपश्चर्येंत व धर्मसेवेंत खर्च केलें त्या स्वामी दयानन्द सरस्वतींचा आदर्श लाला मुन्शीरामजीपुढें होता.

**बंधनानि खलु सन्ति बहूनि । प्रेमरज्जुकृतबंधनमन्यत् ॥**

सर्व बंधनांत प्रभावदायक असें प्रेमबंधन लाला मुन्शीरामजींनीं ताड-

कन् तोडून टाकलें. इष्टमित्रांनीं द्वितीय विवाहाच्या दाखविलेल्या प्रलोभनास बळी न पडतां आपल्या मुलास मातृस्थानीं होण्याचा व आपल्या गुरुदेवतेच्या आज्ञेप्रमाणें शेष आयुष्य धर्मसेवेंत व जगदोद्धारांत व्यतीत करण्याचा त्यांनीं दृढ निश्चय केला.

---

# श्रद्धाञ्जलि १९ वी.

## सामाजिक घटना.

**श्रोत्रं श्रुतेनैव न कुंडलेन । दानेन पाणिर्नतु कंकणेन ॥**
**विभाति कायः करुणापराणां परोपकारैर्नतु चंदनेन ॥**

लाला मुन्शीरामजींची धर्मपत्नी आपल्या अपत्यांना सोडून परलोकास गेली खरी; पण आपल्या संततीचें संगोपन चांगल्या रीतीनें व्हावें ही एकच इच्छा तिच्या मनांत मृत्युसमयीं घोळत होती; आपल्या पत्नीच्या अंतिम इच्छेप्रमाणें रिकामें झालेलें मातृस्थान स्वतःच भरून काढण्याचें मुन्शीरामजींनीं ठरवून आप्तवासीयांच्या विवाहाच्या प्रलोभनास बळी न पडतां द्वितीय विवाह करावयाचा नाहीं अशी त्यांनीं प्रतिज्ञा केली, व ती आमरण पाळिली.

त्यांच्या हृदयांतील कौटुंबिक प्रेमाचें सामाजिक प्रेमांत वृद्धीकरण झालें. आर्यसमाज हेंच आपलें गृह समजून आपला सर्व समय परोपकारामध्यें व समाजोन्नतीमध्यें खर्च करण्याचें त्यांनीं ठरविलें.

आर्यसमाजामध्यें सन १८९२ च्या सुमारास भक्ष्याभक्ष्य भेदामुळें व शिक्षणभेदामुळें दोन पक्ष झाले होते. एक पक्ष मांसाहारास व पाश्चात्य शिक्षणास अनुकूल, तर दुसरा पक्ष मांसाहारास प्रतिकूल व पौर्वात्य शिक्षणास अनुकूल असा होता. हे दोन्ही पक्ष समाजाचे दश नियम पाळीत व वेद हेंच सत्यविद्येचें पुस्तक आहे असें समजत. त्यांच्यांत भक्ष्याभक्ष्य व शिक्षण एवढ्याच बाबतींत काय तो भेद होता.

एका म्यानांतील दोन तलवारीप्रमाणें आर्यसमाजाच्या या दोन पक्षांची अवस्था झाली. ते एकमेकांस नांवें ठेवूं लागले, व एकमेकावर वाग्बाण सोडूं लागले. आर्यसमाजाच्या स्थापनेस नुकतींच १६।१७ वर्षें झालीं होतीं, व समाजसंस्थापक स्वामी दयानंदाच्या मृत्यूस ८।९ वर्षें झालेलीं होतीं. नौकेच्या खलाशांमध्यें मुख्य नावाड्याच्या मृत्युनंतर नौकानयन शास्त्रज्ञानाच्या अभावीं जशी यादवी माजते व आत्मकलहापुढें त्या नावेचीं दिशाभूल होऊन आत्मघाताच्या खडकावर त्या नावेला आपटून समुद्रस्तृप्यतु होण्याचा जसा त्या नावेला प्रसंग येतो, तसा प्रसंग या वेळीं आर्यसमाजावर आलेला होता. आर्यसमाजनौकेचें सुकाणू धरणारे दयानंद धरणीवर पडतांच समाजाच्या सभासदांचीं दोन दलें झालीं. एक दल मांसाहाराच्या वल्ह्यानें पाश्चात्य शिक्षणाच्या बंदराकडे नाव न्यावी असें म्हणे तर शाकाहराच्या वल्हानें प्राचीन वैदिक संस्कृतिसंपन्न बंदराकडे नाव न्यावी असें दुसरा पक्ष म्हणे.

यापैकीं दुसरा पक्ष बहुसंख्याक होता. या पक्षाचे धुरीण प्रस्तुत चरित्रनायक लाला मुन्शीरामजी होते. ते शांत विचाराचे व परमतसहिष्णु व परपक्षाचे हल्ले सहन करण्यांत समाधान मानणारे होते. त्यांनीं आपल्या शांत व चतुर स्वभावानें या दोन्ही पक्षांतील वाद मोठ्या कुशलतेनें मिटाविला व आर्य समाजामधील आत्मकलह थांबाविला.

स्वामी दयानंद सरस्वतींनीं मांसाहारावर पूर्वीं व्याख्यानांत व लेखनांतून टीका केली होती व वेदामध्येंही अहिंसा धर्माचें प्रतिपादन केलें आहे असें आपल्या अधिकारी वाणीनें सांगितलें होतें. पण समाजाच्या दश नियमांत मांसाहार ग्राह्य कीं त्याज्य याचा उल्लेख केलेला नसल्यामुळें हा भक्ष्याभक्ष्य भेद बोकाळला होता.

अखेरीस दोन्ही पक्षाच्या मंडळींनीं सुविचारानें ठरविलें कीं मांसाहार त्याज्य आहे. अशा रीतीनें दोन्ही पक्ष शुद्ध शाकाहारी बनल्यामुळें आर्यसमाजामध्यें ऐक्य प्रस्थापित झालें. हें ऐक्य प्रस्थापित करण्यासाठीं लालामुन्शीरामजींनीं जिवापाड परिश्रम केले. त्यांच्या शांत व सहिष्णु स्वभावामुळें त्यांना लोक महात्मा या नांवानें संबोधूं लागले. आमचे चरित्रनायकच हिन्दुस्थानांतील पहिले महात्मा होत. व हल्लींचे महात्मा गांधी

यांना महात्मा म्हणून संबोधण्यास महात्मा मुन्शीरामजींनीं प्रथम सुरुवात केली, व यामुळें महात्मा गांधींना महात्मा म्हणून संबोधण्याचा प्रघात पडला.

एक मोठा मतभेद नाहींसा झाल्यामुळें या दोन पक्षांतील मत-भेदाची तीव्रता दिवसेंदिवस कमी होऊं लागली. शिक्षणाचा मतभेद रहाणें स्पृहणीय होतें. एक पाश्चात्य शिक्षणाचा पूर्ण अभिमानी तर दुसरा पौर्वात्य शिक्षणाचा व संस्कृतीचा अभिमान धरणारा ! हे दोन्ही पक्ष आरंभीं आरंभीं जरी अतिरेकास पोंचले होते, तरी पण पुढें पुढें त्यांना जस जसा अनुभव येऊं लागला तस तसे एक दुसऱ्यास मानूं लागला व दुसऱ्याचें अनुकरण करूं लागला. कारण केवळ पाश्चात्य विद्या संपादून धर्मज्ञान शून्य राहणें जितकें अनिष्ट तितकेंच वेदविद्याविशारद बनून पाश्चात्य शिक्षणाचा गंधही नसणें अनिष्ट ! देशाच्या उन्नतीकरतां पाश्चात्य शिक्षणाइतकीच वैदिक धर्मज्ञानाची आवश्यकता आहे असें दोन्ही पक्षास समजून आलें. यामुळें मतभेदाची तीव्रता कमी होऊन परस्पर-विचारविनिमयाचे व परस्परसाहाय्याचें कार्य हे दोन्ही पक्ष करूं लागले.

आर्यसमाज पाश्चात्य शिक्षणाचें कार्य हल्लीं अगदीं पद्धतशीर रीतीनें व सुसंघटितपणें करीत आहे. आर्यसमाजाचीं कित्येक हायस्कुलें व पाठ-शाळा चालू असून तो सध्यां पांच कॉलेजें चालवीत आहे. सन १८-८९ मध्यें दयानंद ॲंग्लो वेदिक कॉलेजाची स्थापना झाली. त्या वेळीं लाला हंसराज, व लाला लजपतराय व पंडित गुरुदत्त विद्यार्थी यांच्या बरो-बर प्रस्तुत चरित्र नायक मुन्शीरामजींनीं कॉलेजच्या स्थापनेच्या कार्यांत भाग घेतला. लाला हंसराज यांनीं कॉलेजचे अवैतनिक आजन्म सेवक होण्याचें कबूल केलें. दुसऱ्या स्वार्थत्यागी अध्यापकांच्या जोरावर या कॉलेजची उत्तरोत्तर उन्नति होत गेली. सध्यां हायस्कूल विभागामध्यें व कॉलेज विभागामध्यें अडीच हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

लाला मुन्शीरामजी या कॉलेजच्या प्रबंधक समितीचे सभासद होते, पण जेव्हां शिक्षण प्रणालीबद्दल मतभेद सुरू झाले, तेव्हां गुरुकुल शिक्षण-प्रणालीचा पुनरुद्धार करण्याकरितां कॉलेजच्या कार्यकारी मंडळांतून त्यांनीं आपलें नांव काढून घेतलें.

कॉलेजच्या कार्यकारी मंडळांतून मोकळे होतांच लाला मुन्शीराम-जींनीं गुरुकुलस्थापनेच्या कामीं पुढाकार घेतला. आपल्या विधुरावस्थें-तील बहुतेक समय त्यांनीं याच कार्याकरतां खर्च केला असल्यामुळें व त्यांनीं आपल्या अतुल स्वार्थत्यागानें, विलक्षण चिकाटीनें त्या कामीं प्रशंस-नीय कामगिरी केली असल्यामुळें त्यांच्या शिक्षणात्मक कार्याचें अन्यत्र विशदीकरण करण्याचें योजिलें आहे.

अन्य संस्थेंत कार्य करीत असूनही लाला मुन्शीरामजींनीं कॉले-जच्या चालकांशीं आपला प्रेमसंबंध तोडला नाहीं. दे० भ० लाला लज-पतराय व महात्मा हंसराज यांच्योशीं महात्मा मुन्शीरामजींचा पूर्वीप्रमाणेंच स्नेहसंबंध कायम राहिला. मानस सरोवरापासून निघणाऱ्या गंगायमुने-प्रमाणें आर्यसमाजाच्या शिक्षण सरोवरापासून दोन कार्यप्रवाह जरी वाहूं लागले होते तरी दोघांचें ध्येय एकच होतें. या दोन शिक्षणप्रणालींचे अभिमानी हे दोन थोर पुरुष आपल्या कार्यप्रवाहाच्या ओघांत जरी निराळ्या दिशेनें जात होते, तरी समाजसेवेच्या सागरास या गंगायमुनेच्या शिक्षण-संस्था येऊन मिळाल्या. इतकेंच नव्हे तर आर्यसमाजाच्या कार्याचे वेळीं हे दोन्ही पक्ष खांद्यास खांदा लावून सहकारित्वानें समाजसेवा करतात; ज्येष्ठ कनिष्ठ बंधूप्रमाणें बंधुप्रेमानें एकमेकांच्या सुखदुःखाचे भागीदार बनतात.

**एकमेकां सहाय्य करूं । अवघे धरूं सुपंथ ॥**

या उक्तीप्रमाणें हे दोन्ही पक्ष प्रसंगविशेषीं एकमेकास साहाय्य करतात.

अशा रीतीनें हे दोन्ही पक्ष आर्यसमाजाच्या द्वारें वैदिक धर्माचीच सेवा करूं लागले. अस्पृश्योद्धार व शुद्धीच्या चळवळीचें कार्यही जोरानें सुरूं झालें. पं० लेखरामजींनीं शुद्धीच्या कार्यांत प्रमुखत्वानें भाग घेतला. त्यांना उर्दू व पर्शियन या भाषा उत्तम रीतीनें लिहितां व बोलतां येत असत. त्यांनीं कुराणाचें व मुसलमानी धर्माचें विशेष अध्ययन केलें होतें. ते जेव्हां उपदेश करावयास लागत तेव्हां हे कोणी विद्वान मौलवीच भाषण करीत आहेत असें वाटे. त्यांच्या भाषणांत कुरा-णाचे आया तव दाखले मुख्यतः येत असत व त्यांचा मुसलमान समाजावर विशेष परिणाम झाला. शेंकडों मुसलमान मुसलमानी धर्माचा

त्याग करून हिन्दुधर्म स्वीकारूं लागले. हें पाहून मुसलमानी समाज हवालदील झाला. धर्मवीर लेखराम कुराणाचें खंडण इतक्या बिनतोड रीतीनें व सप्रमाणतेनें करीत कीं त्यांच्यापुढें मोठमोठ्या मौलवींना मौन स्वीकारून अधोमुख करावें लागे. पांडित्य दाखवून पांडित्यानें धर्मवीर लेखरामाचा पाडाव करणें दुर्घट आहे हें जाणून त्यांनीं कपटनीतीनें लेखरामांचा पाडाव करण्याचें ठरविलें.

एक मुसलमान युवक हिन्दुधर्माचा स्वीकार करून लेखरामजींचा शिष्य म्हणून राहिला. लेखरामजींचा त्या शिष्यावर अत्यंत विश्वास बसला. कुराणाच्या खंडणात्मक पुस्तकाचीं कच्चीं टिपणें लेखरामजी त्या शिष्यास दाखवीत असत. शिष्यही मोठ्या भक्तिभावानें ऐकण्याचें सोंग करी. लेखरामजींच्या हातून कुराणखंडणात्मक पुस्तक लिहिलें गेल्यास मुसलमानी समाजांत खळबळ उडेल व त्या पुस्तकाचें पुन्हां सप्रमाण रीतीनें खंडन करणें कठीण जाईल हें जाणून हिंदुवेषांतील त्या मुसलमानी शिष्यानें लेखरामजींची हत्या करण्याचें ठरविलें. गायीचें कातडें पांघरणाऱ्या वाघाप्रमाणें हिंदुधर्माचें ढोंग घेणाऱ्या त्या मुसलमान दुष्टानें संधि साधून, कोणी नाहीं असें पाहून, लेखरामजी गैरसावध आहेत असें पाहून लेखरामजींच्या उदरांत सुरा खुपसला. लेखरामजींच्या पोटास त्या सुरीनें फार मोठी जखम झाली. तिच्यांतून त्यांचें आंतडें बाहेर आलें. पुढें डॉक्टरी उपाय करून त्यांचें पोट शिवण्याचा प्रयत्न केला पण तो यशस्वी न होतां धर्मवीर लेखरामांचा त्यांतच अंत झाला. मुसलमानी समाजानें आर्य समाजाचा ६–३–१८९७ रोजीं हा दुसरा मोठा बळी घेतला.

महात्मा मुन्शीरामजी लेखरामजींच्या मृत्युसमयीं तेथें हजर झाले. त्या मुसलमानी भ्याड खुनी इसमाचा जाहीर रीतीनें निषेध करण्यांत त्यांनीं पुढाकार घेतला. ‘ आर्यसमाजाचा वृक्ष या खुनामुळें खच्ची न होतां अधिकच फोफावेल’ अशा आशयाचें भाषण करणाऱ्या महात्मा मुन्शीरामजींवर असला मृत्यूचा प्रसंग येईल ही कल्पना होती काय ? महात्मा मुन्शीरामजींनीं पुढें लवकरच धर्मवीर लेखरामजींचें चरित्र प्रसिद्ध केलें.

# श्रद्धाञ्जलि २० वी.

## गुरुकुल महाविद्यालय.

**ब्रह्मचर्येण तपसा देवा मृत्युमपाघ्नत ।**
**इन्द्रो ह ब्रह्मचर्येण देवेभ्यः स्वराभरत् ॥**

अथ. ११—५—१९.

हिंदुस्थान पादाक्रांत केल्यावर हिंदी लोकांच्या शिक्षणाचा प्रश्न निघाला असतां इंग्लंडमध्यें दोन पक्ष झाले. एक म्हणे शिक्षण न देणें बरें अगर द्यावयाचें झाल्यास कामचलाऊ देशीभाषेचें शिक्षण दिलें म्हणजे झालें. पण दुसरा पक्ष म्हणे कीं हिंदी लोकांना अशिक्षित ठेवून त्यांच्यावर राज्य करणें कठीण जाईल. त्यांचे पूर्वज अत्यंत ज्ञानी, वैभवशाली व तत्त्ववेत्ते होते. अशांच्या वंशजांना अज्ञानांधःकारांत ठेवून राज्ययंत्र सुयंत्रितपणें चालणें शक्य नाहीं, तर त्यांना पाश्चात्य शिक्षण देऊन त्यांच्यावर राज्य करणें सुलभ होय.

या पक्षाचे अध्वर्यु प्रसिद्ध इतिहासकार लार्ड मेकाले यांचें मत 'हिंदुस्थानच्या रहिवाश्यांमध्यें व इंग्रज लोकांमध्यें असा एक मध्यस्थ वर्ग तयार करावा कीं जो फक्त रक्तानें व रंगानें हिंदी राहून शिक्षणानें, रीतीभातीनें, नीतिमत्तेनें व बुद्धीनें इंग्लिश बनेल' असें होतें.

हिंदु लोक हिंदुधर्माभिमानरहित करून त्यांना आर्यसंस्कृतीचें शिक्षण न देतां त्या संस्कृतीविषयीं जेणें करून तिरस्कार उत्पन्न होईल व पाश्चात्य संस्कृतीचा ते आदर करतील असें शिक्षण द्यावें असें त्यांचें मत होतें. व हिंदी लोकांस ख्रिश्चन केलें कीं, इंग्रज राजसत्ता हिंदुस्थानावर अबाधितपणें चालेल. हिंदी लोकांना रणांगणांवर जिंकल्यावर पाश्चात्य संस्कृतीनें त्यांचीं मनें पादक्रांत करणें हें आपलें प्रथमचें कर्तव्य आहे असें पुष्कळांचें मत होतें. हिंदी लोक आपल्या संस्कृतीचे गुलाम झाले, आपल्या धर्माचा स्वीकार करून त्यांनीं आपल्या रीतीभाती उचलल्या कीं, त्यांना हिंदुत्वरहित

करण्याचें ( Deindianising ) कार्य पूर्ण झालें. मग भारत देशावर आपणांस चौदा चवकड्या राज्य करण्यास हरकत नाहीं. ईस्ट इंडिया कंपनीनें या हेतूनें मिशनरी प्रचारकांना पहिल्यापासून सवलती दिल्या व त्यांच्याकडून हिंदी लोकांना पाश्चात्यमय करण्याचें (Westernization) कार्य तिनें आरंभिलें. हिंदी लोकांना पाश्चात्यमय करणें हें एक राजकीय शस्त्र आहे असें समजून मिशनऱ्यांना हिंदुस्थानांत विशेष सवलती मिळल्या आणि म्हणूनच जवळ जवळ अर्ध कोट हिंदी लोकांना ख्रिस्ती करण्याचें कार्य या मिशनऱ्यांनीं एका शतकांत केलें.

पाश्चात्यांचा अंतःस्थ हेतु भोळ्या हिंदी लोकांस कळला नाहीं. व हिंदी मुलें इंग्रजी शिक्षण घेण्याकरतां शाळेंत जाऊं लागलीं. पण ती हिंदुधर्मद्वेषी नास्तिक पाश्चात्यांचें अंधानुकरण करणारीं निघालीं. पहिल्या पिढीवर या शिक्षणाचा असा दुष्परिणाम झालेला पाहून कांहीं विचारी लोकांनीं हा शिक्षणाचा प्रश्न हातीं घेण्याचें ठरविलें व जेणें करून हिंदी-मुलें आपल्या धर्माविषयीं, आपल्या संस्कृतीविषयीं व मातृभूमीविषयीं अभिमानी होतील असें शिक्षण देणाऱ्या शिक्षणसंस्था हिंदुस्थानांतच निघूं लागल्या.

आर्यसमाजसंस्थापक स्वामी दयानंद सरस्वती यांच्या स्मारकानिमित्त आर्यसमाजी मंडळींनीं दयानन्द अँग्लो वैदिक कॉलेज काढण्याचे १८८९ मध्यें ठरविलें. तरुण पिढी पाश्चात्यशिक्षणसंपन्न व्हावी, पण त्याबरोबर वैदिकधर्माचें योग्य शिक्षणही त्यांना दिलें जावें व पुढें या विद्यार्थ्यांच्या हातून देशाची व धर्माची सेवा व्हावी, गतवैभव पुन्हां संपादन करण्यास हा वर्ग साहाय्यकारी व्हावा या उच्च हेतूनें या कॉलेजची स्थापना झाली.

दे. भ. लजपतराय, महात्मा हंसराज, पं. गुरुदत्त विद्यार्थी यांच्या बरोबर आमचे चरित्रनायक महात्मा मुन्शीरामजींनीं या कॉलेजच्या स्थापनेस व चालनेस यथोचित साहाय्य केल्याचा गत प्रकरणीं उल्लेख आहे. पण या कॉलेजच्या भोंवतीं विश्वविद्यालयाच्या नियमात्मक शृंखलेचें बंधन पडल्यामुळें पाश्चात्यशिक्षणाव्यतिरिक्त अन्य उद्दिष्ट या संस्थेस साध्य करतां येईना. आपल्या इच्छित ध्येयाप्रमाणें शिक्षाप्रणाली या संस्थेंत सुरू करणें कठीण जाणून स्वामी दयानंदजींच्या आदेशाप्रमाणें गुरुकुलाची स्थापना करण्याकरतां महात्मा मुन्शीरामजींनीं या कॉलेजचा आपला संबंध सोडला.

सद्धर्मप्रचारक वर्तमानपत्रांतून मुन्शीरामजींनीं लोकजागृति करण्यास सुरवात केली. लवकरच त्यांच्या इच्छेप्रमाणें लोकमत तयार झालें. सन १८९८ च्या अखेरीस आर्यप्रतिनिधी सभेनें गुरुकुल विद्यालय स्थापन करण्याचें निश्चित केलें व तीस हजार रुपयांचीं आश्वासनें मिळून आठ हजार रु. रोख हातीं येतांच या कार्यास प्रत्यक्ष सुरवात करावी असें ठरविलें. महात्मा मुन्शीरामजींनीं हें कार्य आपल्या अंगावर घेतलें. त्यासमयीं हजार दोन हजार रुपये सार्वजनिक कार्याकरतां जमवणें अत्यंत दुर्घट काम होतें.

**निश्चयाचें बळ । तुका म्हणे तेंचि फळ ॥**

महात्मा मुन्शीरामजींनीं गुरुकुलासाठीं पैसा जमवण्याचा निश्चय केला. त्याप्रीत्यर्थ त्यांनीं ठिकठिकाणीं दौरे काढले. आधीं केलें । मग सांगितलें । अशा वृत्तीचे ते असल्यामुळें दुसऱ्यास द्रव्य मागण्यापूर्वीं त्यांनीं आपलें सर्वस्व या कामीं प्रथम अर्पण केलें. जालंदरांतील आपला राहता वाडा वीस हजार रुपयांस विकला व आणखी सुमारें वीस हजार रुपये त्यांनीं सभेस दिले. त्यांच्या स्वार्थत्यागामुळें व आत्मसमर्पणामुळें लोकांनीं त्यांना उदारहस्तें मदत केली. स्वार्थावर तिलांजलि देणाऱ्या व आपलें तनमनधन त्या कार्यास अर्पण करणाऱ्या माणसास पैशाची उणीव कधींच पडत नाहीं.

इष्ट तें धन एकत्रित होतांच महात्मा मुन्शीरामजींनीं स्वतःचीं इंद्र व चंद्र हीं दोन मुलें व दुसरीं तेरा मुलें घेऊन ते हरद्वारास गेले.

**सत्यसंकल्पाचा दाता भगवान । सर्व मनोरथ पूर्ण करी ॥**

गुरुकुल संस्थेस जागा कोठें पहावी या विचारांत असतां सत्यसंकल्प पूर्ण करणाऱ्या परमेश्वराच्या प्रेरणेनें एका उदारदात्यानें हरद्वारापासून दोन कोसांवर असलेल्या कांगडी गांवीं महात्मा मुन्शीरामजीस सुमारें ९०० एकर जमीन दान म्हणून दिली. या भूमीवर २ मार्च १९०२ रोजीं महात्मा मुन्शीरामजींनीं आपल्यासाठीं व आपल्या पंधरा शिष्यांसाठीं पर्णकुटिका बांधल्या.

या संस्थेचा जन्म अगदीं लहान अवस्थेंत जरी झाला असला तरी आतां या गुरुकुलाचें गुरुकुल महाविद्यालयांत रूपांतर

झालें असून सुमारें ३०० ब्रह्मचारी या विद्यालयांत असून तीस अध्यापक विद्यादानाचें पवित्र कार्य करीत आहेत. या संस्थेची साम्प्रत स्थावर जंगम संपत्ति सुमारें १०।१२ लाख रुपयांची असून दिल्ली, पानिपत मुलतान वगैरे ठिकाणीं याच्या सात शाखा असून आर्यसमाजानें या धर्तीवर सुमारें साठ गुरुकुलें सुरू केलीं आहेत. त्यांतून प्राच्यप्रणालीचें शिक्षण देण्यांत येतें.

वयाच्या ७ व्या वर्षापासून २५ व्या वर्षापर्यंत या गुरुकुलांमधून ब्रह्मचारी ठेविले जातात. कांहीं विशिष्ट प्रसंगाशिवाय विद्यार्थ्यांस पालकांच्या गृहीं पाठवींत नाहींत. विद्यार्थ्यांच्या माता पितरांनाहीं फक्त एक दोन वेळच वर्षांतून आपल्या मुलांस भेटण्याची परवानगी असते. कौटुंबिक चिंतेचा विद्यार्थ्यांच्या मनावर परिणाम होऊं नये व त्यांच्या विद्याभ्यासांत व्यत्यय येऊं नये म्हणून काळजी घेण्यांत येतें.

सर्व शिक्षण हिन्दिभाषेंतून दिलें जातें. संस्कृत, व्याकरण, न्याय, दर्शन, उपनिषद् व वेदादि धर्मग्रंथाच्या अध्ययनाबरोबर इतिहास, गणित, भूमिति, साहित्य, अर्थशास्त्र, रसायनशास्त्र, बी. ए. च्या योग्यतेचें इंग्रजी भाषेचें ज्ञान, आयुर्वेद इत्यादि विषय सोपपत्तिक रीतीनें शिकविले जातात. कोणत्याही विषयाचा बोजा न वाटतां विद्यार्थी तो विषय अत्यंत सुलभतेनें व स्वच्छेनें शिकतो अशी अभ्यासक्रमाची रचना केलेली आहे.

गुरुकुलाचा विद्यार्थी एकांगी न बनतां व्यवहारचतुर, समयज्ञ, धर्मसेवक व देशसेवक निपजावा असें या संस्थेचें धोरण आहे. पाश्चात्य शिक्षण व पौर्वात्य वेदादि धार्मिक ग्रंथांचें शिक्षण या दोन्हींचा सुंदर मिलाफ केला असल्यामुळें संस्थेंत शिक्षणक्रम समाप्त करून बाहेर पडणारा स्नातक विद्वान, बहुश्रुत व तेजस्वी असा असतो.

पुस्तकी शिक्षणाबरोबर शारीरिक शिक्षणाची या संस्थेंत विशेष काळजी घेण्यांत येते. शक्तीविना ज्ञान उपयोगी नाहीं व ज्ञानावांचून शक्ति निरुपयोगी ठरते. म्हणून शक्ति व युक्ति (ज्ञान) यांचा संयोग व्हावा एतदर्थ येथें प्रयत्न करण्यांत येतात. धनुर्विद्या लाठी, फारिगदगा, कुस्ती, नमस्कार इत्यादि शरीरसंवर्धक व्यायामाचें विद्यार्थ्यांस शिक्षण देण्यांत येतें.

शिक्षणाइतकेंच शीलसंवर्धन महत्त्वाचें आहे. शील संभाळलें न गेल्यास शारीरिक शक्तींची हानि होते. हें जाणून विद्यार्थ्यांचें शील संभाळण्याच्या कामीं गुरुकुलामध्यें अत्यंत काळजी घेण्यांत येतें. विद्यार्थी व अध्यापक यांचें गुरुकुलामध्यें अहर्निश साहचर्य असल्यामुळें शीलसंवर्धनाचें कार्य हायस्कुलें व कॉलेजें यापेक्षां या संस्थेस पूर्णत्वानें करतां येतें. या संस्थेंत शिक्षण ग्रहण करणारा विद्यार्थी **कर्मणा मनसा वाचा सर्वावस्थासु सर्वदा** ' ब्रह्मचर्याचें पालन करणारा व्हावा अशी खबरदारी घेण्यांत येते. कारण

**धर्म्यं यशस्यमायुष्यं लोकद्वयरसायनम्।**
**अनुमोदामहे ब्रह्मचर्यमेकान्तनिर्मलम् ।**

या जगामध्यें धर्महितकारक, यशायुष्यवृद्धिकारक इहलोकीं मान मान्यता व परलोकीं उत्तम गति देणारें ब्रह्मचर्य हें एकच साधन आहे. अतएव ब्रह्मचर्यव्रतपरिपालनाविषयीं या संस्थेंत अत्यंत दक्षता राखली जाते.

**वेदास्त्यागश्च यज्ञाश्च नियमाश्च तपांसि च।** वेदाध्यन, यज्ञयाग संध्योपासना, प्राणायाम व तपश्चर्या करतां यावी अशी या गुरुकुल संस्थेंत व्यवस्था केलेली आहे. प्रातःकालीं ब्राह्ममुहूर्तावर उठून शौचमुखमार्जन व्यायाम स्नानादि झाल्यावर संध्योपासन व प्राणायामादि नित्यकर्म समाप्तीनंतर दुग्धपान करून येथील विद्यार्थी अध्ययनास आरंभ करतात.

समानता, त्यागी वृत्ति व साधें जीवन यांचें क्रियात्मक शिक्षण देणारी जर कोणती संस्था असेल तर ही गुरुकुल संस्था होय. या संस्थेंत स्पृश्यास्पृश्य उच्चनीचादि जातिभेद पाळला जात नाहीं एवढेंच नव्हें तर गरीब श्रीमंत हा फरकही ठेविला जात नाहीं. लक्षाधीशाचा मुलगा व भीक्षाधीशाचा मुलगा हे समानत्वाच्या नात्यानें ब्रह्मचर्याचीं कौपिनादि भगवीं वस्त्रें परिधान करतात व समान असा शुद्ध आहार घेतात.

एका बाजूस सुंदर उपवन, दुसरे बाजूस गंगेचा आमोददायक प्रशांत जलप्रवाह, एके बाजूस हिमालयाचीं हिमाच्छादित गगनचुंबित शिखरें व पुष्पभारानें व फळभारानें लवलेले घनदाट वृक्ष अशा निसर्गरमणीय स्थळीं

गुरुकुल विश्वविद्यालयामधील संस्कृतमध्यें एकमेकाशीं बोलणाऱ्यांकडे पहातांच प्रेक्षकास आपण ऋषिमुनिकालच्या व्यासविश्वामित्रांच्या आश्रमांतच आलों आहोंत असें वाटल्यावांचून रहात नाहीं.

आपलें स्वातंत्र्य व शिक्षणप्रणाली यांमध्यें व्यत्यय येऊं नये म्हणून गुरुकुलविद्यालयास सरकारी ग्रँट द्यावयाची नाहीं असें आचार्य महात्मा मुन्शीरामजींनीं ठरविलें व त्याच स्वावलंबनाच्या व राष्ट्रीय तत्त्वांवर आज २५ वर्षें ही संस्था चाललेली आहे. गुरुकुल विद्यालयांतून आज पंचवीस वर्षांपासून महात्मा मुन्शीरामजींनीं राष्ट्रीय शिक्षण सुरूं केलें यावरून त्यांची योग्यता सहज समजण्यासारखी आहे.

महात्मा गांधींनीं असहकारिता पुकारण्यापूर्वीं महात्मा मुन्शीरामजींनीं ती पूर्णपणें अमलांत आणली होती. या संस्थेंतून शिक्षण घेतलेल्या ब्रह्मचाऱ्यांपैकीं शेंकडा ६० जणांनीं महात्मा गांधींच्या असहकारितेच्या आंदोलनांत भाग घेतला, व देशसेवेच्या कार्यास यथाशक्ति हातभार लावला. या संस्थेंतील स्नातकांनीं हिंदी भाषेची व संस्कृत भाषेची अनुपम सेवा केलेली आहे. हिन्दी भाषेमध्यें या ब्रह्मचारी वर्गानें अत्यंत विद्वत्ताप्रचुर असे ग्रंथ लिहिले आहेत.

**अग्रतश्चतुरो वेदान् । पृष्ठतः सशरं धनुः ॥**
**इदं ब्राह्ममिदं क्षात्रं । शापादपि शरादपि ॥**

ब्राह्मणत्व अंगीं येण्यास संध्याध्यानधारणेचें व वेदाचें शिक्षण आणि क्षात्रियत्व अंगीं संचरण्यास ब्रह्मचर्यव्रताचें पालन, लाठी, दांडपट्टा, फरीगदगा व धनुर्विद्या यांचें शिक्षण दिलें जात असल्यानें येथील ब्रह्मचाऱ्यांच्या अंगीं शापादपि शरादपि शक्ति आल्यास नवल नाहीं. अशा क्षात्रब्राह्मतेजसंपन्न ब्रह्मचारी वीर युवकांच्या हातूनच भारत देशास स्वातंत्र्य मिळण्याची आशा आहे. स्वराज्यसाधनास आवश्यक असा गुरुकुलप्रणालीचा भारत देशानें पुन्हा पुनरुद्धार केल्यास स्वराज्य हां हां म्हणतां मिळेल.

गुरुकुल स्थापनेच्या उच्च हेतुवरून व त्यांतून निघणाऱ्या धर्मवीर नवयुवकांच्या कार्यावरून गुरुकुल स्थापक महात्मा मुन्शीरामजींची योग्यता समजून येण्यासारखी आहे. अशा रीतीनें या प्रणालीचा स्वामी दयानंद सरस्वतींच्या आदेशानुरूप आमच्या चरित्रनायकांनीं पुनरुद्धार केला.

# श्रद्धाञ्जलि २१ वी.

## चिरोलचे चोरटे हल्ले व सरकारी संक्रांत.

**विघ्नैः पुनःपुनरपि प्रतिहन्यमानाः ।**
**प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति ॥**

आर्यसमाजाच्या वर्धिष्णु स्वरूपामुळें व गुरुकुलाच्या ब्रह्मचाऱ्यांचें शापादपि शरादपि तेज पाहून परधर्मीयांचें धाबें दणाणलें. आर्यसमाजाचा पांडित्यानें पाडाव करणें कठीण जाणून परधर्मीय पंडितमन्यांनीं आर्यसमाजाचा कपट नीतीनें पाडाव करण्याचें ठरविलें.

मुसलमान समाज ख्रिस्तीसमाजापेक्षां कपट नीतींत कमी प्रवीण असल्यामुळें व सरकारादरबारांत त्याचें ख्रिस्ती समाजाप्रमाणें वजन नसल्यामुळें आर्यसमाजाचा उघड विरोध करण्यांत किंवा धर्मवीर पं. लेखरामासारख्यांचें भ्याडपणें खून करण्यांत पुरुषार्थ मानीत होता. पण ख्रिस्तीसमाज कपटनिपुण व शांततावादी असल्याकारणानें त्यानें समाजाचा परस्पर तिसऱ्याच्या हातून पाडाव करण्याचा उपक्रम सुरू केला.

आपल्या काळे ख्रिस्ती व गोरे ख्रिस्ती बांधवांना व दोहोंच्या संमिश्रणानें उत्पन्न झालेल्या अँग्लोइंडियनांना या समाजानें आपल्यां बाजूस घेतलें. समाजावर सभेंत वाग्बाण सोडण्यापेक्षां वर्तमानपत्रामध्यें टीका करणें प्रभावदायक आहे असें जाणून कित्येक अंग्लोइंडियन वर्तमानपत्रकर्त्यांनीं समाजावर व समाजसंस्थापक दयानन्द सरस्वतीवर खोटीनाटी टीका करण्यास सुरवात केली. “आर्यसमाज हा बंडखोर समाज आहे. इंग्रज सरकारास उलथून पाडणारा हा सुसंघटित कट आहे” अशीं विधानें करण्याचा कांहीं पत्रकर्त्यांनीं प्रयत्न केला. त्याची साथ कित्येक इंग्लिश वर्तमानपत्रकर्त्यांनीं केली.

महात्मा मुन्शीरामजींनीं स्थापन केलेलें गुरुकुलविद्यालय बंद पाडावें या

हेतूनें या द्वेषांध प्रचारकांनीं ही संस्था लष्करी शिक्षण देणारी व राजक्रांतीची पूर्व तयारी करणारी आहे असें बरळण्यासही कमी केलें नाहीं. या सर्वांवर एका महापंडितानें आपल्या अकलेची शर्थ केल्यामुळें आर्यसमाजाच्या स्वावलंबामुळें व स्वतंत्रवृत्तीमुळें संशयी असलेलें सरकार अधिकच संशयांध बनलें. त्यामुळें आर्यसमाजावर समाजाच्या संस्थांवर व पुढाऱ्यांवर सरकारची वक्रदृष्टि झाली. समाजाच्या संस्थांची बारकाईनें व गुप्तरीतीनें तपासणी सुरू झाली, समाजाच्या नेत्यांच्या मागें सरकारी ससेमिरा लागला, कित्येकांना शिक्षा झाल्या व कित्येकांना हद्दपारी मिळाली.

सन १९०७ ते १० सालपर्यंत समाजावर सरकारी आक्रमण होत होतें. समाजाच्या इतर संस्थाबरोबर गुरुकुलविश्वविद्यालयावरही सरकारची इतराजी झाली. ही संस्था चालते कीं बंद पडते अशी स्थिति आली असतां आमचे चरित्रनायक महात्मा मुन्शीराम यांनीं या प्रसंगास धैर्यानें तोंड दिलें म्हणूनच सरकारी आक्रमणांतून ही संस्था शीरसलामत निघून दिवसेंदिवस उन्नति पावत आहे.

सर व्हॅलेनटाईन चिरोल नामक एका लंडन टाइम्सच्या बातमीदारानें हिंदुस्थानांत प्रवास करून "Unrest in India" **हिंदुस्थानांतील अशांतता**" नामक एक लेखमाला लिहिली. तिच्यांत आर्यसमाजाचा व आर्यसमाज संस्थापक स्वामी दयानंदांचा निर्देश करून हा समाज राज्यक्रांतिकारक आहे असें प्रतिपादिलें. स्वामी दयानन्दांनीं धार्मिक कार्यापेक्षां इंग्रज सरकारास विरोध करण्याचेंच अधिक कार्य केलें असा शेरा साहेब मजकुरांनीं मारला. ( १ ) रावळपिंडीच्या दंगलीमध्यें आर्यसमाजी मंडळी होती. ( २ ) लाला लजपतराय व अजितसिंग ही राजक्रांतिकारक मंडळी आर्यसमाजी होती. ( ३ ) भाई परमानन्द यांच्याजवळ बाम्ब करण्याचें क्रियात्मक फॉर्म्युलें सांपडले, इत्यादि खोटींनाटीं विधानें त्यांनीं आपल्या मताच्या पुष्टिप्रीत्यर्थ दिलीं.

समाजावर हा जो हल्ला झाला त्याचा प्रतिकार करण्याकरतां आर्यसमाजाच्या गुरुकुल व कॉलेजचे दोन्ही पक्ष एकमेकांच्या खांद्यास खांदा लावून कटिबद्ध झाले.

**राजद्वारे श्मशाने च यस्तिष्ठति स बांधवः ।**

अशा वृत्तीचे हे दोन्ही पक्ष असल्यामुळें परकीयांनीं प्रहार करतांच या दोन्ही पक्षांनीं एक होऊन जोरानें प्रतिकार केला. दे. भ. लाला लजपतराय यांच्यावरील संकटाचे वेळीं महात्मा मुन्शीराम धावून आले व गुरुकुलावरील प्रसंगाचे समयीं दे.भ. लजपतरायांनीं यथोचित साहाय्य केलें. समाजावर सरकारी संक्रांत येतांच तिचा या दोघानीं जोरानें प्रतिकार केला. समाजाचे नेते खंबीर मनाचे होते म्हणूनच समाजाची या आपत्तींतून सुटका झाली. नाहींतर यावेळीं समाजाचें नांवही ऐकूं आलें नसतें.

नौकानयनशास्त्रनिपुण नावाडी खवळलेल्या दर्यांतून खडक चुकवून आपली नांव जशी पैलतीरास नेतो त्याप्रमाणें आर्य समाजाग्रणींनीं समाजनौका सरकारी वक्रगतीच्या दारुण दर्यांतून बिनधोकपणें वांचवून सुस्थितीच्या प्रशांत बंदरास नेली. याचें श्रेय आमचे चरित्रनायक महात्मा मुन्शीराम व पंजाबकेसरी लाला लजपतराय यांना आहे. हे दोघेजण **वज्रादपि कठोराणी मृदूनि कुसुमादपि ।** अशा अन्तःकरणाचें होते. अनाथांचें व अबलांचें रक्षण करण्याचे समयीं कुसुमाहून मृदु असणारें यांचें अंतःकरण प्रस्तुत प्रसंगीं वज्राप्रमाणें कठोर झालें.; व त्यांनीं या प्रसंगास धैर्यानें तोंड दिलें. विपक्षीयांशीं सामना देतांना हृदयावर जरी यांना काठिण्याचें कवच धारण करावें लागे तरी तें फक्त प्रसंगापुरतेंच; प्रसगं संपतांच, विरोध मिटतांच तेंच अन्तःकरण मेणाहून मऊ बने व शत्रूकडेही मित्रत्वाच्या दृष्टीनें पहावयास लागे. आर्यसमाजास **मित्रस्य चक्षूषा सर्वाणि भूतानि समीक्षामहे** अशी वसुधैव मित्रत्वाची शिकवण मिळालेली आहे. माणसांशींच काय पण द्विपादचतुष्पादांशींहि मित्रत्वाच्या दृष्टीनें पहावें असें समाजाचें ध्येय असल्यानें केवळ कर्तव्य वशतेमुळें सदर संक्रांतीला या दोन महात्म्यांनीं तोंड दिलें.

चिरोलसाहेबांच्या विधानांचें खंडण दे. भ. लजपतरायांनीं पुढील प्रमाणें फार मार्मिकतेनें केलें आहे. " आपल्या प्रतिपादनाच्या पुष्टीप्रीत्यर्थ चिरोल साहेबांनीं कोठले आधार घेतले हें विशद केलें नाहीं; व त्यांना ज्या प्रश्नाची पुरी माहिती नाहीं त्या प्रश्नाचा त्यांनीं विनाकारण खल केलेला

आहे, व विचार न करतां लेख खरडले आहेत. (१) रावळपिंडीच्या आर्य-समाजी मंडळीवर केलेला बंडखोरीचा आरोप निराधार ठरला व त्यांतून ती मंडळी दोषमुक्त झाली ही गोष्ट चिरोल साहेबांना पुस्तक लिहितेवेळीं माहिती असली पाहिजे. (२) सरदार अजितसिंग हा कोणत्याही आर्य समाजाचा सभासद नव्हता. अर्थात त्याच्या कृत्याचा समाजाशीं संबंध जोडणें न्याय्य नाहीं. (३) लाला लजपतरायांची कोर्टानें कधींहीं चौकशी केली नाहीं. आपल्या हद्दपारीचीं कारणें विचारलीं असतां सरकारनें त्यांना सांगितलीं नाहींत. त्यांनीं आपलीं राजकीय मतें कधींही गुप्त ठेविलीं नाहींत व वर्तमानपत्रकर्त्यांवर त्यांनीं फिर्याद केली असतां त्यांच्या बाजूचा निकाल झाला. (४) भाई परमानन्दजीजवळ बांब करण्याचे फॉम्युर्ले होते हें सिद्ध झालें नाहीं.

दे. भ. लजपतरायांच्या शब्दानें चिरोल साहेबांची बोळवण करतांना असें म्हणणें क्रमप्राप्त आहे कीं चिरोल साहेबांनीं अपुऱ्या माहितीच्या आधारावर अविचारानें टीका केली म्हणूनच ती समाजाच्या प्रतिकारापुढें टिकली नाहीं. महात्मा मुन्शीरामजींनीं या हल्ल्याचा फारच जोरानें प्रतिकार केला. १९०७ च्या नोव्हेंबर महिन्यांत ते लाहोरच्या जाहीर सभेंत म्हणाले:

"आर्यसमाज शांतता पसरणारा आहे. समाजाच्या शैक्षणिक संस्थांतून सदाचारी, स्वाभिमानी व सरळ वृत्तीचीं माणसें तयार होतात. वैदिक धर्म हा विश्वधर्म असल्यामुळें त्याचीं तत्त्वें सार्वदेशिक व त्रिकालाबाधित आहेत. राज्यक्रांति, रक्तपात, खून अराजकता, अशांतता व जातिद्वेष इत्यादि गोष्टी सद्धर्मप्रसारास घातक आहेत. म्हणून अशा गोष्टींचा समाज निषेध करून त्यांपासून दूर रहातो. सामुदायिक तत्त्वाचा विचार केल्यास आर्यसमाजसंन्यासी आहे. कर्तव्योपदेशकरून लोकांना सन्मार्गगामी करणें हें समाजाचें कर्तव्य आहे. राजकारण हा गृहस्थाश्रमीयांचा धर्म असल्यामुळें आर्य समाजाचा प्रचलित राजकारणाशीं संबंध येऊंच शकत नाहीं."

१९१० सालीं त्यांनीं प्रो. रामदेवांच्या मदतीनें **आर्यसमाजाचे शत्रु** नामक एक ग्रंथ प्रसिद्ध केला. त्यांतील पुढील उतारा मननीय आहे. "वैदिक-

धर्माचा आर्यसमाज प्रसार करतो, वैदिकधर्म मनुष्यमात्रास स्वदेशनिष्ठ करणारा आहे. वेदप्रतिपादित स्वदेशनिष्ठा अत्यंत उच्च दर्जाची, विश्वबन्धुत्वप्रेरक, व शांतताप्रसारक असून परस्परांत प्रेम व समानता उत्पन्न करणारी आहे. वैदिकधर्म सामुदायिक व वैयक्तिक कर्तव्योपदेश करणारा असून राजकीय व सामाजिक तत्त्वें प्रतिपादणारा आहे. कॉलेजचे प्रोफेसर विद्यार्थांना "Mills Liberty, & Representative government, Spencer's Men Versus the State, किंवा Physics & Politics' इत्यादि पुस्तकें शिकवून राज्यक्रांतिकारक म्हणून गणले जात नाहींत तर आर्यसमाज आपल्या धार्मिक उपदेशाबरोबर समाजशासन व समाज संस्थापना प्रसंगोपात् प्रतिपादूं लागला तर मात्र समाज राजकीय संघ आहे असें कां समजावें !"

महात्मा मुन्शीरामजींचा स्वभाव धैर्यशील, सहिष्णु असल्यामुळें त्यांनीं समाजावर व गुरुकुलावर आलेल्या या हल्ल्याचा शांतपणें प्रतिकार केला. निरनिराळ्या सरकारी अधिकाऱ्यास आपल्या गुरुकुल संस्थेंत निमंत्रित करून त्यांना गुरुकुल शिक्षणप्रणालीचा खरा उद्देश विशद करून सांप्रत त्यांच्या मनांतील संशय मुन्शीरामजींनीं दूर केला. नानातऱ्हेचीं संकटें आलीं असतां त्यांनीं हातीं घेतलेलें गुरुकुल शिक्षणाचें कार्य मोठ्या नेटानें व धडाडीनें पुढें चालविलें. **हेम्नः संलक्ष्यते ह्यग्नौ विशुद्धिः श्यामिकापि वा।** या उक्तीनुरूप समाज व समाजाचें गुरुकुल विद्यालय सुवर्णाप्रमाणें विशुद्ध व लोकोपयोगी आहे हें या प्रसंगानें सिद्ध झालें.

---

# श्रद्धाञ्जलि २२ वी.

## संन्याशाचा संसार.

**दुर्लभं त्रयमेवैतत् देवानुग्रहहेतुकम् ।**
**मनुष्यत्वं मुमुक्षत्वं महापुरुषसंश्रयः ॥**

—श्रीशंकराचार्यः ॥

पत्नी परलोकवासी झाल्यानंतर महात्मा मुन्शीरामजींनीं आपलें

आयुष्य परोपकारामध्यें खर्ची घालण्याची प्रतिज्ञा केली व ती पूर्ण केली. गृहस्थाश्रमींच्या मनुष्यत्वाची कर्तव्यें पुरीं केल्यावर वानप्रस्थाश्रमाचा स्वीकार करून त्यांनीं हरद्वारास गुरुकुलस्थापनेचें कार्य केलें. तेथें त्यांनीं समर्थोक्तीप्रमाणें

**सांडुनि आपुली संसारकांता ।**
**करीत जावी देवाची चिंता ॥**
**निरुपण कथा वार्ता ।**
**देवाच्या सांगण्या ॥**

आपलें आचरण ठेविलें. परमेश्वराचें चिंतन करण्यांत व गुरुकुलांतील शिक्षणाचें पवित्र कार्य करण्यांत त्यांनीं आपला समय खर्च केला. आर्यसमाजावर व गुरुकुलावर सरकारची वक्र दृष्टि झाली असतां त्यांनीं दे० भ० लजपतराय व आर्यसमाजाच्या नेत्यांच्या साहाय्यानें समाजाचा व संस्थांचा बचाव केला.

पण यानंतर त्यांच्यावर आणखी एक मोहास्त्र टाकलें गेलें. गुरुकुल संस्था आपल्या पाशांत ओढण्याकरतां सरकारानें गुरुकुल विद्यालयास दरसाल एक लाख रुपये देण्याचें व अंजाना जंगल देण्याचें प्रलोभन दाखविलें असतां त्या स्वार्थत्यागी देशसेवक महात्म्यानें सरकाराचें हें मोहास्त्र दूरदर्शीपणानें दूर झुगारून दिलें व आपलें गुरुकुल विद्यालय सरकारी कपर्दिकही न घेतां राष्ट्रीयत्वाच्या बाण्यानें स्वतंत्रपणें चालविलें. महात्मा मुन्शीराम हे **राष्ट्रीय शिक्षणाचे प्रथमचे पुरस्कर्ते** होत.

वानप्रस्थाश्रमीं परमेश्वराचें चिंतन करीत असतां पारिवारिक कर्तव्यपालनामध्यें त्यांनीं हयगय केली नाहीं. पत्नी मृत झाल्यावर आपल्या दोन मुलांच्या व दोन मुलींच्या संगोपनाचें कार्य त्यांनीं केलें. लालादेवराजजींच्या मदतीनें त्यांनीं जालंदरास ज्या कन्यामहाविद्यालयाची स्थापना केली त्या विद्यालयांत त्यांनीं आपल्या दोन्ही कन्यकांना शिक्षणाकरतां ठेविलें व त्या दोन्ही मुलींचे प्रत्यक्ष मातुलच लाला देवराज विद्यालयाचे आचार्य असल्यामुळें महात्मा मुन्शीरामजींच्या मुलींच्या शिक्षणाचें कार्य सदर संस्थेंत अत्यंत उत्तम रीतीनें झालें.

आपल्या हरिचंद्र व इन्द्र या दोन मुलांचें शिक्षण त्यांनीं स्थापिलेल्या गुरुकुल विद्यालयांत झालें. त्यांचे दोन्ही पुत्र गुरुकुलाच्या स्नातक परीक्षेंत १९११ सालीं पास झाले.

मुलांचा विवाह २५ वर्षांनंतर व मुलींचा विवाह सोळा वर्षांनंतर करावयाचा असें त्यांचें मत असल्यामुळें त्यांनीं आपल्या मुलांमुलींचें विवाह प्रौढावस्थेंत केले. तसेंच ते गुणकर्मप्रधान चातुर्वर्ण्याला मान्यता देणारे असल्यामुळें जन्मतः जातिभेद किंवा उच्चनीच भेद ते मानीत नव्हते. पण मानणें व त्याप्रमाणें वर्तन करणें यांत फारच फरक आहे.

**लोकां सांगे ब्रह्मज्ञान ।**
**आपण कोरडे पाषाण ॥**

अशा वृत्तीचे बोलघेवडे सुधारक ते नव्हते. 'आधीं केलें । मग सांगितलें ।' ही वृत्ति त्यांच्या अंगीं हडीं मासीं खिळली होती; म्हणून त्यांनीं आपल्या मुलांमुलींचे विवाह जातीचीं बंधनें तोडून केले.

त्यांची प्रथम कन्या **वेदकुमारी** हिचा विवाह कन्यामहाविद्यालयांत तिचें शिक्षण पूर्ण झाल्यावर लुधियानाचे वकील लाला धनीराम यांच्याशीं झाला. लाला धनीराम हे कांग्रेसभक्त असून म्युनिसिपल कौन्सिलर आहेत. वेदकुमारी देवी स्त्रीशिक्षणाचें कार्य करीत आहे. असहकारितेच्या समयीं या पतिपत्नींनीं विशेष भाग घेतला होता.

त्यांची दुसरी कन्या **अमृतकला** हिचा विवाह राठोड जातीचे डॉ० सुखदेव यांच्याशीं झाला. ही जात लाला मुन्शीरामजींच्या जातीहून कमी समजली जाते. विवाह झाल्यावर अमृतकला दोन वर्षांनीं मरण पावली. डॉ० सुखदेव यांनीं दुसरा विवाह करण्याचे भानगडींत न पडतां आपल्या श्वशुराप्रमाणें पुढील आयुष्य विधुरावस्थेंत व देशसेवेंत कंठण्याचें व्रत चालविलें आहे. ते सांप्रत शुद्धिसंघटन, अस्पृश्योद्धार व विधवाविवाह इत्यादि धर्मसेवेचीं कार्यें करीत आहेत.

त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव स्नातक **हरिश्चंद्र** यांचा विवाह १९१३ सालीं रोडा जातीच्या सुभद्रा नामक एका आर्यकन्येशीं झाला. १९१५ सालीं राजा महेन्द्र प्रताप यांच्याबरोबर ते विलायतेस गेले. तेथून अमेरिकेंत

गेल्यावर एका इंग्रजी दैनिकाच्या संपादकाचें कार्य करीत होते. विदेशांत देशसेवा करीत असल्यामुळें बरींच वर्षें सरकारानें त्यांचा पिच्छा पुरवला, व त्यांना हिंदुस्थानांत येण्याची मनाई केली. हे हिन्दी व इंग्रजी भाषांचे उत्तम वक्ते व लेखक होते. गेल्या पांच वर्षांपासून त्यांचा मुळींच पत्ता नाहीं. त्यांना बेपत्ता करण्यांत कोणाचें अंग आहे हें जरी उघडकीस आलेलें नसलें, तरी त्यांची धर्मपत्नी आपल्या एका बालकास घेऊन पतिशोधार्थ परदेशांत गेलेली आहे.

द्वितीय पुत्ररत्न प्रो. **इंद्र** हे गुरुकुलाचे स्नातक व विद्यावाचस्पति आहेत. १९१५ मध्यें विद्यावती नामक एका ब्राह्मणकुलोत्पन्न कुमारिकेशीं यांचा विवाह झाला. यांनीं **सत्यवादी** या वर्तमानपत्राच्या संपादकाचें काम केलें असून सांप्रत ते अर्जुन नामक साप्ताहिक चालवीत आहेत. हे उत्तम लेखक व प्रभावशील वक्ते असून पंजाब प्रांतिक कांग्रेस कमेटीचे ते सेक्रेटरी आहेत. आर्यसमाज, हिंदुसंघटन व शुद्धीचळवळींत ते यथाशक्ति भाग घेत आहेत. त्यांनीं **आर्य समाजाचा इतिहास, उपनिषदांची भूमिका, बोनापार्ट बिस्मार्क, गॅरिबॉल्डी** यांचीं जीवनचरित्रें, व संस्कृत भाषेची आलोचना हा ग्रंथ आणि ‘सुवर्ण देशाचा उद्धार’ नामक नाटक इत्यादि ग्रंथ लिहून साहित्यसेवा केली आहे. यांच्या कार्यव्यापृतत्वाकडे पाहून

**पुत्र व्हावा ऐसा गुंडा। ज्याचा तिन्ही लोकीं झेंडा।**

या म्हणीप्रमाणें आपल्या पूज्य पित्याच्या कीर्तीमध्यें हे भर घालतील असें वाटतें. कन्यापुत्र व त्यांचें संबंधी आर्यसमाजाचें व देशाचें जें कार्य करीत आहेत त्यावरून त्यांची शिक्षणात्मक योग्यता कळून येते व **आपणासारिखे करीती तात्काळ।** हा त्यांचा गुणही निदर्शनास येतो.

आरंभीं त्यांनीं सद्धर्मप्रचारक वर्तमान पत्र काढून साहित्य सेवा सुरू केली. पंजाबांत हिन्दीपेक्षां उर्दू समजणारे लोक अधिक होते, तरी पण स्वामींनीं हिन्दीमध्यें पत्र चालविण्यास सुरवात केली, व झीज सोसूनही वर्तमानपत्रद्वारें धर्मप्रसाराचें पवित्र कार्य चालविलें. यानंतर त्यांनीं संन्यासग्रहण केल्यानंतर ‘श्रद्धा’ नामक हिन्दी साप्ताहिक सुरू केलें व पुढें थोडे दिवसांनीं ‘लिबरेटर’ नामक एक इंग्रजी वर्तमानपत्र

सुरू केलें. याशिवाय त्यांनीं **'उपदेश मंजिरी, मुंबई आमोद,** पं. लेख-**रामजींचें जीवनचरित्र, 'कल्याणमार्गका पथिक'** नामक आत्मचरित्र व **आर्यसमाज आणि त्याचे शत्रु** व अन्य १०|१२ लहान लहान पुस्तकें लिहिलीं. **'हिंदुसंघटण'** नामक एक इंग्रजी पुस्तक लिहिलें व History of Assassins म्हणजे हत्यारी लोकांचा इतिहास नामक इंग्रजी पुस्तक प्रकाशित केलें.

त्यांची भाषा सुलभ, संस्कृत शब्दप्रचुर व हृदयस्पर्शी असून त्यांची वर्णनशैली इतकी प्रभावदायक आहे कीं जणूं तो प्रसंगच आपल्या डोळ्यां-देखत घडत आहे असें वाचकांस वाटतें. त्यांच्या लेखणीप्रमाणें त्यांचें भाषण सुलभ, शांतताप्रसारक, हृदयस्पर्शी, वक्तृत्वपूर्ण व ओजस्वी असे. आपल्या अमृत तुल्य वाणीच्या जोरावर ते निरनिराळ्या पक्षांच्या एकी-करणास समर्थ झाले. त्यांनीं लाखो लोकांना शुद्ध केलें त्याचें कारण त्यांचें मधुर प्रभावदायक भाषण हेंच होय.

पारिवारिक कर्तव्यांतून मुक्त झाल्यावर, वानप्रस्थाश्रमीं ईशचिंतनांत व तपश्चर्येंत एक दीड तप व्यतीत केल्यावर आपल्या मागें आपण चालवि-लेल्या संस्था उत्तम रीतीनें चालतील अशी खात्री झाल्यावर महात्मा मुन्शी-रामजींनीं १९१५ सालीं संन्यास घेण्याचें ठरविलें. हरद्वारला त्यांनीं निरनिराळी पंडित मंडळी, विद्वान संन्यासी यांना निमंत्रित केलें व संन्यासाश्रमाचा स्वीकार केला. वाचकांनीं त्यांच्या सांसारिक व वानप्रस्थाश्रमाचा इतिहास वाचला आहे. महात्मा मुन्शीराम यांचें नांव स्वामी श्रद्धानन्द असें ठेवण्यांत आलें. संन्यास घेतल्यानंतर आमचे चरित्र नायक **'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या'** या मतानें नारायण नारायण करीत केवळ आत्मकल्याण करीत न बसतां त्यांनीं लोककल्याणाचें कार्य आरंभलें. हें **विश्वाचे माझें घर । अशी मति जयाची स्थिर ।** या उक्तीप्रमाणें ते विश्व संसार करूं लागले म्हणून प्रियवाचकांनीं **संन्याशाचा संसार** हें चित्र पवित्र अंतःकरणानें पाहावें अशी विनंति आहे.

## हिन्दुमुसलमानांचें ऐक्य.

स्वामी श्रद्धानन्दांनीं संन्यास घेतल्यानंतर हा आपला हा दुसऱ्याचा, हा हिन्दु हा यवन असा आपपर भाव किंवा धर्मभेद ठेवला नाहीं; तर त्यांनीं वसुधैवकुटुंबक वृत्ति ठेवून

**जगाच्या कल्याणा संताच्या विभूती ॥**
**देह कष्टवीती उपकारें ॥**

या उक्तीप्रमाणें लोककल्याणार्थ देह झिजविण्याचें व्रत त्यांनीं आरंभिलें.

**जिहीं आपुल्या सर्व प्रयत्नें । पराचे क्लेश निवारणें ।**

या वचनानुसार परपीडा हरण करण्यांत व परोपकारांत ते आपला समय व्यतीत करूं लागले. जनतेस जनार्दन समजून जनसेवेचा विडा स्वामी श्रद्धानन्दांनीं उचलला. स्वामींच्या कीर्तीचा दुंदुभि जो दशदिशा पसरला याचें कारण त्यांची उदारवृत्ति व जनसेवा हें होय. कोणता पंथभेद, धर्मभेद किंवा आपपर भाव न ठेवतां त्यांनीं मानव समाजाच्या उन्नतीप्रीत्यर्थ प्रयत्न आरंभिले.

रौलॅट ॲक्टाचा निषेध करण्याकरितां ता.३०।४।१९१९ रोजीं दिल्ली शहरांत सर्व हिन्दुमुसलमानांनीं सत्याग्रहाचा दिवस म्हणून पाळला. त्या दिवशीं शहरांत सार्वत्रिक हरताळ पाळला गेला. सत्याग्रह करणाऱ्यांचा मोठा जमाव स्टेशनकडे चालला असतां लष्करी लोकांनीं निरपराधी निःशस्त्र लोकांवर गोळ्या झाडल्या. त्या प्रसंगीं आठ इसम ठार व बारा इसम जखमी झाले. या रक्तपातामुळें लोकांमध्यें मोठी खळबळ उडाली. दिल्ली येथें कांग्रेस-मैदानावर स्वामी श्रद्धानंद यांच्या अध्यक्षतेखालीं १५००० लोकांची जंगी जाहीर सभा झाली. सभेच्या कामास हरकत येण्याचा प्रयत्न झाला, पण सभेचें काम शांततेनें चालेल व लोक माझ्या आज्ञेप्रमाणें वागतील, असें स्वामी श्रद्धानन्दांनीं सांगतांच सभेचें काम सुरू झालें. सभेमध्यें रौलॅट ॲक्टाचा निषेध करण्यांत येऊन स्टेट सेक्रेटरींनीं सदर कायदा करण्यास संमति देऊं नये असा ठराव करण्यांत आला. सभेचें काम शांततेनें संपल्यावर लोक घरोघर जात असतां स्वामी श्रद्धानन्दजींवर जो प्रसंग गुदरला व त्यांत त्यांनीं जें धैर्य दाखविलें त्याची हकीगत त्यांच्याच शब्दांनीं देणें बरें.

"क्लॉक टॉवरजवळ आह्मी आलों असतां बाजूस सरलेल्या गुरख्यापैकीं एकानें हवेंत बंदुकीचा बार उडविल्यानें जनतेंत चलबिचल झाली. लोकांना स्वस्थ उभे राहण्यास सांगून मी एकटाच गुरख्याकडे गेलों व 'निरपराधी लोकांवर गोळ्या कां झाडतां' असें मी त्यांना विचारतांच दोन गुरखे आपल्या रायफली मजवर रोखून म्हणाले, **'तुमको छेद देंगे' 'मै खडा हूं गोली चलाव'** असें मी म्हणतांच आठ दहा रायफली मजवर रोखण्यांत आल्या. तेव्हां **'तुम मत मरो हम मर जावंगे'** असें म्हणत लोक पुढें घुसूं लागले. इतक्यांत एक युरोपियन अधिकारी तेथें आल्यामुळें रायफली परत घेतल्या गेल्या. आम्ही पुढें चाललों. मशीनगनचें भेडसावणें चालूच होतें, पण कोणी गांगरलें नाहीं. पोलिसांसंबंधानें आम्हांला द्वेष वाटला नाहीं. मात्र लोकांचा या अत्याचारामुळें सरकारच्या न्यायबुद्धीवरील विश्वास उडाला.

**कृच्छ्रेऽपि न चलत्येव धीराणां निश्चलं मनः ।**

पर्वत देखील प्रलयवायूमुळें चलायमान होतात पण धीर मनुष्यांचें अन्तः-करण चलन पावत नाहीं. या प्रसंगीं स्वामींनीं जें धैर्य दाखविलें त्यामुळें त्यांची दशदिशा कीर्ति झाली. दिल्लीच्या लहान थोर हिन्दुमुसलमानांनीं स्वामींचा अत्यंत सन्मान केला. अत्याचारास बळी पडलेल्या प्रेतांची हिन्दुमुसलमानांनीं मिरवणूक काढली व एकमेकांच्या प्रेतास हिन्दुमुसलमानांनीं खांदे दिले. स्वामी श्रद्धानन्दजींनीं सत्याग्रहाचा अशा रीतीनें ओनामा सुरू केला.

दिल्लीच्या जुम्मा मशिदीमध्यें हिन्दूंना हजर राहण्यास परवानगी मिळून पीठावर उभें राहून स्वामी श्रद्धानन्दजींना व्याख्यान देण्याचा मुसलमान लोकांनीं आग्रह केला. असा मान मुसलमान लोकांतही फार थोड्यांना मिळतो. मग हिन्दूला अद्यापपर्यंत मिळाला नव्हता यांत नवल नाहीं. पण स्वामींच्या अलौकिक धैर्यामुळें स्वामींना हा **न भूतो न भविष्यति** असा असामान्य मान मुसलमान समाजानें देऊन त्यांचें भाषण ऐकलें. रौलॅट ॲक्टाचा निषेध करण्यांत आला. लखनौला कांग्रेसमध्यें उभारलेल्या हिन्दु मुसलमानांच्या ऐक्यमंदिरावर दिल्लीच्या या सभेनें कळस चढावला गेला. अकबराला अशक्य असलेलें हिन्दुमुसलमानांचें ऐक्य स्वामींनीं घडवून आणिलें.

ग्रं. क्र.
ठा. को.

# श्रद्धाञ्जलि २३ वी.

**पहिलें हरिकथा निरूपण । दुसरें तें राजकारण ।**

**कालो वा कारणं राज्ञो राजा वा कालकारणम् ।**
**इति ते संशयो मा भूद्राजा कालस्य कारणम् ॥**

हरिकथानिरूपणाच्या कार्याबरोबर परोपकाराचें, जनसेवेचें कार्य करतां करतां स्वामींनीं राजकारणाच्या रणांगणामध्यें प्रवेश केला. प्रथम एक कार्य हातीं घ्यावयाचें व त्यांत पूर्णत्वानें यश मिळाल्यावर दुसऱ्या कार्यास हात घालावयाचा असा स्वामींचा पहिल्यापासून बाणा असल्यामुळें त्यांनीं आतांपर्यंत प्रत्यक्ष राजकारणांत जरी विशेषपणानें भाग घेतला नव्हता तरी राजकारणाची स्वामींनीं कधींच उपेक्षा केलेली नव्हती. सन १८८८ सालीं राष्ट्रीय सभेचें अधिवेशन झालें त्यांत स्वामींनीं भाग घेतला होता. यापुढें जरी त्यांना आपल्या हातीं असलेल्या धर्मकारणामुळें राजकारणांत प्रत्यक्ष भाग घेतां आला नाहीं, तरी वर्तमानपत्रद्वारें ते राजकारणाचा प्रगतिपर इतिहास वाचीत असत. पण संन्यास घेतल्यावर सन १९१८ सालीं त्यांनीं राजकारणांत प्रत्यक्ष भाग घेण्यास सुरवात केली.

लखनौला राष्ट्रीय सभेचें अधिवेशन झालें असतां तेथें अस्पृश्योद्धाराचें कार्य राष्ट्रीय सभेनें हातीं घ्यावें म्हणून स्वामींनीं प्रयत्न केला; परंतु कागदी घोडे ठरावरूपानें नाचविण्यापलीकडे या सभेच्या हातून विशेष कार्य झालें नाहीं. तथापि आज नाहीं उद्यां तरी लोक हा महत्त्वाचा प्रश्न हातीं घेतील या हेतूनें स्वामींनीं राष्ट्रीय सभेंतून या विषयाला योग्य चालना देण्याचें ठरविलें.

सन १९१९ सालीं अमृतसरला कांग्रेस भरणार होती, परंतु मॉर्शल लॉमुळें प्रेतवत् झालेल्या पंजाब प्रांतांतील अमृतसर नगरीच्या लोकांनीं कांग्रेस या ठिकाणीं भरूं शकत नाहीं असा ठराव केला. पं. मदनमोहन मालवीय व स्वामी श्रद्धानन्द यांनीं तेथें जाऊन लोकांना कांग्रेस भरविण्यासाठीं उत्साहित केलें. जालियनवाला बागेंतील अमानुष व हृदयद्रावक अत्याचारांमुळें अमृतसरचे नागरिक इतके गर्भगळित झाले व किंकर्तव्यमूढ बनले

होते कीं थोड्या दिवसांत कांग्रेसच्या बंदोबस्ताचें कठिण कार्य शिरावर घेण्यास एकही मायेचा पूत पुढें येईना. अशा स्थितींत स्वामी श्रद्धानंदांनीं हें अत्यंत दुर्घट कार्य आपल्या शिरावर घेतलें व स्वागतकारिणी सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारलें. त्यांच्या अविरत श्रमामुळें अमृतसरची कांग्रेस फारच यशस्वी रीतीनें पार पडली.

स्वामी श्रद्धानंदांनीं जहाल, मवाळ, नरम, गरम, राष्ट्रीय, ब्राह्मणेतर वगैरे सर्व पक्षांच्या लोकांनीं कांग्रेसच्या पर्वणींत भाग घ्यावा असें विनंति-पत्रक काढल्यामुळें या राष्ट्रीय सभेस सर्व पक्षाचे लोक हजर राहिले होते. दिल्लीच्या जुम्मामशीदींतील अपूर्व प्रसंगापासून ते हिन्दु मुसलमानांचे अनभिषिक्त राजे बनले होते. स्वामींच्या शब्दास शिरोधार्य मानून सर्व पक्षांच्या हिन्दु मुसलमानांनीं राष्ट्रीय सभेंत मोठ्या उत्साहानें भाग घेतला; त्यामुळें कांग्रेसला विलक्षण अपूर्वता आली.

### स्वागताध्यक्ष स्वामी श्रद्धानन्द यांचें भाषण।

ॐ

**ॐ त्वंहि नः पितावसो त्वं माता शतक्रतो बभूविथ। अथा ते सुम्नीमहे ॥**

या मंत्रानें परमेश्वराची प्रार्थना करून स्वामी श्रद्धानंद म्हणाले, " भारतमातेच्या कन्यापुत्रांनों, स्वागतसभेच्या वतीनें मी आपलें अन्तःकरणपूर्वक स्वागत करतों. गेल्या एप्रिलमध्यें येथें घडलेल्या अनन्वित प्रकारामुळें येथील जनता किंकर्तव्यमूढ झाली होती. शिस्तीच्या नांवाखालीं प्रलय व शांततेच्या नांवाखालीं अत्याचाराचें साम्राज्य पंजाब प्रांतांत माजून राहिलें होतें. मॉर्शल लॉमुळें पंजाबांतील बाल वृद्ध तरुण नरनारी या सर्वांच्या हृदयांनीं ठाव सोडला होता. वैशाखांतील संक्रांतीच्या पवित्र दिवशीं पंजाबची भूमि आपल्या लेकरांच्या रक्तानें लाल झालेली पाहून सर्वांचीं अन्तःकरणें दुःखानें होरपळून गेलेलीं होतीं. त्या दिवशीं पंजाबांत शांततेचा प्रसार झाला खरा ! परंतु ही शांतता स्मशानांतील किंवा कबरस्थानांतील शांततेप्रमाणें भयंकर होती. मार्शल लॉच्या विषप्रयोगानें मूर्छित झालेल्या या नगरीमध्यें पूजनीय मदनमोहन मालवीय व पं. मोतीलाल

नेहरू यांनीं प्रवेश केल्यापासून या नगरीमध्यें नवजीवनाचा संचार होत चालला; व ही कांग्रेस पूर्वीं ठरल्याप्रमाणें येथेंच भरविली गेली, हा त्या नव-चैतन्याचा पहिला शुभ परिणाम होय.

या महासभेच्या शृंगारलेल्या व्यासपीठावरून एक संन्यासी प्रतिनिधींचें स्वागत करीत आहे हा महासभेच्या इतिहासांतील पहिलाच प्रसंग आहे. स्वागताध्यक्षपद स्वीकारतेसमयीं संन्याशानें राजकीय चळवळींत भाग घेणें योग्य आहे काय असा प्रश्न मला विचारण्यांत आला. त्याला माझें असें सरळ उत्तर आहे कीं, ज्या दिवशीं मी संन्यासाश्रमाचा स्वीकार केला, त्या दिवसापासून हें **सर्व जग माझ्या कुटुंबाचा परिवार** आहे, ही भावना मीं धारण केली. जगांतील सर्व वस्तुमात्रांकडे मी **समदृष्टीनें** पाहूं लागलों, आणि लोकलज्जा सोडून लोककल्याणांत दत्तचित्त होण्याचें व्रत मीं धारण केलें. भारतमातेचें मुख उज्ज्वल राखण्याकरतां फांशीची किंवा जन्मठेपीची शिक्षा तुच्छ मानणाऱ्या व कारागृहाला काशी किंवा मक्का या पवित्र स्थानांचें स्वरूप देणाऱ्या हरकिसनलाल, रामभुजदत्त, किचलु, सत्यपाल प्रभृति नररत्नांनीं मला स्वागतकारिणी सभेचा अध्यक्ष होण्याची आज्ञा केली. या नररत्नांच्या धर्मपत्नींनीं कारागृहांतील आपल्या पतींचे आत्मे कांग्रेसचा हा महोत्सव बंद न पडेल तर शांत होतील अशी इच्छा प्रकट करून मजसारख्या भिक्षूजवळ असलेल्या कार्याची उलट भिक्षा मागितली असतां या मातृशक्तींसमोर मस्तक नमवणें मला भाग पडलें.

**कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेच्छतं समाः ।**

अशी वेदाची आज्ञा असल्यामुळें संन्यास घेतला तरी केवळ कर्तव्य म्हणून मीं हें कार्य अंगीकारिलें आहे. सत्याच्या संरक्षणाकरितां निर्भयपणें व दृढनिश्चयानें झगडण्याचा समय आतां आला आहे. **सत्यपालन हेंच संन्याशी सांप्रदायाचें मुख्य कर्तव्य होय**. या संन्याशानें **सर्व जगाची सेवा करण्याचा विडा** उचलला आहे. कोणत्याही धर्मग्रंथाचा, जातीचा किंवा पन्थाचा या आश्रमाशीं संबंध नाहीं, या विचारानें प्रेरित होऊन फारसी कवीच्या वचनाप्रमाणें “ **मी न हिन्दु, न ईसाई, न मुसलमान न यहुदी आहे.** तसाच मी जहाल, मवाळ किंवा स्वराजिस्टही नाहीं. ”

कोणत्याही एका पक्षांत सामील होण्याचें किंवा त्याचें समर्थन करण्याचें माझें कर्तव्य नाहीं. श्रद्धेमध्येंच माझा आनंद सांठविलेला असल्यामुळें भारतमातेच्या संतानाबरोबर माझेंही भविष्य उज्ज्वल होईल अशी माझी मनोदेवता सांगत आहे.

या नगरीस मॉर्शल लॉनें बलहीन, धनहीन व उत्साहहीन करून सोडलें आहे. पण या कायद्याला मातृभूमीवरील प्रेम दडपून टाकतां आलें नाहीं. भारतसंतानांच्या जन्मभूमीवरील प्रेमाच्या भावनेची इतकी वाढ झाली आहे कीं, मॉर्शल लॉचे संचालक सर मायकेल ओडवायर, व त्यांचे सहकारी जनरल डायर यांना आपण अन्तःकरणापासून धन्यवाद दिले पाहिजेत. मातृप्रेमाच्या रंगांत हिन्दी प्रजेला दंग करून सोडणारे जनरल डायर यांनीं पंजाबला मॉर्शल लॉचें असें बाळकडु पाजलें आहे कीं यामुळें पंजाबांतील सार्वजनिक चारित्र्याचें आयुष्य शंभर वर्षांनीं वाढलें असून राजकारणांत पुढें गेलेल्या अन्यप्रांतीय बंधूंबरोबर पंजाब खांद्याला खांदा लावून प्रतिपक्ष्याबरोबर झगडण्यास तयार झाला आहे.

समाजरूप विण्याच्या निरनिराळ्या सांप्रदायिक तारांतून एक मधुरध्वनि निघत असतां तो राजकीय बाबतींत बेसुर बनविणें योग्य नाहीं. अशा प्रसंगीं सर्वांनीं पक्षभेद विसरून एक झालें पाहिजे. मातृभूमीचें स्वातंत्र्य संपादून तिचा दर्जा जगांत वाढविणें हेंच सर्वांचें ध्येय असलें पाहिजे. आपले दोष कळत नाहींत म्हणून सर्वांकडे समदृष्टीनें पहाणारा संन्यासी या नात्यानें दुही घातक व कमजोर करणारी आहे असा मी इशारा देतों.

या मतभेदाचें कारण या मिळालेल्या सुधारणा असें म्हणतात. नरम लोकांच्या शहाणपणामुळें अगर गरम लोकांना जनतेचा पाठिंबा मिळाल्यामुळें या सुधारणा आपणांस मिळाल्या आहेत. हे दोन्ही पक्ष यांचा स्वीकार करणार असल्यामुळें क्षुल्लक मतभेद व्यर्थ होत. सुधारणा भल्या बुऱ्या, पूर्ण अपूर्ण कशाही असल्या तरी त्यांची योजना होऊन चुकली आहे. या बाबतींत नरम पक्षांत मतभेद नाहींत. मी गरम पक्षास असें विचारतों कीं, सर्व एक होऊन या योजनेची उपेक्षा करण्यास तयार असाल तर आम्ही बहिष्कार घालूं या म्हणण्यांत अर्थ आहे; पण हें हल्लीं असंभवनीय आहे.

 ग्रा. क्र. ६६१४९

प्रत्यक्ष लोकमान्य टिळकांनीं ' जें मिळालें त्याचा स्वीकार करा, व बाकी हक्कासाठीं चळवळ चालूं ठेवा,' अशी या बाबतींत सोय करून ठेविलेली आहे. हिन्दुस्थानांत राष्ट्रीय भावनांचा प्रसार करणाऱ्या पुरुषांमध्यें लोकमान्य टिळकांची प्रमुखत्वानें गणना होते. आपल्या वृद्ध सेनापतीनें घालून दिलेल्या अनुशासनास मान देऊन शिर नमविण्यास आपल्या राष्ट्रीय सेनेंतील सैनिक तयार नाहींत काय ? या संन्याशाचें आपणांस ऐकावयाचें असेल तर मतभेदाचा झगडा क्षणांत दूर करून एकमेकांच्या हातांत हात घालून मिळालेल्या हक्कांचें रक्षण करा.

ब्रिटिश समाजांत आमचे राजकीय हक्कच नव्हे तर मानवी जन्मसिद्ध हक्कही हिरावून घेण्याच्या विचाराचे अनेक लोक आहेत. अशा तामसी व अयोग्य लोकांच्या वर्तनाकडे पाहून त्यांच्यांतलि सात्त्विक व धर्मभीरु लोकांच्या वर्तनाकडे डोळेझांक करून चालणार नाहीं. राजकीय हक्काकरतां ओरडणारे कितीसे लोक आपल्या साडेसहा कोटी अस्पृश्यबंधूंना माणुसकीचे हक्क देण्यास व दया दाखविण्यास तयार आहेत ? व ज्या ब्रिटिश सत्तेच्या कुशीमध्यें बेझंट, हार्निमन, अँड्रयूज प्रभृति महात्मे झाले त्याच कुशींत ओडवायरडायर जरी झाले असले तरी ते आमचे बंधु आहेत. त्यांच्यावर क्रोध करून आपणांस जय येईल काय ? शत्रूवर पूर्ण जय मिळविण्यास **अक्रोधेन जयेत् क्रोधमसाधुं साधुना जयेत्।** हाच एक उपाय आहे.

स्वराज्याचे हक्क संपादन करणारे योग्य नागरिक तयार करण्याकरितां राष्ट्रीय शिक्षणाचें कार्य करावें, व साडेसहा कोटी अस्पृश्यांना स्पृश्य करावें अशी विनंति करून हिन्दी जनतेंत प्राचीन आर्यसंस्कृतीचा योग्य अभिमान उत्पन्न होऊन मातृभूमीच्या कल्याणाकरतां सर्वांना बुद्धि देण्याबद्दल परमेश्वराची प्रार्थना करून स्वामींनीं आपलें भाषण संपविलें.

स्वामींच्या या संक्षिप्त भाषणावरून स्वामींचीं राजकीय मतें कळण्यासारखीं आहेत. मातृभूमीचें स्वातंत्र्य संपादन करण्याकरितां पक्षभेद व धर्मभेद सोडून एकमेकांच्या हातांत हात घालून प्रतिपक्ष्याशीं झगडलें पाहिजे हें स्वामींचें अमोल वाक्य त्यांच्या अंतःकरणांत ऐक्य साधण्याविषयीं किती तळमळ होती हें दाखवितें. संन्याशांनीं राजकारणांत कां भाग घेतला

पाहिजे याचें स्वामींनीं दिलेलें उत्तर सर्व संन्याशांना आदर्शभूत असें आहे. हिन्दुमुसलमानांचें ऐक्य साधण्यासाठीं त्यांनीं जे परिश्रम केले व त्यांत त्यांना जें यश आलें त्यांचें कारण त्यांची वसुधैव कुटुंबक वृत्ति होती. राष्ट्रकारणासाठीं हा हिन्दु, हा मुसलमान, हा जहाल, हा मवाळ हे क्षुल्लक मत-भेद दाखविणें अनुदारपणाचें असून एकमेकांचे मतभेद थोडे फार सहन करून लो. टिळकांचें अनुशासन मानण्यास तयार होण्याविषयीं त्यांनीं जी विनंति केली त्यावरून स्वामींची टिळकभक्ति व परमतसाहिष्णुत्व आणि उदारता हे गुण प्रामुख्यानें निदर्शनास येतात व लोकलज्जा टाकून लोक कल्याण साधण्याचा त्यांचा उच्च हेतु समजून येतो.

स्वामींनीं हिंदु मुसलमानांच्या ऐक्यासाठीं जरी इतकी खटपट केली तरी हिन्दुत्व गमावून स्वराज्य मिळाविणें नरकाच्या समान आहे असें ते समजत होते. ज्या स्वराज्यामध्यें हिन्दु धर्माचा प्रभाव वाढून हिन्दु धर्म मानणारांची संख्या वाढेल असेंच स्वराज्य त्यांना हवें होतें. हिन्दु नवयुवकांच्या पुढें स्वरा-ज्याचा हाच आदर्श ठेवला पाहिजे.

महात्मा गांधींच्या 'अत्याचाराचा निषेध करणाऱ्या' पांचव्या ठरावास अनुमोदन देतांना स्वामी म्हणाले, "हिन्दु जनतेनें आपल्या संस्कृतीचा अभि-मान धरला पाहिजे व पाश्चात्यांचें अंधानुकरण करूं नये. आपण द्वेषाचा प्रतिकार प्रेमानें केला पाहिजे; असत्यास सत्यानें जिंकलें पाहिजे; व अत्या-चाराला अनत्याचारानें तोंड दिलें पाहिजे." स्वामींच्या या भाषणावरून अनत्याचारी चळवळीचे ते किती चाहाते होते हें समजेल.

—o—

# श्रद्धाञ्जलि २४ वी.

## असहकारिता व कारागृहवास !

**अयं निजः परो वेति गणना लघुचेतसाम् ॥**
**उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम् ॥**

सत्यपरिपालन हें संन्यासी सांप्रदायाचें मुख्य कर्तव्य असल्यामुळें

स्वामी श्रद्धानन्दजींनीं महात्मागांधींच्या सत्याग्रहामध्यें व असहकारितेच्या कार्यक्रमामध्यें मनोभावें भाग घेतला. रौलॅटअक्टाच्या निषेधार्थ स्वामींनीं दिल्लीमध्यें सत्याग्रहाचा प्रथम ओनामा सुरूं केला. व आपल्या अतुल धैर्यानें त्यांत त्यांनीं अपूर्व यश मिळविलें. राष्ट्रीय शिक्षणाचा उपक्रम त्यांनीं महात्मा गांधींच्या पूर्वी १९०२सालीं गुरुकुल विश्वविद्यालयाची स्थापना करून सुरूं केला.

दिल्ली येथें २४।११।१९ रोजीं महात्मा गांधींच्या अध्यक्षतेखालीं हिन्दु-मुसलमानांची संयुक्त सभा झाली असतां सरकाराशीं असहकारिता करणें व ब्रिटिश मालावर बहिष्कार घालण्याचा ठराव स्वामीजींच्या प्रयत्नानें महात्मा गांधी विरुद्ध असतांही पास झाले.

कोर्टावर व वकीलीवर बहिष्कार टाकण्याच्या ठरावावर महात्मा गांधींनीं विचार करण्यापूर्वी स्वामी श्रद्धानन्दांनीं १८९८च्या सुमारास कोर्टावर बहिष्कार घालून वकीली सोडली होती व तेव्हां पासून ते देशोद्धाराच्या कार्यास लागले होते. त्यांनीं स्थापन केलेल्या गुरुकुल विश्वविद्यालयास एक लाख रुपयांची सरकारानें देऊं केलेली वार्षिक मदत न स्वीकारतां त्यांनीं आपलें विद्यालय राष्ट्रीय धर्तीवर स्वतंत्रपणें चालविलें; व हिन्दीभाषेंतून विद्यालयामध्यें शिक्षण देण्याचा उपक्रम सुरूं केला.

महात्मा गांधींचे अस्पृश्योद्धार, असहकारिता, राष्ट्रीय शिक्षण, सत्याग्रह, स्वदेशी इत्यादि विषय लोकांना जरी नवीन होते तरी त्या विचारांचे आद्य प्रणेते महर्षि दयानन्द सरस्वती हे होत. ते स्वामी श्रद्धानन्दांचे गुरू असल्यामुळें आपल्या गुरूच्या पावलावर पावलें टाकून स्वामी श्रद्धानन्दजींनीं देशोन्नतीचा मार्ग आक्रमिला होता व महात्मा गांधींनीं आपल्या राजकीय तत्त्वांचा उच्चार करण्यापूर्वी स्वामींनीं तीं तत्त्वें आचरणांत आणून व्यवहार्य करून दाखविलीं होतीं.

असहकारितेच्या चळवळींत स्वामींनीं यथाशक्ति भाग घेतला, पण ती चळवळ जोरांत आली असतां स्वामींना आजारानें पछाडल्यामुळें त्या चळवळींत मूर्तस्वरूपानें भाग घेणें अशक्य झाल्यामुळें स्वामींना अत्यंत वाईट वाटलें. आपल्या रुग्णशय्येवरून स्वामींनीं आर्यमातेच्या सुपुत्रांना १९२१च्या जानेवारी महिन्यांत पुढील संदेश पाठविला.

" माझ्या मनांत सर्वत्र जोराची चळवळ करण्याचा विचार होता, परंतु माझा गर्व परिहार करण्याकरितां ईश्वरानें मला बिछान्यावर खिळून टाकलें आहे. निधड्या छातीचे चित्तरंजन दास हे युक्तिबाज बंगाली तरुणांच्या पलटणीचें श्रद्धापूर्वक नेतृत्व पत्करीत आहेत; भावनाप्रधान दे. भ. लालाजी पंजाबी तरुणांचा पुढाकार घेत आहेत; निःस्वार्थी व समंजस मोतिलाल नेहरू हे सर्वत्र समतोलपणा राखीत आहेत. दुर्जय अलीबंधु खिलाफतीच्या एकनिष्ठ अनुयायांना मार्गदर्शक होत आहेत, भविष्य काळावर अचलश्रद्धा ठेवून दाक्षिणात्यांचे पुढारी कस्तुरीरंग आयंगार व दे. भ. केळकर हे ती बाजू सांभाळीत असतां चळवळीचें मूर्त कार्य मंदावण्याची भीति नाहीं. अशा परिस्थितींत चळवळीला अमूर्त साहाय्य करण्याकरतां दररोज घटका सव्वा घटका माझी सर्व इच्छाशक्ति एकवटून डिसेंबर १९२१ च्या आंत भरतभूमीस स्वराज्य मिळावें अशी मी परमेश्वराची प्रार्थना करीत असतों. इच्छाशक्तीमध्यें विलक्षण सामर्थ्य असल्यामुळें माझी अशी विनंति आहे कीं, आर्यमातेच्या सर्व आबालवृद्ध स्त्रीपुरुषांनीं दररोज सकाळीं ७ते८च्या दरम्यान निदान १०मिनिटें तरी एकाग्रचित्तानें आपली सर्व इच्छाशक्ति एकवटून परमेश्वराची अशीच प्रार्थना करीत जावी. तीस कोटी भक्तियुक्त अन्तःकरणांनीं एकाग्रमनानें केलेली संघटित प्रार्थना निष्फल होईल काय? भूमातेच्या स्थंडिलावर याहून अधिक बलिदान करण्याचें कारण पडणार नाहीं. पण **जगांत सैतानांचा भरपूर भरणा असल्यामुळें अधिक स्वार्थत्याग करावा लागला तरी त्याला आमची तयारी आहे.** आपली प्रवृत्ति अत्याचाराकडे वळूं नये अशी तुम्ही नित्य प्रार्थना करा. आपणांला खऱ्या स्वातंत्र्याची दिशा दाखवून देण्याला भारत मातेनें आपली सर्व पुण्याइ खर्चून महात्मा गांधी निर्माण केला आहे. या महात्म्यावर जर तुम्ही श्रद्धा ठेवाल तर तो त्या श्रद्धेचा कधींही दुरुपयोग करणार नाहीं. अशा महात्म्याच्या प्रबळ प्रेरणाशक्तीच्या कक्षेबाहेर चुकून सुद्धां जाऊं नका."

रुग्णशय्येवरून स्वामींनीं जनतेस केलेल्या या विनंतीवरून स्वामींचा परमेश्वरावर व महात्मा गांधींच्या कार्यक्रमावर किती अढळ विश्वास होता, व महात्मा गांधीविषयीं त्यांच्या मनोमंदिरांत किती आदर होता हें दिसून

येते. देशांतील निरनिराळ्या पुढाऱ्यांविषयीं त्यांच्या अन्तःकरणांत किती अत्यादर होता, व स्वराज्यप्राप्तीची त्यांना कशी तळमळ व उत्कट इच्छा होती हेंही सहज समजून येतें.

हिन्दु–मुसलमानांचें ऐक्य साधण्याकरितां उदारचरित स्वामी श्रद्धानंदांनीं अटोकाट प्रयत्न केले. मुसलमानांच्या खिलापतीच्या चळवळींतही त्यांनीं उत्साहानें भाग घेतला. व मी " न हिन्दुर्न यवन " आहे हा आपला बोल आचरणानें खरा करून दाखविला.

**जें का रंजलें गांजलें। त्यासि म्हणे जो आपुलें ॥**

अशी त्यांची वृत्ति होती. रंजल्या गांजल्या दीनांचें हा हिन्दु हा मुसलमान असा क्षुल्लक भेदाभेद न ठेवतां रक्षण करण्याकरतां स्वामी सदा तत्पर असत.

अकाली शीख लोकांवर गुरुकाबाग प्रकरणामुळें जो अत्याचार होत होता त्याच्या निराकरणार्थ स्वामी श्रद्धानंदजी धांवून गेले. शेंकडो अकालींवर जुलूम होत होता, त्यांना सरकार कारागृहांत टाकीत होते. याचा स्वामींनीं आपल्या भाषणांत निषेध केल्यावर व त्यांना सत्याग्रहाकरितां उत्साहित केल्यावरून सरकारानें त्यांच्यावर खटला सुरू केला असतां स्वामींनीं कोर्टापुढें दिलेला तोंडी जबाब त्यांच्या तेजास्वितेस, निःस्पृहपणास व निर्भयवृत्तीस साजेसाच होता. ते आपल्या जबानींत म्हणाले, " स्वधर्म व सत्ता यासाठीं छळ सोसणारे वीर जेथें भेटतील त्या ठिकाणीं जाऊन त्यांस शांतीचा व अहिंसेचा उपदेश करणें हें माझें पवित्र कर्तव्य असून नोकरशाहीच्या कोर्टांत स्वतःचा बचाव करणें हें मी पातक समजतों. हे परमेश्वरा, नोकरशाहीस सन्मार्गानें चालण्याची बुद्धि दे. "

नोकरशाहीस सुबुद्धि देण्याविषयीं परमेश्वराची प्रार्थना करणाऱ्या स्वामींच्या अन्तःकरणामध्यें आपल्या प्रतिस्पर्ध्यांविषयीं व शत्रूविषयींही किती प्रेमभाव होता हें व वसुधैवकुटुंबक वृत्ति त्यांच्या अंगीं कशी पूर्णपणें भिनली होती हें समजून येतें.

रौलॅटबिलाच्या हरताळाच्या वेळीं दिल्लीमधील अंगावर धांवून येणाऱ्या लष्करी शिपायापुढें छाती सरसावणारे धीरोदात्त स्वामी श्रद्धानंद तुरुंगवासास भिऊन कर्तव्यच्युत होतील अशी सरकारची कल्पना होती

काय ? 'निःस्पृहस्य तृणं जगत्' हा त्यांचा बाणा होता. मरणास कस्पटासमान समजणारे, व कारागृहास काशी समजणारे ते शूर संन्यासी होते. नोकरशाहीनें दिलेली सहा महिन्यांची शिक्षा भोगण्यास स्वामीजी आनंदानें तयार झाले. जणूं काय स्वामींच्या पवित्र देहस्पर्शानें पुनीत होण्याकरतां कारागृह उत्कंठित झालेलें होतें !

—o—

# श्रद्धाञ्जलि २५ वी.

## अस्पृश्योद्धार.

**विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि ।**
**शुनि चैव श्वपाकेच पण्डिताः समदर्शिनः ॥**

विद्याविनयसंपन्न ब्राह्मण किंवा हत्ती, कुत्रीं किंवा चांडाळ ज्याला समान असतात अशा समदर्शी पंडितांमध्यें स्वामी श्रद्धानंदांची गणना केली पाहिजे. स्वामी बोलघेवडे सुधारक नव्हते. "स्वराज्यप्राप्तीकरतां अस्पृश्योद्धार करणें अत्यंत इष्ट आहे" असें व्यासपीठावरून उच्चरवानें ओरडणारे ते शब्दशूर महात्मे नव्हते. मनांत एक, वदनांत दुसरें, आणि जनांत तिसरें अशा तिरंगी वृत्तीचा त्यांनीं कधींच अंगीकार केला नाहीं. अस्पृश्योद्धाराची घोषणा स्वामी दयानंद यांनीं करून आपल्यांचें आर्यसमाजातर्फें पतितपावनाचें कार्य त्यांनीं चालविलें व तेंच कार्य आर्यसमाजाचे धुरंधर नेते दे० भ० लजपतराय यांनीं अत्यंत स्वार्थत्यागानें व धडाडीनें पुढें चालाविलें. आपल्या वकीलीच्या धंद्यांत मिळालेला बहुतेक सर्व पैसा दे० भ० लजपतरायांनीं या कार्यांत खर्च केला. त्याच अस्पृश्योद्धाराच्या मंदिरावर स्वामी श्रद्धानन्दांनीं आपल्या भगीरथ परिश्रमांनीं कळस चढविला. अस्पृश्योद्धारासंबंधानें स्वामींचें मत त्यांच्याच शब्दांत पुढें दिलें आहे.

" सर्वांगीण उन्नतीच्या कार्यामध्यें येणारी अस्पृश्यता ही एक मोठी धोंड आहे. हिन्दु लोकांच्या वैभवावर व कीर्तीवर अस्पृश्यता हा एक

मोठा कलंक आहे. अस्पृश्यतेच्या पापाचीं दुःखद फळें हिन्दुसमाज सध्यां भोगीत आहे. ज्या ज्या वेळीं राजकीय पुढारी स्वराज्यप्राप्तीप्रीत्यर्थ युक्ति प्रयुक्ति पुढें मांडतात, त्या त्या वेळीं अस्पृश्यतेच्या पापाचे पर्वत त्यांच्यापुढें उभे राहिल्यामुळें त्यांचें मुख बंद होतें. आपल्या रक्ताच्या व धर्माच्या ⅓ अस्पृश्य बंधूंना गुलामगिरींत टाकून त्यांना आपल्या पायाखालीं तुडविणाऱ्या लोकांना परकीयांनीं केलेल्या जुलमाची तक्रार करण्याचा मुळींच अधिकार पोंचत नाहीं. अस्पृश्य लोक कांहीं नरकांतून वर आलेले नाहींत किंवा स्पृश्य लोक कांहीं स्वर्गांतून अवतरलेले नाहींत ! भंगी, महार, मांग यांचीं गोत्रें त्रैवार्णिकांच्या गोत्राशीं पूर्णपणें जुळतात, व यावरून ब्राह्मणक्षत्रियादि चातुर्वर्ण्याच्या समाजवृक्षापासूनच त्यांची उत्पत्ति झाली असली पाहिजे. त्यांच्या नैतिक अधःपतनामुळें त्यांचा सामाजिक अधः-पात झालेला आहे. या लोकांनीं आपली राहणी व नीतिमत्ता सुधारल्यास त्यांना त्यांची उच्चावस्था प्राप्त होण्यास प्रत्यवाय येतां कामां नये. चैतन्य, कबीर नानकादि संतांनीं या बाबतींत काढिलेला उच्च स्वर समाजाच्या बधिर कर्णावर पडला; परंतु महर्षि दयानन्द सरस्वतीनीं आपल्या अधि-कारी वाणीनें निद्रित हिन्दु लोकांना जागृत करून व त्यांच्यामध्यें कर्त-व्याची जाणीव उत्पन्न करून आर्यजगतामध्यें विलक्षण क्रांति घडवून आणिली. सर्व मानव समाजामध्यें समानतेचा संदेश सांगून गुणकर्मा-नुसार वर्णव्यवस्थेचा त्यांनीं जनतेस उपदेश केला."

स्वामी श्रद्धानन्दजींनीं आर्यसमाजाच्या द्वारें केलेल्या अस्पृश्योद्धाराचा प्रस्तुत प्रसंगीं संक्षेपानें उल्लेख केला आहे. त्यावरून त्यांची या बाबतीं-तील कामगिरी दिसून येईल.

सन १८९६ मध्यें पददलित झालेल्या शीख समाजांतील राहटी लोकांनीं आपणांस स्पृश्य व शुद्ध करून घेण्यासाठीं आर्यसमाजास विनंति केल्यामुळें एक हजारावर राहटी लोकांना स्पृश्य करून घेऊन त्यांना समा-नतेचे सामाजिक व धार्मिक हक्क देण्यांत आले. सन १९०३ सालीं मेघ-नामक अस्पृश्य वर्गास स्पृश्य करण्याचें कार्य आर्यसमाजानें आरंभिलें. त्यांना आरंभीं सनातनी हिन्दु लोकांनीं व मुसलमानांनीं विरोध केला, पण समा-जानें पन्नास हजारावर मेघ लोकांना स्पृश्य करून घेण्याचें प्रचंड कार्य

केल्यावर विरोध मिटला. पंजाबांतील डोंब, व मुलतानकडील ओड वगैरे अस्पृश्य बंधूंना समाजानें स्पृश्य केलें. काश्मीरांतील सुमारे एक लक्ष मेघ लोकांना आर्यसमाजानें स्पृश्य केलें असून त्यांच्या शिक्षणाखालीं पाठशाळा व हायस्कुलें सुरूं केलीं आहेत. दिल्ली प्रांतांतिल शेंकडों नामधारी अस्पृश्य ख्रिस्त्यांना आर्यसमाजानें हिन्दु करून घेऊन स्पृश्य करून घेतलें. हिन्दुसमाजास सांप्रत याच वर्गांतून प्रामुख्यानें गळती लागली आहे. शेंकडो अस्पृश्य लोक प्रत्यहीं ख्रिस्ती मुसलमान होतात; व गोभक्ताचे गोभक्षक व मूर्तिपूजकाचे मूर्तिभंजक होतात. म्हणून अगोदर अस्पृश्योद्धाराचें कार्य हिन्दुसमाजानें हातीं घेऊन हिन्दुसमाजाची ओहटी बंद केली पाहिजे. आर्यसमाजानें पंजाबामध्यें अस्पृश्योद्धाराचें कार्य इतक्या नेटानें केलें कीं, ख्रिस्ती मिशनऱ्यांना आपलें प्रचाराचें कार्य निराशेनें बंद करावें लागलें. इतर प्रांतांनीं आर्यसमाजाच्या या यशस्वी अस्पृश्योद्धाराचें अनुकरण केल्यास ख्रिस्ती मिशनऱ्यांना आपल्या बायबलाचें चंबूगवाळें उचलून विलायत अमेरिकेची वाट धरावी लागेल !

आपल्या आर्यसमाजी बंधूंबरोबर स्वामी श्रद्धानन्दजींनीं केलेल्या अस्पृश्योद्धाराच्या कार्याचें वर वर्णन केलेंच आहे. परंतु अखिल हिन्दुसमाजानें, व राजकीय पुढाऱ्यांनींहि हें कार्य आपल्या हातीं घेऊन अस्पृश्यता पूर्णपणें नाहींशी करण्याकरतां स्वामी श्रद्धानन्दजींनीं राजकारणाच्या प्रांतांत पदार्पण केलें.

अमृतसरच्या राष्ट्रीय सभेचे स्वागताध्यक्ष या नात्यानें भाषण करतांना स्वामींनीं पुढील उद्गार काढले, " आपणांस मी अशी विनंति करतों कीं, अस्पृश्यांच्या मुलांना तुमच्या मुलांबरोबर शिक्षण घेऊं द्या, त्यांच्या कुटुंबांना तुमच्या कुटुंबांत वावरण्यास वाव द्या ! राजकीय चळवळीमध्यें तुमच्या खांद्याला खांदा लावून अस्पृश्यांना काम करूं द्या! अशा प्रकारें वागण्याची या पवित्र मंडपामध्यें शपथ घ्या. "

कलकत्यास राष्ट्रीय सभेचें जादा अधिवेशन भरलें असतां अस्पृश्योद्धारास कांग्रेसनें प्रमुखस्थान द्यावें असा स्वामींनीं ठराव मांडण्याचा प्रयत्न केला असतां विषय-नियामक कमिटीनें तो विचारास सुद्धां घेतला नाहीं. राष्ट्रीय सभा या महत्त्वाच्या कार्याची उपेक्षा करते म्हणून स्वामी श्रद्धानन्दांनीं

राष्ट्रीय सभेंतून आपलें अंग काढून घेतांना महात्मा गांधीस ९-९-१९२१ रोजीं पुढील आशयाचें पत्र लिहिलें.

"राष्ट्रीय सभेकडून अस्पृश्योद्धाराचें कार्य होणें अशक्य आहे असें मला आढळून आलें. आग्रा दिल्ली वगैरे ठिकाणच्या अस्पृश्यांनीं सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरूं देण्याविषयीं केलेली विनंतिही कांग्रेस कमिटीला मान्य करतां येत नाहीं. अशा स्थितींत कांग्रेसचें साहाय्य न मागतां आपल्या शक्तीप्रमाणें या बाबतींत स्वतंत्र कार्य करण्याचें मीं योजिलें आहे.

शाब्दिक ठरावापेक्षां कांग्रेसला अस्पृशोद्धाराचें कार्य करतां येत नाहीं अशी खात्री होतांच या ठरावशूर राष्ट्रीय सभेस स्वामी श्रद्धानन्दांनीं मोठ्या नाइलाजानें शेवटचा रामराम ठोकला; व दयानन्द दलितोद्धार नामक सभेची स्थापना करून तिच्याद्वारें लक्षावधि अस्पृशांना स्पृश्य करण्याचें कार्य मोठ्या धडाडीनें केलें. त्यांनीं आपल्या मनमिळाऊ व गोड स्वभावानें हिन्दुसमाजांतील लोकांचीं मनें वळविलीं व सार्वजनिक पाणवठ्याच्या जागीं पाणी भरण्यास व मंदिरामध्यें देवदर्शन करण्यास लोकांनीं अस्पृश्यांना परवानगी दिली.

राष्ट्रीय सभेनें अस्पृश्योद्धाराची उपेक्षा केली म्हणून हतोत्साह न होतां तें कार्य द्विगुणितोत्साहानें स्वामींनीं हातीं घेतलें. अखिल भारतीय हिन्दुमहासभेकडून अस्पृशोद्धाराचा ठराव स्वामी श्रद्धानन्दजींच्या प्रयत्नानेंच पसार झाला व चोहोंकडील हिन्दुसभा अस्पृशोद्धाराचें जें कार्य करीत आहेत तें स्वामींच्या प्रथम प्रयत्नाचें दृश्य स्वरूप होय!

मलबार व त्रावणकोर संस्थानांत अस्पृश्यांना स्पृश्य बंधूपासून विशिष्ट अंतरावर उभे रहावें लागतें. अस्पृश्यांची छाया स्पृश्यावर पडल्यास त्यांना विटाळ होतो. कित्येक रस्त्यावर जाण्याची अस्पृश्यांना बंदी केलेली आहे. अस्पृश्यांच्या जन्मसिद्ध हक्कावर गदा घालणाऱ्या या अन्यायाचा प्रतिकार करण्याचें स्वामींनीं ठरविलें. आर्यसमाजाच्या प्रेरणेनें वायकोम येथील अस्पृश्यांनीं आपणांस न्याय्य हक्क मिळण्यासाठीं सत्याग्रह सुरूं केला. स्वामी श्रद्धानन्दांनीं या कार्यास उत्तेजन दिलें व त्यांच्या प्रयत्नानें वायकोम येथील अस्पृश्यांवरील अन्याय नाहींसे झाले.

# श्रद्धाञ्जलि २६ वी.

## हिन्दुसंघटन !

**विजानीह्यार्यान् ये च दस्यवो बर्हिष्मते रन्धया शासद व्रतान् ।**
**शाकी भव यजमानस्य चोदिता विश्वेत्ता ते सधमादेषु चाकन ॥**

ऋ० मं० १-१०-५१-८.

स्वराज्य संपादण्याच्या साधनामध्यें अस्पृश्यतानिवारणाच्या प्रश्नास महात्मा गांधिजींनीं प्रमुख स्थान दिल्यामुळें हिंदु-मुसलमानांचें व राष्ट्रीय सभेचें या महत्त्वाच्या कार्याकडे लक्ष आकर्षिलें गेलें. आस्ते कदम हिंदु-समाजाच्या मानगुटीवर उच्चनीचतेचें व अस्पृश्यतेचें भयानक भूत बसल्या-मुळें, व राष्ट्रीय सभेनें या प्रश्नाचा केवळ ठरावात्मकच विचार केल्यामुळें त्यांच्या हातून विशेष कामागिरी झाली नाहीं. परंतु तडफदार मुसलमान समाजाच्या मनांत हा प्रश्न पक्का बिंबला व अस्पृश्य हिंदु लोकांना मुसल-मान करून अस्पृश्योद्धारानें हिंदु-मुसलमानांचें ऐक्य साधण्याचे प्रयत्न चालूं झाले. मार्जाराच्या मुखांतून मूषक पोटांत गेल्यावर जसें मुषकमा-र्जारऐक्य साध्य होतें तसेंच अस्पृश्यमूषकास आपल्या उदरांत गडपच करून मार्जार वृत्तीच्या यवन समाजानें हिंदु-मुसलमान ऐक्य साधण्याचा प्रयत्न सुरूं केला.

यांतील कित्येक कारस्थानी पुरुषांनीं अस्पृश्यांच्या मनांत स्पृश्य लोकांविषयीं अप्रीति व द्वेष उत्पन्न करण्याचें कार्य सुरूं करून कलहनीतीचा व भेदनीतीचा अवलंब करून अस्पृश्यांना आपल्या जाळ्यांत ओढून घेऊन मुसलमान करण्याचें कार्य आरंभिलें. साडेसहा कोटी अस्पृश्यांना हिंदु-मुसलमानांनीं निम्मेनिम वाटून घेऊन अस्पृश्यतेस तिलांजलि द्यावी असें मुसल-मान राजकीय पुढारी म्हणूं लागले. सर्व हिंदूंना मुसलमान केल्यास हिंदु-मुसलमानांचें अभेद्य ऐक्य होऊन स्वराज्यप्राप्ति सहज होईल असें निरर्गल प्रलाप काढण्यास कांहीं धर्मांध मसलमानांनीं सुरवात केली. खिलाफत

कमीटीला मनोभावें साहाय्य करणाऱ्या परोपकारी हिंदुसमाजाच्या पाठीवर मुसलमान स्वार होऊन आपल्या चढेल वृत्तीनें हिंदुसमाजाशीं पशुतुल्य वर्तन करूं लागले.

हिंदु लोकांच्या उदारतेचा, व विश्वबंधुत्वाचा फाजील फायदा घेऊन मुसलमानी समाजानें राजकीय व सामाजिक क्षेत्रांत अधिक अधिकार व सवलती प्राप्त करून घेतल्या. हिंदुसमाजानें स्वराज्य हेंच एक ध्येय पुढें ठेवून मुसलमानभाईंना अधिक प्रातिनिधिक हक्क देऊन आपला दिलदारपणा व्यक्त केला. परंतु मुसलमान वर्ग यामुळें अधिक शेफारून गेला. हिंदु-लोक आपल्याला भिऊन हक्क देतात असें वाटून त्यांच्या चढेल वृत्तीचा पार कमालीच्या मर्यादेपर्यंत पोहोंचला. ते जेथें बहुसंख्याक होते तेथें बहुमताच्या जोरावर, व जेथें ते अल्पसंख्याक होते तेथें अल्पसंख्याकांचें हितसंरक्षण करण्याकरतां सवलत म्हणून अधिक हक्क त्यांनीं संपादन केले. तुझें तें माझें, व माझें ते माझ्याच मालकीचें या स्वार्थबुद्धीनें जिकडे तिकडे या समाजानें हिंदुसमाजावर वर्चस्व प्रस्थापित करण्याकरतां व आपल्या धर्माची लोकसंख्या वाढविण्याकरतां भल्या बुऱ्या मार्गांनीं हिंदु लोकांस मुसलमान करण्याचें कार्य जोरानें चालविलें. हसन निजामी-सारख्या कारस्थानी मुसलमानांनीं हिंदूंना मुसलमान करण्याचे नानाविध मार्ग काढले. फकीर, विश्वयोषिता, भिकारी, हकीम, वगैरेंनीं मुसलमानी धर्मप्रचारार्थ कार्य करावें म्हणून त्यांनीं गुप्त मंडळ्या स्थापन केल्या व तिच्या द्वारें हिंदु मुलांमुलींना, विधवा अबलांना पळवून नेण्याचें व फसवून मुसलमान करण्याचें कार्य सुरूं केलें. एका वर्षांत एक कोट हिंदूंना मुसलमान करावयाचें अशी त्यांनीं प्रतिज्ञा केली.

मुसलमानी समाजाचा हा कावा प्रथम स्वामी श्रद्धानंदजींच्या लक्षांत आला व त्यांनीं 'अलार्मबेल' नामक पुस्तक लिहून मुसलमानी धर्मवेड्यांचीं सर्व कृष्णकृत्यें व कारस्थानें चव्हाट्यावर आणलीं व त्यामुळें हिंदुजनतेचें या कार्याकडे लक्ष वेधलें. मलबारांत मोपले लोकांनीं बंड करून हिंदु-स्त्रियांचें पातिव्रत्यभांडार लुटण्यांत आलें, शेंकडो स्त्रियांशीं मोपल्यांनीं बळजबरीनें लग्नें लावलीं, शेंकडो अर्भकांना चराचर चिरण्यांत

आलें, मुसलमान न झाल्यामुळें शेकडों हिंदूंच्या कत्तली करून त्यांच्या प्रेतांनीं विहिरी भरण्यांत आल्या, सुमारें दहा हजार हिंदु लोकांना बळजबरीनें मुसलमान करण्यांत आलें. या अनन्वित व हृदयविदारक प्रकारामुळें हिंदूंचीं अन्तःकरणें पिळवटून निघालीं. त्यांना साहाय्य करण्याकरतां स्वामी श्रद्धानन्दजींचे सहकारी महात्मा हंसराज यांनीं सार्वदेशिक आर्य—प्रतिनिधी सभेतर्फे स्वयंसेवक व द्रव्यही पाठविलें. महाराष्ट्रभूषण डॉक्टर मुंजे यांनींही या कामीं फार परिश्रम घेतले. अखेरीस सर्वांच्या मदतीनें आर्यसमाजानें भ्रष्ट झालेल्या मलबारांतील सर्व हिंदूंना शुद्ध करून परत हिंदु—धर्मांत घेतलें. असें जरी झालें तरी हिंदु—मुसलमानांच्या नामधारी ऐक्यांत बाध येऊं नये म्हणून हिंदुसमाजानें हा विषाचा घोट गुपचूप गिळला.

पण अत्याचारी मुसलमान येवढ्यावरच थांबले नाहींत. दिल्ली, कलकत्ता, कोहट, मुलतान, गुलबुर्गा, सोलापूर वगैरे ठिकाणीं त्यांनीं दंगे करून हिंदु लोकांचा अनन्वित छळ केला. हिंदूंच्या आया—बहिणींना भ्रष्टविण्यांत आलें, हिंदूंचीं घरें लुटलीं, त्यांच्या दुकानांना आगी लावल्या; हिंदूंचे पवित्र धर्मग्रंथ पायाखालीं तुडवून, मंदिरें पाडून देवतांच्या मूर्ति फोडण्यांत आल्या. हिंदु लोकांचें जीवित, वित्त, व चारित्र्य धोक्यांत होतें. अशा स्थितींत आपल्या जीविताचें व चारित्र्याचें रक्षण करण्याचा विचार करण्याकरतां अमृतसरला जालीयनवाला बागेंत एक सभा बोलावली असता सर्व हिंदूंनीं एकत्रित होऊन परधर्मीयांपासून आपलें संरक्षण करण्याकरितां '**संघटन**' करावें असें जाहीर करून याचा पुन्हां विचार करण्याकरतां काशीला हिंदुमहासभेचें अधिवेशन भरविण्यांत यावें असें ठरलें.

स्वामी श्रद्धानन्दजींनीं कारागृहांतून सुटतांच संघटनाचें कार्य आपल्याच हातांत घेतलें. हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं दौरे काढून त्यांनीं लोकांत जागृति करून हिंदुमहासभेच्या अधिवेशनास हजर रहाण्यासाठीं सर्वांस उत्तेजित केलें. हिंदुमहासभेचा इतिहास मनोरंजक व बोधप्रद असल्यामुळें तो संक्षेपानें देण्याचें योजिलें आहे. सन१९१५सालीं कुंभमेळ्याचे वेळीं हरिद्वारला हिंदु लोकांचे हितसंरक्षणार्थ एक सभा भरली. सभेला निरनिराळ्या ठिकाणांचे लोक हजर होते. सभेचे सार्वदेशिक हिंदुसभा असें अभिधान ठेवण्यांत येऊन हिंदूंमध्यें व परधर्मीयांमध्यें स्नेहभाव उत्पन्न करणें, जाती—

जातींत संलोखा करणें, सरकाराशीं राजनिष्ठ राहून सरकाराच्या सहकार्यानें हिंदुसमाजाची धार्मिक, नैतिक, राजकीय, शैक्षणिक व सामाजिक उन्नति करून घेणें, इत्यादि ठराव सभेमध्यें मंजूर झाले.

सभेच्यां कार्यांत भाग घ्यावा म्हणून स्वामी श्रद्धानन्दांना, व त्यांच्या गुरुकुलामध्यें त्यावेळीं पाहुणे असलेल्या महात्मा गांधींना विनंति करण्यांत आली. परंतु सरकारी नोकरीचा त्याग करून, वकीली सोडून कोर्टावर बहिष्कार घालणाऱ्या, व शिक्षणाच्या बाबतींत सरकाराशीं सुमारें वीस वर्षांपासून असहकार करणाऱ्या स्वतंत्र विचाराच्या स्वामी श्रद्धानन्दांना सरकारी सहकार्यावर समाज सुधारणा करूं पहाणाऱ्या सभेशीं संबंध ठेवणें उचित वाटलें नाहीं. सरकारी साहाय्यावर लोककल्याण साधूं इच्छिणाऱ्या य सभेचीं पुढें दरसाल वार्षिक अधिवेशनें भरत;परंतु केवळ ठराव पास करण्यापलीकडे या सभेच्या हातून विशेषसें कार्य झालें नाहीं.

रौलॅट ॲक्टाच्या निषेधार्थ हिंदुमुसलमानांचें ऐक्य झालें व हें ऐक्य चिरस्थायी व्हावें म्हणूनच कीं काय सन १९१८ते२० पर्यंत सभा जवळजवळ नामधारी बनली. हिन्दुपुढाऱ्यांनीं आपल्या शक्तीचा व द्रव्याचा ओघ खिलापत चळवळीकडे वळविल्यामुळें हिंदुसभा मृतवत् झाल्यास नवल काय ? खिलापतीच्या कार्याकरितां हिंदुसभेला मृतवत् करून आत्मार्पण करणाऱ्या हिन्दुपुढाऱ्यांच्या उपकाराची फेड फेडण्याकरितांच म्हणून कीं काय हकीम अजमलखांनीं "**जमायते उलेमाए हिन्द**" नामक एक नवीन सभा स्थापन करून मुसलमानी धर्मप्रसाराचें कार्य आरंभिलें. खिलापतीची खिरापत झाल्यावर खटपट्या मुसलमानांनीं तंजीब तब्लधींची चळवळ सुरू करून सुष्टदुष्ट प्रकारांनीं हिन्दूंना मुसलमान करून मार्जारमूषकवत् हिन्दुमुसलमान ऐक्य साधण्याचे प्रयत्न चालविले.

अस्पृश्य लोकांना निम्मेनिम वाटून घेण्याचें, सर्व हिन्दूंना मुसलमान करून ऐक्याच्या जोरावर स्वराज्य साध्य करण्याचे, व महात्मा गांधींना मुसलमान करून खलीफा करण्याचे विचार कांहीं अक्कलेच्या खंदकांच्या टाळक्यांतून निघालें. याचें पर्यवसान मोपला लोकांचें बंड व मुलतान, पेशावर दिल्ली इत्यादि ठिकाणच्या दंग्यामध्यें झाल्यामुळें हिन्दू-

जनतेचें लक्ष इकडे वेधलें. स्वामी श्रद्धानन्दांनीं " **अलार्म बेल** " वाजवून मुसलमानी कृष्णकारस्थानें उजेडांत आणलीं त्यामुळें हिन्दु लोकांचे डोळे उघडले.

१९२१ च्या एप्रिल महिन्यांत हिन्दुसभेचें अधिवेशन हरिद्वारला भरलें असतां सभेच्या संकुचित ध्येयांत बदल करण्यांत आला. सरकाराशीं सहकार्य करणें या शब्दद्वयामागें स्वराज्यप्राप्तीकरतां हे शब्द जोडण्यांत आलें. अस्पृश्यतानिवारणाला आतांपर्यंत सोंवळ्या मंडळींनीं फाटा दिला होता, तो यावेळीं काढून टाकण्यांत आला, व अस्पृश्यांच्या कार्यास प्रामुख्य देण्यांत आलें तसेंच सरकार गोवध बंद करीपर्यंत सरकाराशीं असहकारिता करण्याचे व बहिष्काराचे ठरावही ह्या सभेंत पसार झाले.

काशीला १९२३ सालीं ऑगस्ट महिन्यांत हिन्दुमहासभेचें अधिवेशन भरण्याचे समयीं स्वामी श्रद्धानंद शहरो शहरीं फिरून लोकजागृति करून शेंकडो प्रतिनिधी घेऊन हजर झाले, सभेचे अध्यक्ष पं. मदनमोहन मालवीय यांचे भाषणांतील पुढील सारांश त्या वेळेच्या परिस्थितीवर प्रकाश पाडणारा आहे. " हिन्दूवर ठिकठिकाणीं अत्याचार करण्यांत आले. स्त्रियांची बेअब्रू करण्यांत आली, मूर्ति फोडण्यांत आल्या, तलवारीच्या जोरावर इस्लामी धर्म स्वीकारण्याची सक्ति करण्यांत आली. हिन्दुसमाज अगदीं दुर्बल बनला आहे; स्त्रिया व धर्म यांचेंही त्याला रक्षण करतां येत नाहीं. अत्याचारी मुसलमानांची ज्या वेळीं अशी खात्री पटेल कीं **हिन्दु उसनें ठेवित नाहींत**, त्याचवेळीं त्यांचा अत्याचारास आळा बसेल. आम्हीं आपलें कर्तव्य विसरलों आहोंत. स्त्रियांना शिक्षण दिलें पाहिजे, ब्रह्मचर्याचें महत्त्व जाणलें पाहिजे, ठिकठिकाणीं आखाडे काढून शारीरिक बळ वाढविलें पाहिजे. अस्पृश्य लोकांना मूर्तीच्या दर्शनास प्रतिबंध नसावा. आपण स्वस्थ बसाल तर आपण संख्याबलानें कमी झाल्यावर आपली तग लागणार नाहीं. "

वरील आशयाचें अध्यक्षांचें भाषण झाल्यावर सर्व जातींत सलोखा उत्पन्न होण्यासाठीं हिंदुसंघटन करणें, शुद्धि करणें, ब्रह्मचर्यव्रतपालनास व शारीरिक बळास उत्तेजन देणें, अस्पृश्योद्धार करणें, चोहोंकडे तालमीचे आखाडे काढून **समाजसेवकदल स्थापन करणें** इत्यादि ठराव पसार झाले.

जी हिन्दुमहासभा आरंभीं सोंवळ्यावृत्तीची व सरकाराशीं सहकार्य करणारी होती ती असहकारितेच्या कालांत असहकारी व अस्पृश्योद्धाराचें उच्चाटण करणारी झाली, व पुढें स्वामी श्रद्धानंन्द व पं. मदनमोहन मालवीय यांच्या प्रयत्नानें ती स्वावलंबी बनून शुद्धि, अस्पृश्योद्धार व संघटनाचें कार्य करूं लागली. स्वामी श्रद्धानन्द व पं. मालवीयजी यांच्या प्रयत्नानें हिन्दुसभेंत नवीन चैतन्य उत्पन्न झाल्यामुळें परधर्मीयांचें धाबें दणाणलें. कांहीं कोत्या बुद्धीच्या मुसलमानांना तर आपल्या धर्मावर हल्लाच आहे असें वाटूं लागलें ही चळवळ इष्ट असली तरी हिन्दुमुसलमानांच्या ऐक्यतेस बाध आणणारी आहे, सबब ती बंद ठेवावी असें कांहीं अर्धवट बरळूं लागले. कांहीं शांतिब्रह्माचा आव आणणारे महात्मे हिन्दुमुसलमान ऐक्याच्या तुटलेल्या तारा छेडून त्यांतून प्रेमध्वनि काढण्याचें कार्य करूं लागले. तुम्ही संघटनाची चळवळ कराल तर आम्ही बाटविण्याची चळवळ करूं अशी कित्येक मुसलमानांनीं धमकीही दिली. मुसलमान वर्गानें या चळवळीविषयीं निष्कारण गैरसमज करून घेतला. ‘ हिन्दुधर्म हा आजवर स्वदेशांतच आसन ठोकून बसलेला आहे. ख्रिस्ती, महंमदी धर्माप्रमाणें तो घोड्यावर बसून मुलुखगिरी करूं लागलेला नाहीं. स्वतः त्याचें म्हणून जें आहे तें हातचें जाऊं नये व हिन्दुधर्म हा हिन्दुस्थानांतच स्थानभ्रष्ट होण्याची लज्जास्पद आपत्ति टळावी इतकीच आकांक्षा त्यानें धरल्यास ती महत्त्वाकांक्षा होत नाहीं व ती दुसऱ्या धर्मासंबंधानें आगळीक होत नाहीं. हिन्दुधर्माला इतकेंही करूं द्यावयाचें नाहीं म्हणजे ती चढेलपणाची कमालच होय. व ती कोणताही स्वाभिमानी समाज सोसणार नाहीं. ’ हें केसरीकारांचें म्हणणें अत्यंत इष्ट व सत्य आहे.

परधर्मीयांनीं दिलेल्या धमक्यांला किंवा अर्धवट स्वधर्मीयांनीं केलेल्या आत्मघातकी पांडित्याला स्वामी श्रद्धानंदांनीं व पं. मालवीयांनीं मुळींच दाद दिली नाहीं.

समाजाची सर्वांगीण उन्नति होण्याला समाजांतील व्यक्तींचें संख्याबल बुद्धिबल, द्रव्यबल, नीतिबल व संघटनात्मकबल या पंचविध बलांची शरीराच्या पंचप्राणाप्रमाणें आवश्यकता आहे. यापैकीं कोणतेंही एक बल कमी पडलें तर तो समाज ऱ्हासास लागला म्हणून समजावें. हें लक्षांत घेऊन

स्वामी श्रद्धानन्दांनीं व हिंदुधर्माच्या अन्य पुढाऱ्यांनीं हिंदुसमाजाच्या उन्नतीसाठीं सर्व तऱ्हेचे परिश्रम सुरू केले.

हिन्दुसंघटन नवीन आहे म्हणून तें करूं नये असें कित्येक पंडित म्हणतात, पण संघटन हा शब्द जरी नवा असला तरी संघटन करण्याबद्दल वेदांमध्यें कित्येक मंत्र आहेत. **पांचजन** हें याला वेदकालीं नांव होतें. गीतेमध्यें **लोकसंग्रह** या नांवानें संबोधिलें आहे. समर्थकाळीं याला ' चळवळ ' या नांवानें उल्लेखिलें आहे. **मराठा तितुका मिळवावा महाराष्ट्र धर्म वाढवावा। ये करणें न करता तकवा। पूर्वज हांसती।** समर्थांनीं आपल्या अधिकारी वाणीनें संघटनाची दिशा दाखवून दिलेली आहे, म्हणून ही चळवळ नवी नाहीं. परंतु भगवंताचें अधिष्ठान ठेवून ती करूं लागल्यास आपणास कोणालाच भिण्याचें कारण नाहीं.

दुसरे रागावतात म्हणून ही चळवळ करूं नये यापरता अन्य आत्मघातकीपणा नाहीं. दुसरा क्रुद्ध होईल म्हणून आपण आपलें घरदार बांधण्याचें किंवा संसाराचें कार्य सोडीत नाहीं. चोर रुष्ट होईल म्हणून घरास कुलूप लावण्याचें आपण सोडून देत नाहीं. तसेंच आपलें वित्त, जीवित व शील सांभाळण्याकरतां व हिन्दुसमाज स्वसंरक्षणक्षम करण्याकरतां संघटन अवश्यमेव केलें पाहिजे. ब्राह्मणब्राह्मणेतर वादाला, स्पृश्यास्पृश्य भेदाला तिलांजलि देऊन सर्व हिन्दुजातींनीं हिन्दुधर्म रक्षणाकरतां तयार असलें पाहिजे.

स्वताचें संरक्षण करण्याकरतां संघटन करण्याचा प्रत्येकाला नैसर्गिक हक्कच आहे. हिन्दुसमाज तो हक्क न बजावील तर त्याच्यापुढें मूर्तिमंत मृत्यु ठेविलेलाच आहे. या जाणीवेनें स्वामी श्रद्धानन्दांनीं लोकजागृति करून हिन्दुसभेच्या भारत देशांत शाखा, उपशाखा स्थापन करून हिन्दुसमाजांत नवीन चैतन्य उत्पन्न केलें.

---

# श्रद्धाञ्जलि २७ वी.

**इन्द्रं वर्धन्तोऽप्तुरः कृण्वन्तो विश्वमार्यम्।**
**अपघ्नन्तोऽराव्णः॥** ऋ. ९. ६३. ५

प्राचीनकाळीं जगभर वैदिक धर्माचें साम्राज्य होतें, तेव्हां वैदिक धर्मीयांची लोकसंख्या जवळजवळ शंभर कोटी होती. कालांतरानें धर्म-मालिन्यामुळें, राजक्रांतीमुळें वैदिकधर्मीयांची संख्या कमी कमी होत बाराव्या शतकाच्या आरंभापर्यंत ही लोकसंख्या तीस कोटीवर आली. गत सहा सातशे वर्षांत मुसलमानी धर्मानें व खिस्ती धर्मानें हिन्दुधर्मावर आक्रमणें केल्यामुळें ९ कोटी हिन्दुलोक कमी होऊन परधर्मांत गेले. गेल्या तीस वर्षांमध्यें शेंकडा ७४ हिन्दुलोकांची संख्या शेंकडा ६९ वर आली. अशा रीतीनें लोकसंख्येस ऱ्हास लागला तर हिन्दुधर्म ४२०वर्षांत नामशेष झाल्या-विना रहाणार नाहीं.

हिन्दु समाजाचा हा जो भयंकर ऱ्हास होत आहे त्यास आळा न घातल्यास हिंदुधर्माचे नांवाचाही लोप होईल हें जाणून स्वामी दयानन्द सर-स्वतींनीं हिन्दुसंघटनाचा समाजाच्या ओहटीस बंधारा बांधून शुद्धीचा नवीन प्रवाह हिंन्दु धर्मास जोडून दिला. डेराडूनच्या मुन्शी महंमद उमर नांवा-च्या मुसलमानास शुद्ध करून हिन्दुधर्मांत प्रविष्ट करून घेतलें व अशा रीतीनें हिन्दुधर्माचीं द्वारें विधर्मीयांस साठ वर्षांपूर्वी स्वामींनीं खुलीं केलीं.

वेदकालापासून चालत आलेल्या शुद्धीच्या व्यापक स्वरूपाची ओळख विसरलेल्या हिन्दु समाजास स्वामी दयानंदांनीं आपल्या उपदेशानें जाणीव करून देऊन शुद्धीवर आणलें.

**पुनन्तु मा देवजनाः पुनन्तु मनसा धियः ॥**
**पुनन्तु विश्वानि भूतानि जातवेदः पुनीहि मा ॥**

वैदिक धर्म सोडून अधर्माचरण करणाऱ्या, दुराचारी माणसांनीं आपल्या दुष्कर्माबद्दल पश्चात्ताप झाला असतां विद्वानांना व वेदवेत्त्या पंडि-तांना शुद्ध करून घेण्याची प्रार्थना केली असतां त्यांना शुद्ध करून पुनीत व सन्मार्गगामी करणें हें विद्वानांचें पवित्र कर्तव्य आहे असें यजुर्वेदाचें सांगणें असून अधार्मिकास व अनार्यास धार्मिक आर्य करण्याची ‘ कृण्वन्तो विश्वमार्यम् ’ या मंत्रद्वारें ऋग्वेदाची आज्ञा आहे असें गंभीर वाणीनें प्रतिपादून शुद्धीचें रणशिंग वाजवून स्वामींनीं निद्रिस्त भारतीयांस जागृत केलें अभिनव भारत देशांतील स्वामी दयानंद सरस्वति हेच शुद्धीचे आद्य प्रवर्तक होत.

स्वामींनीं सुरूं केलेलें शुद्धिकार्य आर्यसमाजानें स्वामींच्या पश्चात् अप्रतिहतपणें चालविलें. जुन्या विचारांच्या शास्त्री पंडितांनीं व सामान्य लोकांनीं समाजाच्या शुद्धीकार्यास विरोध केला. परधर्मीयांनीं त्यांची साथ केली. मुसलमान ख्रिस्ती लोकांना शुद्ध करून घेणें म्हणजे सबगोलंकार करणें होय असें हे सनातनी धर्ममार्तंड म्हणूं लागले. एकदां हिन्दूचा मुसलमान किंवा ख्रिस्ती झाला कीं तो हिन्दुधर्मास कायमचाच मुकला असें यांचें म्हणणें. पण भ्रूणहत्या, गोहत्या, नरहत्या, सुरापान, व्यभिचारादि दुष्कर्मे करणाऱ्यांना प्रायश्चित्त देणारीं शास्त्रें विधर्मीयांचा संसर्ग होऊन पतित झालेल्याला मात्र प्रायश्चित्तानें शुद्ध करीत नाहींत असें म्हणणें म्हणजे शास्त्राविषयीं अज्ञान प्रकट करणें होय.

अपेयं येन संपीतमभक्ष्यं चापि भक्षितम् ।
म्लेच्छैर्नीतेन विप्रेण अगम्यागमनं कृतम् ॥
तस्य शुद्धिं प्रवक्षामि यावदेकं तु वत्सरम् ।
चान्द्रायणन्तु विप्रस्य सपराकं प्रकीर्तितम् ॥

एखाद्या हिन्दूनें विधर्मीयांच्या जाळ्यांत सांपडून अपेयपान, अभक्ष्यभक्षण किंवा अगम्यागमन केलें तर चांद्रायण व्रतानें त्याची शुद्धि होते असें देवलस्मृति व अन्य शास्त्रग्रंथ कंठरवानें सांगत असतां शुद्धि शास्त्रसंमत नाहीं असें म्हणणें म्हणजे शास्त्रज्ञानाबरोबर देशकालपरिस्थितीचेंही अज्ञान प्रकट करणें होय यापरता अन्य आत्मघातकीपणा कोणता ?

आर्यसमाजी मंडळींनीं परकीयांच्या व स्वकीयांच्या विरोधास भीक न घालतां शुद्धिकार्य उत्साहानें चालवून शुद्धि शास्त्रसंमत असून शुद्धि हीच आर्यांची वृद्धी होय, असें प्रतिपादण्यास सुरवात केल्यामुळें समंजस सनातनी हिन्दूचा विरोध उत्तरोत्तर कमी होऊं लागला. वैदिकधर्म हा विश्वधर्म आहे असें वैदिकधर्माचें श्रेष्ठत्व प्रतिपादणाऱ्या, परधर्मीयांच्या हल्यापासून हिन्दुधर्मीयांचें रक्षण करून देवब्राह्मण गोमातेच्या संरक्षणार्थ प्राणअर्पण करणाऱ्या, ब्रम्हचर्याश्रमाचा पुरस्कार करून वेदविद्येस उत्तेजन देणाऱ्या आर्यसमाजीयांच्या परोपकारी कार्याकडे पाहून स्वकीय समजदार सनातनी बंधू—विरोध विसरून आर्यसमाजाचें अनुकरण करून शुद्धिकार्य करूं लागले.

हिंदुसभा व हिंदु मिशनरी सभांचें शुद्धीकार्य आर्य समाजीयांच्या अनुकरणाचीं मधुरफळें होत. मलबारमध्यें मोपले लोकांनीं जबरदस्तीनें बाटविलेल्या हिन्दु लोकांना शुद्ध करून घेण्याचे कामीं दे.भ. डॉ. मुंजे यांनीं आर्यसमाजी मंडळीस मनापासून साहाय्य केलें. श्रीमत् जगद्गुरू श्रीशंकराचार्य ( डॉ. कूर्तकोटी ) मठ करवीर यांनीं देशकाल परिस्थित्यनुरूप पतितांची शुद्धि करण्यास परवानगी देऊन शुद्धी शास्त्रसंमत आहे असा श्रींनीं आपल्या अधिकारी वाणीनें शुद्धीकार्यावर शिक्कामोर्तब लावला. हिन्दू समाजास भ्रष्टीकरणाची जी विलक्षण ओहोटी लागली होती तिला आर्यसमाजियांच्या दीर्घ प्रयत्नानें व अन्य हिन्दु धर्माभिमानी अधिकारी सज्जनांच्या साहाय्यानें आळा बसला एवढेंच नव्हे तर शुद्धिकरणाचा नवीन प्रवाह हिन्दु समाजास मिळाल्यानें हिन्दु समाज वर्धिष्णु बनला. स्वामी श्रद्धानंदांनीं अस्पृश्योद्धाराचें काम करून हिन्दु धर्माच्या गळतीस बंधारा बांधला, व त्या बरोबरच शुद्धीच्या कार्यास सुरवात करून त्या बाबतींत अत्यंत स्पृहणीय कामगिरी करून दाखविली.

दोन तीनशें वर्षांपासून आग्रा प्रांताजवळ ४॥ लाख मलकाना रजपूत नांवानें मुसलमान पण संस्कृतीनें पूर्णपणें हिन्दु असे लोक रहात होते. मुसलमानी अत्याचारास बळी पडून त्यांनीं कांहीं अंशानें मुसलमानी धर्म बळजबरीनें घेतला होता; तरी ते अन्तःकरणानें वर्णानें व्यवहारानें पूर्ण हिन्दु होते. ते देवतांची पूजा करीत, तुलसीमाला गळ्यांत धारण करून भालीं तिलक लावून रामकृष्णादि देवांचा जप करीत असत. आपल्या जातीच्या बाहेर ते रोटीबेटी व्यवहार करीत नसत, व गोमांस जन्मांतही खात नसत. विवाहादि संस्कार हिन्दु रीतीनें करीत असत. आपणांस आज नाहीं तरी कालांतरानें आपले हिन्दुबंधु शुद्ध करून आपणांत घेतील या उत्कट इच्छेनें त्या लोकांनीं दोन तीन शतकें हिन्दु संस्कृतीचें जतन करून हिन्दुधर्मावर दृढ व अढळ विश्वास ठेवला होता.

आर्यसमाजानें १९०५ सालीं कांहीं मलकाना रजपुतांना शुद्ध करून वैदिकधर्मांत घेतलें व इतर लोकांना शुद्ध करून घेण्याकरतां रजपूत शुद्धि सभा स्थापन केली. या सभेनें १९१० पर्यंत ११३२ मलकाना रजपुतांना शुद्ध करून घेतलें. आर्यसमाजाखेरीज अन्य कोणतीच

संस्था या सभेला मदत करीत नव्हती. सर्व रजपूत समाजानें व हिन्दुलोकांनीं हें शुद्धिकार्य हातीं घ्यावें असा आर्यसमाजानें प्रयत्न सुरू केला व ३१ डिसेंबर १९२२ सालीं मेवाडच्या शाहुपुराधीश राजा नारसिंहजी यांच्या अध्यक्षतेखालीं क्षत्रीय महासभेचें अधिवेशन भरलें असतां मलकाना रजपुतांना शुद्ध करून घेण्याचा प्रस्ताव पसार झाला.

ही बातमी एका हिन्दी साप्ताहिकामध्यें प्रसिद्ध होतांच मुसलमान समाज खडबडून उठला व त्यानें शेंकडो मौलवी मलाकाना रजपुतांना पक्के मुसलमान करण्याकरितां पाठविलें. हिन्दु लोक मात्र ठराव करून घरीं जाऊन स्वस्थ झोंपा घेत बसले. मुसलमान मौलवींनीं शुद्धीची चळवळ कराल तर हिन्दुमुसलमानांच्या ऐक्याचीं छकलें उडतील, असें म्हणत मलाकाना रजपुतांच्या गळ्यांतील तुलसीमाला तोडण्यास व शेंकडो वर्षें जतन केलेल्या मलकानांच्या शिखा बळजबरीनें कापून अनत्याचाराच्या नांवाखालीं अत्याचाराचें जुलूम जबरदस्तीचें सैतानी राज्य स्थापण्यास आरंभ केला.

हें भयानक दृश्य पाहून आग्रा आर्यसमाजानें सर्व हिन्दु लोकांची स्वामी श्रद्धान्दजींच्या अध्यक्षतेखालीं एक जाहीर सभा बोलावून या अत्याचारास तोंड देण्याकरतां १३ फेब्रुवारी १९२२ ला भारतीय शुद्धिसभा नांवाची एक सभा स्थापन करून तिच्या कार्यकारी मंडळांत निरनिराळ्या पंथांची व प्रांतांची मंडळी समाविष्ट करून स्वामी श्रद्धानन्दांना या सभेचें अध्यक्षस्थान दिलें. स्वामी श्रद्धानन्दांनीं लोकाग्रहास्तव सभेचें अध्यक्षपद स्वीकृत करून आपलीं अन्य कामें बाजूस सारून याच कामाला आपला सर्व समय देण्याचें ठरविलें.

" नाना मतांच्या व पंथांच्या स्वार्थमूलक मतभेदानें व संघटनाच्या अभावीं विस्कळित झालेला हिंदुसमाज सांप्रत प्रेतवत् झालेला आहे. लक्षावधी लोकांना बळजबरीनें परधर्मांत रहावें लागत आहे. हजारों हिन्दु दरसाल ख्रिस्ती होत आहेत. पण हिन्दु लोक या गळतीस बंधारा घालीत नाहींत. दोनशें वर्षांपासून आपल्या हिन्दु संस्कृतीचें जतन करून वैदिक धर्मावर अढळ विश्वास ठेवणाऱ्या मलकाना रजपुतांना शुद्ध करून घेण्याकरतां भारतीय शुद्धि सभा स्थापन झाली आहे. "

मराठी ग्रंथ ... नं. ... क्र. १२१

असें विनंतिपत्र स्वामी श्रद्धानंदांनीं वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करतांच शुद्धि कार्यासाठीं पैशाचा पाऊस पडूं लागून शेंकडो निर्भय स्वयंसेवक व उपदेशक स्वामींच्या शुद्धीच्या भगव्या झेंड्याखालीं स्वामींची आज्ञा शिरोधार्य मानण्यासाठीं गोळा झाले.

**क्रियासिद्धिः सत्वे भवति महतां नोपकरणे ।**

स्वामी श्रद्धानन्दासारख्या एका निर्भय वीर संन्याशानें आपल्या अनुयायांच्या साहाय्यानें भारतीय शुद्धीसभेमार्फत इतकें प्रचंड कार्य इतक्या थोड्या अवकाशांत केलें कीं, मुसलमान मौलवींना आपलें कार्य सोडून चरफडत परत जावें लागलें. आग्रानजीक एका गांवांतील मलकाना रजपुतांना शुद्ध करून घेतांना स्वामी म्हणाले, " ही या मलकानांची शुद्धि नसून यांच्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या आपणा सर्वांच्या पातकाची ही प्रायश्चितात्मक शुद्धि होय. " स्वामींच्या या वाक्यावरून शुद्धीकृत माणसांसंबंधानें त्यांच्या मनांत किती आदर वसत असे हें दिसून येतें. गांवच्या गांवें एकामागून एक शुद्ध होऊं लागलीं. दररोज शेंकडो मलकाना लोक शुद्ध होऊं लागले. स्वामींनीं स्थापन केलेल्या या सभेनें गेल्या तीन वर्षांत सुमारें २॥–३ लाख मलकाना रजपुत लोकांना शुद्ध करून घेतलें व दोन लाख रुपये या कामीं खर्च केले. स्वामींच्या पुण्यप्रभावानें क्षत्रिय समाजास शुद्धीचें तत्त्व इतकें पसंत पडलें कीं, सर्व क्षत्रिय लोक या शुद्धीकृत मलकाना रजपुतांबरोबर सांप्रत रोटी बेटी व्यवहार करीत आहेत.

१९२३ सालीं काशींत हिन्दु महासभेचें अधिवेशन भरलें असतां पं. मालवीय व स्वामी श्रद्धानंद यांच्या प्रयत्नानें मलकाना लोकांना शुद्ध करून घेण्याचा ठराव पास झाल्यामुळें शुद्धीच्या कार्याला विलक्षण जोर आला. हल्लीं ठिकठिकाणीं हिन्दु सभेच्या शाखा स्थापन होऊन जी शुद्धिसंघटनात्मक चळवळ होत आहे तिचें श्रेय स्वामी श्रद्धानंदासच आहे.

---

# श्रद्धाञ्जलि २८ वी.

## धर्मासाठीं बलिदान !

**धैर्यं यस्य पिता क्षमाच जननी शांतिश्चिरंगेहिनी ।**
**सत्यं सूनुरयं दयाच भगिनी भ्राता मनःसंयमः ॥**
**शय्या भूमितलं दिशोऽपि वसनं ज्ञानामृतं भोजनम् ।**
**एते यस्य कुटुम्बिनो वद सखे कस्माद्भयं योगिनः ॥**

स्वामी श्रद्धानन्दजींच्या शुद्धी संघटनात्मक कार्यामुळें मुसलमान लोक त्यांच्यावर दांत ओठ खाऊं लागले स्वामींनीं स्वयंसेवकदलें स्थापन केलीं. धर्मरक्षणासाठीं प्राण अर्पण करणारे धर्मवीर चोहोंकडे निर्माण झाल्यामुळें अत्याचारी मुसलमानांना पूर्वींप्रमाणें हिन्दु धर्माच्या मोकळ्या रानावर चरावयास मिळेना. एवढेंच नव्हे तर मूर्ति फोडण्यास तयार होणाऱ्या मुसलमानास हिन्दु वीरांपुढें पळतां पळतां पुरेवाट होऊं लागली व हिन्दूंची भीति त्यांस वाटूं लागली.

या स्थित्यंतराच्या बुडाशीं स्वामी श्रद्धानंद आहेत हें जाणून कित्येक मुसलमानांनीं 'तुम्ही शुद्धि सोडून द्या, नाहींतर तुम्हाला ठार करूं.' अशीं धमकीचीं पत्रें पाठविण्यास सुरवात केली. या धमकीला भिऊन स्वामी कार्यपराङ्मुख होतील असें मुसलमानांना वाटलें. पण निर्भय वृत्तीचे स्वामी या धमकीला भीक न घालतां शुद्धिसंघटनाची चळवळ द्विगुणित जोरानें करूं लागले.
स्वामींच्या अनुयायांनीं स्वामींनीं शरीर रक्षणाकरितां कांहीं स्वयंसेवक स्वतः बरोबर ठेवण्यास सांगितलें असतां 'मारणाऱ्यापेक्षां रक्षण करणारा परमेश्वर अधिक समर्थ आहे, असें म्हणून स्वामी पूर्वक्रमानुसार शुद्धीच्या कार्यानिमित्त रात्रंदिन एकटे फिरूं लागले. धैर्य हाच पिता, क्षमा हीच माता, सत्यरूप पुत्र, दयारूप भगिनी मनोनिग्रहरूपबंधू हे ज्या स्वामी श्रद्धानंदाचे कुटुंबी होते, त्या योगिराज स्वामी श्रद्धान्दाला भीति हा काय पदार्थ आहे याची

मुळींच जाणीव नव्हती. संन्यास घेतें समयींच तळहातावर शिर घेऊन स्वामींनीं धर्मप्रसाराचें कार्य चालविलें होतें. धर्माकरतां

**सर्व अर्पावें शेवटीं। प्राण तोही वेंचावा।**

अशी त्यांची वृत्ति झालेली होती. **हा मृत्यु आजीच घडो युगान्तीं । सन्मार्ग टाकून भले न जातीं ॥** अशा निर्भय विचाराचे स्वामी श्रद्धानन्द शुद्धीकार्याकरतां हजारो मैलांचा प्रवास करूं लागले. क्षुधा, तृषा, पाऊस, पाणी यांची पर्वा न करतां त्यांनीं या कामीं अविश्रांत श्रम केल्यामुळें १९२६ च्या नोव्हेंबर महिन्यांत ते दिल्लीला ब्रांकोनिमोनिया च्या आजारानें धरणीवर पडले. सुमारें एक महिनाभर औषधोपचार केल्यावर २०।२१ डिसेंबरास त्यांचा ज्वर थोडा कमी झाला व त्यांना बरें वाटूं लागलें.

२३ डिसेंबर १९२६ रोजीं दुपारीं तीन वाजतां शौचशुद्धि करून स्वामी श्रद्धानन्दजी दया क्षमेची कफनी ओढून शांत चित्तानें बसले असतां अबदुल रशीद नांवाच्या एका मुसलमानास आंत येण्याची त्यांच्या धर्मसिंह नांवाच्या सेवकानें मनाई केली. स्वामींनीं त्यास आंत बोलावल्यावर अबदुलरशीद म्हणाला, " स्वामीजी, मुसलमानी धर्मासंबंधानें मला आपणाशीं वादविवाद करावयाचा आहे." "बरा झाल्यावर तुझ्याशीं बोलेन" असें स्वामीजींनीं उत्तर दिल्यावर अबदुल रशीदनें पाणी पिण्यास मागितलें, तेव्हां धर्मसिंहानें त्यास बाहेर नेऊन पाणी पिण्यास दिलें. पण स्वामी श्रद्धानन्दांच्या रुधिराची तृष्णा लागलेल्या अबदुल रशीदनें धर्मसिंह बाहेर गेला अशी संधि साधून स्वामींच्या खोलींत प्रवेश करून रुग्ण शय्येवर शांतचित्तानें बसलेल्या, व जगाकडे मित्रत्वाचे दृष्टीनें पहाणाऱ्या ७१ वर्षांच्या वयोवृद्ध स्वामींच्या छातीवर आपल्या पिस्तुलाची गोळी झाडली. त्या नराधमाची गोळी स्वामींची छाती भेदून जातांच स्वामींनीं डोळे मिटले व शेवटचा श्वास सोडला. पण तो पशु स्वामीजींवर आणखी गोळ्या झाडूं लागला. गोळ्यांचा आवाज ऐकून धर्मसिंहानें धांवत येऊन अबदुलरशीदला धरलें, पण गोळीनें घायाळ करून तो नरघ्न कृतघ्न पळून जाऊं लागला असतां स्वामींचे चिटणीस स्नातक धर्मपाल यांनीं अबदुल रशीदला पक्कें धरून ठेवून फौजदार येतांच त्यांच्या स्वाधीन केलें.

"शुद्धिकार्यामुळें शत्रू बनलेल्या स्वामींचा (काफराचा) खून करून मी स्वर्गप्राप्ति करून घेणार आहें" असें म्हणणाऱ्या त्या खुनी अबदुल रशीदच्या वाक्यावरून हीन मुसलमानी वृत्ति निदर्शनास येते.

आर्यसमाजाग्रणी स्वामी श्रद्धानंद कालवश झाले ? राष्ट्रीय शिक्षणाचे पुरस्कर्ते परलोकवासी झाले ! शुद्धिसंघटनाचे पंचप्राण श्रद्धानंदाचे प्राणपंचत्वांत मिळाले. अस्पृश्यांचे उद्धारक, सत्यानें स्वराज्य संपादन करणारे सत्याग्रही धर्मवीर स्वामी श्रद्धानन्दांचा आत्मा परमात्म्याकडे निघून गेला. वैदिक धर्माचा भानु अस्तास गेला. अनाथांचा नाथ, गरीबांचा वाली, स्त्रियांचा कैवारी, भरत देशाच्या सुखाशेचा कल्पवृक्ष नष्ट झाला. असा महात्मा, असा योगी, असा असामान्य धर्मवीर पुन्हां या धरणीवर अवतीर्ण होईल काय ?

स्वामींच्या शोचनीय मृत्यूची वार्ता थोड्या समयांत दिल्ली शहरांत पोहोंचली. हजारो स्त्रीपुरुष स्वामींच्या निवासस्थानाकडे गोळा होऊं लागले. हिन्दुस्थानभर या दुःखवार्तेनें शोकाचें साम्राज्य पसरलें. जिकडे तिकडे हरताळ पाळले गेले व शहरोंशहरीं दुःखप्रदर्शनार्थ सभा झाल्या.

२५ डिसेंबरला स्वामींची प्रेतयात्रा ११ वाजतां निघाली. प्रेतयात्रेस सुमारें २॥-३ लाख लोक हजर होते. स्वामींच्या शवावर पुष्पवृष्टि करण्यांत आली,पण यापेक्षां स्वामींच्या दुःखद मृत्यूनें हिन्दवासीयांच्या नेत्रांतून अश्रूंची वृष्टि व अन्तःकरणांतून श्रद्धांजलीची वृष्टि अधिक झाली. यमुना किनाऱ्यावर चंदनाच्या चितेवर स्वामींचा जड देह ठेवला व वैदिक संस्कारोक्त मंत्रानें शवास अग्नि दिला. स्वामींच्या मृत्यूनें प्रत्येकजण भग्नहृदय अन्तःकरणानें घरोघर परत फिरला. पण दिल्ली शहरांतच काय अखिल हिंदुस्थानांत स्मशानाची उदासीनता पसरली.

**स जीवति यशो यस्य कीर्तिर्यस्य स जीवति ।**

स्वामी श्रद्धानन्द आपणांस जड देहानें सोडून गेलेले असले तरी ते यशरूपानें व कीर्तीनें आपणांमध्यें जिवंत आहेत. धर्मासाठीं बलिदान करणारा स्वामींचा आत्मा प्रत्येक हिन्दुमात्रास सांगत आहे कीं, **सिर जाय तो जाय, सिरसे अच्छा धर्म नाहिं जाय ।** धर्मरक्षणाकरितां निर्भय वृत्तीनें